## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – १९

## सभावृत्तांत.

दिनांक – २०.०७.२०१३ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै-२०१३ ची मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.०७.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१५. मा.जगदिश शेटटी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२७. मा.भारती फरांदे
२८. मा.आर.एस.कुमार
२९. मा.चारुशीला प्रभाकर कुटे
३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव
३२. मा.नेटके सुमन राजेंद्र
३३. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३५. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३६. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३७. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३८. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४०. मा.अपर्णा निलेश डोके
४१. मा.अनंत सुभाष को-हाळे
४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४३. मा.जयश्री वसंत गावडे
४४. मा.पवार मनिषा काळूराम
४५. मा.प्रसाद शेट्टी
४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४७. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४८. मा.शेख अस्लम शैकत
४९. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५०. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५१. मा.वाबळे संजय मल्हारराव
५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५३. मा.सुपे आशा रविंद्र

५४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५५. मा.अजित दामोदर गव्हाणे
५६. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५७. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
५८. मा.महेशदादा किसन लांडगे
५९. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६०. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६१. मा.लोंढे शुभांगी संतोष
६२. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६३. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६४. मा.सावळे सिमा रविंद्र
६५. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६६. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६७. मा.पालांडे सुजाता सुनिल
६८. मा.बहल योगेश मंगलसेन
६९. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७०. मा.कदम सदगुरु महादेव
७१. मा.कैलास महादेव कदम
७२. मा.छाया जगन्नाथ साबळे
७३. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७४. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७५. मा.आसवाणी सविता धनराज
७६. मा.वाघेरे सुनिता राजेश
७७. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
७८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८०. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८१. मा.काळे विमल रमेश
८२. मा.पाडाळे निता विलास
८३. मा.विनोद जयवंत नढे
८४. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८५. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८६. मा.विमलताई सुरेश जगताप
८७. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८८. मा.बारणे निलेश हिरामण
८९. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९०. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९१. मा.बारणे माया संतोष
९२. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९३. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९४. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९५. मा.कलाटे स्वाती मयुर
९६. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९७. मा.चौंधे आरती सुरेश
९८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१००. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०१. मा.जवळकर वैशाली राहुल
१०२. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०३. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०४. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०५. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०६. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०७. मा.जम सोनाली पोपट
१०८. मा.प्रशांत शितोळे
१०९. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
११०. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१११. मा.गायकवाड संध्या सुरदास
११२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११३. मा.शेंडगे आशा सुखदेव
११४. मा.मोटे किरण बाळासाहेब
११५. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
११६. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
११७. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११८. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त,मा.झुरे-सह आयुक्त,मा.गायकवाड,मा.कारचे,मा.कुलकर्णी,मा.टेकाळे,मा.दुरगुडे,मा.माछरे,मा.फुंदे-सहा. आयुक्त,मा.गावडे नगरसचिव, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.तुपे-सहशहर अभियंता,मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.डॉ.रॉय-प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.पवन साळवे-अति.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर, मा.निकम, मा.पाटील, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.साळवी, मा.काची, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.तांबे, मा.सय्यद, मा.बरशेटटी कार्य.अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक),मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पवार - प्र.कायदा सल्लागार,मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर:-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

(१) सन २०१२-२०१३ च्या आर्थिक वर्षामध्ये दिलेल्या मोफत बस प्रवास पासेसची र.रु.२४,८५,३३,९२८/- अदायगीबाबत सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल -६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) से.क्र.१७ व १९ चिखली येथील चालू असलेल्या EWS Housing प्रकल्पाच्या जागेचे अधिमुल्य प्राधिकरणास (PCNTDA) देणेबाबत मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता –

अनुकूल -६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

---------

**मा.योगेश बहल**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील सर्व अधिका-यांनी गणवेश घातल्यामुळे बरे वाटले. परंतू †टीटयुड त्यासाठी पॉझिटीव्ह असला पाहिजे. मानसिकता पॉझिटीव्ह असली पाहिजे व त्यासाठी काही तरी केले पाहिजे. त्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

**मा.उल्हास शेटटी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सुप्रसिद्ध सिनेअभिनेते - प्राण, सतिश तारे-मराठी नाट्य अभिनेता,माधवराव कदम-पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी महापौर तात्यासाहेब कदम व स्थायी समिती माजी अध्यक्ष अशोकराव कदम यांचे बंधू क्षत्रिय मराठा वारकरी संस्थेचे अध्यक्ष व निवृत्त नायब तहसिलदार यांना श्रध्दांजली वाहून ही सभा दिनांक २६/०७/२०१३ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करावी अशी विनंती करतो.

**मा.नारायण बहिरवाडे** - मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

(मा.तानाजी शिंदे - अतिरिक्त आयुक्त यांनी परिचय करुन दिला.)

**मा.महापौर** - उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दिनांक २६/०७/२०१३ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८</u>

<u>मा.महापालिका सभा</u>

<u>कार्यपत्रिका क्रमांक – १९</u>

<u>सभावृत्तांत</u>

<u>(दिनांक २०.०७.२०१३ ची तहकूब सभा)</u>

<u>दिनांक – २६.०७.२०१३</u> <u>वेळ – दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे २० जुलै-२०१३ दिनांक २०/७/२०१३ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दि.२६.०७.२०१३ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.मोहिनीताई विलास लांडे - महापौर
२. मा.राजू मिसाळ - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
५. मा.भालेकर अरुणा दिलीप
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.सायकर अजय शंकरराव
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदीप (आबा) तापकीर
१५. मा.जगदिश शेटटी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२०.मा.पवार संगीता शाम
२१.मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२२.मा.तानाजी विठ्ठल खाडे
२३.मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२४.मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
२५.मा.भारती फरांदे
२६.मा.आर.एस.कुमार
२७.मा.जावेद रमजान शेख
२८.मा.चारुशीला प्रभाकर कुटे
२९.मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
३०.मा.नेटके सुमन राजेंद्र
३१.मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२.मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३३.मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४.मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५.मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६.मा.लोंढे गणेश नारायण
३७.मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३८.मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३९.मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४०.मा.अपर्णा निलेश डोके
४१.मा.अनंत सुभाष को-हाळे
४२.मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४३.मा.जयश्री वसंत गावडे
४४.मा.पवार मनिषा काळूराम
४५.मा.प्रसाद शेट्टी
४६.मा.अविनाश (दादा) टेकावडे
४७.मा.काळभोर वैशाली जालिंदर
४८.मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४९.मा.शेख अस्लम शैकत
५०.मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५१.मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५२.मा.वाबळे संजय मल्हारराव
५३.मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५४.मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग
५५.मा.सुपे आशा रविंद्र
५६.मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५७.मा.अजित दामोदर गव्हाणे
५८.मा.गोफणे अनुराधा देविदासमा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५९.मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६०.मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६१. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६२. मा.लोंढे शुभांगी संतोष
६३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
६४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६५. मा.सावळे सिमा रविंद्र
६६. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६७. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६८. मा.पालांडे सुजाता सुनिल
६९. मा.बहल योगेश मंगलसेन
७०. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
७१. मा.कदम सदगुरु महादेव
७२. मा.गिता सुशील मंचरकर
७३. मा.कैलास महादेव कदम
७४. मा.छाया जगन्नाथ साबळे
७५. मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव
७६. मा.वाघेरे सुनिता राजेश
७७. मा.आसवाणी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
७८. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव
७९. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
८०. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
८१. मा.काळे विमल रमेश
८२. मा.पाडाळे निता विलास
८३. मा.विनोद जयवंत नढे

८४. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८५. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८६. मा.विमलताई सुरेश जगताप
८७. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार
८८. मा.बारणे निलेश हिरामण
८९. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
९०. मा.आप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे
९१. मा.बारणे माया संतोष
९२. मा.ओव्हाळ शेखर अशोक
९३. मा.यमुनाताई रमणनाना पवार
९४. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
९५. मा.कलाटे स्वाती मयुर
९६. मा.नांदगुडे विलास एकनाथ
९७. मा.चौंधे आरती सुरेश
९८. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे
९९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
१००. मा.बोकड रामदास गेणभाऊ
१०१. मा.जवळकर वैशाली राहुल
१०२. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०३. मा.जगताप राजेंद्र गणपत
१०४. मा.शितोळे शैलजा बाबुराव
१०५. मा.जगताप नवनाथ दत्तु
१०६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
१०७. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
१०८. मा.जम सोनाली पोपट
१०९. मा.प्रशांत शितोळे
११०. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१११. मा.गायकवाड संध्या सुरदास
११२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
११३. मा.शेंडगे आशा सुखदेव
११४. मा.मोटे किरण बाळासाहेब
११५. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११६. मा.संजय केशवराव काटे
११७. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
११८. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
११९. मा.पाटील सुजित वसंत
१२०. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
१२१. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त,मा.झुरे-सहआयुक्त, मा.गायकवाड,मा.कारचे,मा.टेकाळे,मा.दुरगुडे,मा.माछरे,मा.फुंदे-सहा.आयुक्त,मा.गावडे-नगरसचिव,मा.कांबळे-प्र.शहर अभियंता,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.चव्हाण,मा.राजन पाटील, मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.डॉ.रॉय-प्र.आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.डॉ.देशमुख-वैद्य.संचालक, मा.पवन साळवे-अति.आरोग्य वैद्य. अधिकारी, मा.भदाणे-उपसंचालक (नगररचना),मा.दुधेकर, मा.निकम, मा.चव्हाण,मा.शरद जाधव, मा.चिंचवडे,मा.साळवी,मा.पठाण,मा.लडकत,मा.कुलकर्णी,मा.दांगट,मा.तांबे,मा.सय्यद-कार्य. अभियंता, मा.कांबळे-प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.साळुंके-मुख्य उद्यान अधिक्षक, मा.डॉ.गोरे-पशुवैद्यकीय अधिकारी, मा.चव्हाण-आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.शिंपी-नगररचनाकार, मा.अष्टीकर-जॉईंट एम.डी.,पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर:-** उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

-----------

अ) मा.महापालिका सभा क्र.१६ दि.२०/०४/२०१३, दि.०४/०५/२०१३ व दि.०९/०५/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----------

**<u>प्रश्नोत्तरे</u>**

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ४४ अन्वये)

--------------

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, शहरातील गंभीर प्रश्न आहे. तमाम सभागृहाचे त्याकडे लक्ष जावे म्हणून गेले महिनाभर होत असलेल्या पावसामुळे रस्त्यांची चाळण झालेली आहे. मध्यंतरी दोन दिवसांपूर्वी वर्तमानपत्रात बातमी आली होती. मा.शहर सुधारणा समितीच्या सभापती सन्मा.नगरसेविका सुपे यादेखील खड्यात गेल्या/ पडल्या अशी बातमी आली होती. प्रशासनाच्या वतीने खुलासा करावा की,

महापालिकेत खड्डे पडण्यासंदर्भात यंत्रणा आहे का? मध्यंतरी पेपरमध्ये आपले सुद्धा निवेदन आले होते. पावसाळ्यात झालेले खड्डे मोजता येणार नाहीत. खड्डयांमुळे अनेकांचे जीव मात्र त्यात जात आहेत. ही वस्तुस्थिती आहे. मी देखील अनेक ठिकाणी चौकाचौकांतून पडलेल्या खड्यांबाबतीत संबंधित अधिका-यांना सांगितले होते. परंतु ब-याचशा प्रकरणांत खड्यात पडणारा देखील नाही. पूर्वी पावसाळ्यात पडलेले खड्डे पेव्हींग ब्लॉक बसवून तात्पुरत्या स्वरुपात मलमपट्टी केली जायची. अलिकडे पावसाळ्यात कोणत्याही प्रकारचे पेव्हींग ब्लॉक बसवले जात नाहीत ही वस्तुस्थिती आहे. मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. कामाचा दर्जा प्रामुख्याने घसरला गेला आहे का, याचा सुद्धा खुलासा दिला गेला पाहिजे. डांबरीकरणासाठी कोट्यावधी रुपये महापालिकेकडून खर्च केले गेले आहेत. या सभागृहात यावर चर्चा झाली पाहिजे. शहरातील करदात्यांचा पैसा आजरोजी प्रामुख्याने खड्यात गेला असा यातून निष्कर्ष निघतो. म्हणून शहराची झालेली चाळण, खड्डे याबद्दल प्रशासनाकडून खुलासा करावा. प्रशासनाच्या वतीने पडलेले खड्डे बुजवण्यासाठी यंत्रणा नसेल तर का नाही याचा सुद्धा खुलासा प्रशासनाकडून करण्यात यावा.

**मा.अजित गव्हाणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.आप्पा बारणे यांनी जो विषय मांडला आहे. हा प्रश्न सर्व पदाधिका-यांच्या वॉर्डात आलेला आहे. याबाबत आपल्याला सूचना केली होती. पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात खड्डे झाले आहेत ही बाब आपल्या निदर्शनास आणून दिली होती. काम करायला ठेकेदार नाही. बदल्या केल्या त्यामुळे जुनी कामे किती शिल्लक आहेत हे नवीन अधिका-यांना माहित नाही. यासंदर्भात आपण किंवा सिटी इंजिनिअर यांनी बैठक घेऊन सूचना केल्या पाहिजे होत्या. त्या केल्या गेल्या नाहीत. पावसाळ्यात पूर्ण शहरात अशी परिस्थिती निर्माण होत असते. त्यावर उपाययोजना करायची गरज असते. तरीसुद्धा आपल्याकडून तसे झालेले नाही. याचा खुलासा सिटी इंजिनिअर यांनी करावा अशी विनंती आहे.

**मा.राजेंद्र काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्या आठवणीत असेल, आयुक्तांच्या ऑफीसमध्ये येऊन दापोडी सेक्टर २२बद्दल खड्यांविषयी चौकशी केली होती. ठेकेदार खड्डे बुजवणार होता. वृक्षारोपण कार्यक्रम करणार आहोत. दूर्देवी

अवस्था आहे. आपण इतके पैसे खर्च करतोय पण कोणतीही पॉलिसी नाही. पहिल्यापेक्षा वाईट परिस्थिती आत्ता झालेली आहे. मी सांगितले त्याप्रमाणे कृपा करुन केलेतर बरे होईल.

**मा.कैलास थोपटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच आमच्या सहका-यांनी खड्यांबद्दल सांगितले. पाऊस चालू असताना खरेतर आत्ता बघितले तर शहरात कोणत्याही रस्त्याला खड्डा नाही असा रस्ता राहीलेला नाही. मागिल वर्षी पेव्हींग ब्लॉक टाकून खड्डे बुजवले जात होते. आत्ता त्यात कुठेतरी मुरुम आणून खड्डे बुजवले जातात त्यामुळे ते पुन्हा आहे तसेच होतात. त्यामुळे सर्व शहर खड्डेमय झाले आहे असे म्हटलेतर वावगे ठरणार नाही. याबाबतीत ठोस निर्णय घेतला पाहिजे. खड्डा बुजवल्यानंतर महिनाभरात तो पुन्हा झाला नाही पाहिजे अशी आयुक्त साहेबांना विनंती आहे. दुसरा विषय म्हणजे कच-याची फार मोठी समस्या निर्माण झाली आहे. पुढारीमध्ये बातमी आली होती, ड प्रभागात जो कॉन्ट्रॅक्टर दिलेला आहे. कचरा उचलण्यासाठी कॉन्ट्रॅक्टरच्या गाड्या बंद असतात. दरवर्षी कच-याचा विषय मांडतो. प्रत्येक वेळी अधिका-यांकडून उत्तर येते, गाड्या बंद आहेत. प्रत्येक मिटींगमध्ये हा विषय होत असताना यावर कायमस्वरुपी सोल्युशन का निघत नाही? काहीतरी सोल्युशन यावर निघाले पाहिजे. गाड्या बंद आहेत असे उत्तर मिळाले नाही पाहिजे. प्रभाग अधिका-यांना बोलवून कचरा उचलला पाहिजे. नाहीतर संबंधित अधिका-यावर कारवाई झाली पाहिजे. कोणावर कारवाई होत नाही म्हणून सर्व निर्धास्त झाले आहेत. एक कच-याचा ढीग उचलायचे म्हटले तरी सगळे कचरामय झालेले असते. १० वेळा फोन करावा लागतो. प्रत्येक वेळी पेपरमध्ये बातमी येते. कोणाचेही याकडे लक्ष नसते. याकडे लक्ष देऊन कच-याची विल्हेवाट लागली पाहिजे. माझ्या प्रभागात ५०० फ्लॅटच्या सोसायट्या आहेत. कचरा उचलायला १ ट्रक लागतो. पण या सोसायट्यांमधील कचरा कचराकुंड्यांमध्ये येऊन पडतो. तो वेळेवर उचलला जात नाही. यासाठी सेपरेट नियोजन केले पाहिजे. कचरा उचलून ट्रकमधून गेला पाहिजे. यात लक्ष घालून पाठपुरावा करुन प्रश्न मिटवावा ही विनंती.

**मा.भाऊसाहेब भोईर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, निसर्ग नियमाप्रमाणे भारत देशात एकच ऋतू नाही तर तीन ऋतू आहेत. आपल्याकडे जूनमध्ये पाऊस झाला, हे जगातील आश्चर्य नाही की ऐतिहासिक घटना नाही. फक्त भारतातच नाहीतर जगात सगळीकडे पावसाचे प्रमाण कमी जास्त असू शकते. नैसर्गिक आपत्ती म्हणून अचानक विषय आणला जातो, ही गरज का पडते? सर्व अधिका-यांना स्वतःला कल्पना असायला हवी. भारतात मौसमी पाऊस पडतो. भारतीय त्याबाबतीत नशीबवान आहेत. कधीही पाऊस पडणार असे आपल्याकडे होत नाही. असे असताना आपण एक सक्षम यंत्रणा का उभी करु शकत नाही? एवढा मोठा जबरदस्त पाऊस झाल्यानंतर खड्डे हे पडणारच. या पार्श्वभूमीवर कायमस्वरुपी, सक्षम यंत्रणा उभी करावी. दुसरीकडे प्रभागनिहाय मिटींग घ्यावी. ४ महिन्यांत एकही निविदा आलेली नाही. स्थापत्य संदर्भात एकही निविदा प्रक्रिया झालेली नाही. खड्डे बुजवायचे राहिले आहेत. टेंडर शिल्लक आहे का नाही? प्रभागनिहाय माहिती घेतली तर एकही आदेश झालेला नाही. आपण त्यांना तातडीने सांगू शकता. कामे सुरु करा. हे सर्व करत असताना त्याचे नियोजन करावे. जे चालले आहे ते अत्यंत चुकीचे आहे. यासाठी चर्चा करत बसण्यापेक्षा आधी टेंडरचा कालावधी निश्चित करु शकतो. आपल्याला हा अधिकार आहे. याची अंमलबजावणी करावी. पिंपरी चिंचवडमध्ये किमान एवढी वाईट परिस्थिती नाही. मुंबई शहराइतका आपला विस्तार नाही. आपण कार्यक्षमतेने काम करु शकतो. या दृष्टीकोणातून आपण पाऊले उचलावीत अशी विनंती करतो.

**मा.मंगेश खांडेकर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आयुक्त साहेबांना विनंती आहे की, ६/७ महिन्यांपूर्वी तुम्हाला भेटून गेलो होतो, त्यावेळी सुद्धा सांगितले होते. पिंपरी चिंचवड शहरामध्ये पावसाचे पडणारे पाणी रस्त्यावरुन वाहून गेलेतर खड्डे पडणार नाहीत. रस्ते तयार करताना तशा सिस्टीमचे इम्प्लिमेंटेशन करु शकतो. याविषयी तातडीने चर्चा करावी.

**मा.अश्विनी चिंचवडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खड्ड्यांवर चर्चा झाली आहे, जास्त बोलणार नाही. खड्डे दुरुस्तीची कामे आत्ता चालू आहेत. त्यात अधिकारी, कर्मचारी, ठेकेदार शास्त्रीय पद्धतीने काम करतात. झोनपेक्षा शहराच्या बाहेर भागातील

रस्ते उखडले आहेत त्यामुळे अपघात होत आहेत. खडी उडून नागरीकांना लागते आहे. खड्डयांमध्ये खडी टाकली जाते. पण त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढते आहे. यामध्ये जातीने लक्ष घालून कारवाई करावी अशी विनंती करते.

**मा.राजेंद्र जगताप** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता या विषयाबद्दल चर्चा चालू आहे. पिंपरी चिंचवडमध्ये संपूर्ण रस्त्यांना एवढे खड्डे आहेत. तुम्ही सिंगापूरला गेलात तर तिथे परिस्थिती अशी आहे की, ५० कि.मी. पर्यंत तुम्ही गेलात तरी तुम्हाला एकही खड्डा दिसणार नाही. मी खास फोटो काढून आणला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना स्लोप असल्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर साचून रहात नाही. रस्त्याच्या मध्ये ६ इंचाचे डांबर टाकल्यामुळे पाणी कुठेही थांबत नाही. आपले सिंगापूर नाही. आपण वारंवार खर्च करतो. टू व्हिलरवाला असो, फोर व्हिलरवाला असो प्रत्येकजण रस्त्यावरून जाताना भ्यायला लागला आहे. रस्ते जास्तीत जास्त चांगले करावेत अशी विनंती करतो.

**मा.बाळासाहेब तरस** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, याठिकाणी खड्डयांवर चर्चा झाली आहे. आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, पुणे महापालिकेत खड्डे बुजवताना डांबर मिश्रित खडीने बुजवले जातात. पिंपरी चिंचवडमध्ये फक्त चिखलमिश्रित मुरुम टाकून खड्डे बुजवले जातात. पुण्यामध्ये जसा प्लॅन उपलब्ध आहे, त्याप्रमाणे पिंपरी चिंचवडमध्येही तशी दक्षता घेऊन प्लॅन करुन खड्डे शक्यतो डांबर मिश्रित खडीने बुजवावेत अशी विनंती करतो.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खड्डयांबद्दल आपली चर्चा चालू आहे. उपमुख्यमंत्री मा.अजित पवार यांच्याबरोबर नगरसेवकांची मिटींग झाली होती. त्यात विषय झाला होता. दरवर्षी हा प्रॉब्लेम येतो. इमर्जन्सी स्टाफ नसतो, काही व्यवस्था नसते. निदान प्रभागनिहाय एक गाडीतरी देण्यात यावी. आता एकूण ६ प्रभाग होणार आहेत. खड्डे बुजवण्यासाठी लागणारे साहित्य पावसाळा सुरु होण्यापूर्वीच तयार ठेवले, तसे त्याचे नियोजन केलेतर खड्डे बुजवायला कालावधी मिळेल व ब-याच प्रमाणात प्रॉब्लेम कमी होईल.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण प्रत्येक वर्षी खड्यांवर चर्चा करतो. आपल्याकडे खड्यांमध्ये माती भरतात. इतर शहरांत पावसाळ्यामध्येही खड्यांमध्ये डांबर टाकतात. एस.जी.एस कुठे गेले? त्यांना आपण .४ टक्के देतोय. रस्त्याच्या कामात चांगली क्वालिटी मिळाली पाहिजे. सुदैवाने माझ्या वॉर्डात जास्त खड्डे नाहीत. ते कशामुळे होतात? पूर्वी डांबरीकरण करताना ६ टक्के डांबर घेत होतो. आता ५ टक्के मिक्स करतात. शर्मा साहेबांच्या काळात ऑफीशियल डांबर मिक्सिंग कमी केले. आज ५ टक्के इतके प्रमाण केले आहे ही सत्य गोष्ट आहे. पूर्वी ६ टक्के इतके डांबराचे प्रमाण असताना रस्त्यावर स्मुथ फिनिशिंग असायची. ते बघून आता १० वर्षे झालीत. आता जो फोर्स निर्माण होतो त्यात पाणी जाते व त्यातून खड्डे होतात. मटेरिअल चांगले वापरले नाही, प्रमाणापेक्षा कमी डांबर वापरतात. हा निर्णय कोणत्या अधिका-याने घेतला. बाकी महापालिकांमध्ये असा निर्णय का घेत नाहीत याची माहिती मिळाली पाहिजे. ३५ ते ४० टक्के बिलो टेंडर मंजूर करतात. ३५ टक्क्यांमधले १० टक्के वाटपात जातात. २५ टक्के पार्टीचा प्रॉफीट. ठेकेदार एक रुपयात महापालिकेला काम कसे देणार? टेंडर ५० टक्के मंजूर केले तर तो तुम्हाला क्वालिटी देऊ शकेल. नाहीतर रस्ता खड्यात अशीच क्वालिटी मिळणार. माझ्या माहितीप्रमाणे दि.१३ मार्च १९८९मध्ये जी.आर. काढला होता. त्यात १५ टक्यांपेक्षा जास्त टेंडर मंजूर करायची गरज नाही. असे मला ऐकायला मिळाले. असे असताना २५ टक्के बिलो कशासाठी मंजूर करताय? बिलो टेंडर मंजूर केलेतर नुकसान होते. प्रायव्हेट कंपन्यांमध्ये ज्यावेळी पैसे वाटप करावे लागतात त्यावेळी ते टेंडरच्या प्राईसमध्येच †ड करुन देतात. टेंडर अमाऊंट फायनल केल्यानंतरच वाटप करतात. इतर शहरांमध्ये महापालिका, पी.डब्ल्यू.डी. यांच्याकडून जे रस्ते केले जातात, त्याप्रमाणे डांबराचे प्रमाण वाढवावे. डांबर कमी टाकायची गरज नाही. स्पेशली पिंपरी चिंचवडसाठीच असा निर्णय का घेतला? कोणत्या मुर्ख अधिका-याने असा निर्णय घेतला. एस.जी.एस.वर मला विश्वास नाही. त्यावेळी तत्कालिन आयुक्त श्री.दिलीप बंड यांनी सांगितले होते, एस.जी.एस. मुळे इंटर्नल ऑडीट होते. आपण इंडियन आहोत, ते काम करणारे सुद्धा इंडियनच आहेत. .४ टक्के, साईटमध्ये अर्धा टक्काही करतो. आपल्या अधिका-याने हे प्रमाण चेक केलेतर बरे होईल. एस.जी.एस. वर तुम्ही पुन्हा विचार करा. .४ टक्के घ्यायची गरज नाही. १५ ते २० वर्षे आपल्या अधिका-यांनी

काम केलेले आहे. सगळे डॉक्युमेंट, कन्सल्टंट यांच्याकडून येतात. मग यांचे काय काम आहे. यांना सुद्धा काम करु द्या. आपण डांबराचे प्रमाण वाढवावे. क्वालिटी कंट्रोलमध्ये सुद्धा आपल्या अधिका-यांना एक वेळ काम करु द्या. दुसरीकडे आम्ही लोक कामाबद्दल सांगत आहोत. इतर डिपार्टमेंटमध्ये अभियंत्यांना कामात लक्ष द्यावे लागते. आयुक्त साहेबांनी स्थापत्य विभागाचा पूर्ण स्टाफ अतिक्रमणाच्या कामासाठी घेतला होता. अधिकारी २० वर्षांपासून काम करत आहेत. मागे मला एक इंजिनिअर म्हणाला होता, एफआयआर दाखल करुन घेण्यासाठी आमचा अर्धा तास जातो. माझ्या प्रभागात १०० ते १५० एफआयआर दाखल झाले आहेत. स्थापत्य मध्ये ४०० एफआयआर केसेस दाखल आहेत. या कामाचे डिस्ट्रीब्युशन करुन दिलेतर टेंडर डॉक्युमेंट तयार करण्यासाठी जो वेळ लागतोय तो लागणार नाही. या लोकांना एकत्रित कम्पनसेशन द्यावे. आपण म्हणतोय अधिका-यांनी कामे केली पाहीजेत. संध्याकाळी ६.०० नंतर अधिकारी, कर्मचा-यांना ओव्हरटाईम किंवा काही मिळत नसेलतर कोण ऑफीसमध्ये बसणार आहे. अतिक्रमणाचे काम सांभाळून, एफआयआर दाखल करायचे काम करायचे हे काम करुन टेंडर काढायची. आपण सांगितले आहे, पण हे अधिकारी जुलै एण्डपर्यंत टेंडर काढू शकत नाहीत. कोणीही चॅलेंज करा, हे काढू शकत नाहीत. आत्ता १० ते १५ कामे काढणार. बाकी प्रोसेस ऑगस्टमध्ये करायची गरज नाही. त्यात १५ दिवस जाणार. त्यानंतर † ग्रीमेंट सगळ्या गोष्टी पूर्ण करायला सप्टेंबर, ऑक्टोबर, डिसेंबर जाणार. वारंवार ऑर्डर देऊन सुद्धा बजेट खर्ची होणार नाही. प्रत्येक नगरसेवक विकास कामे झाली नाही म्हणून बोंब मारणार. तुम्ही दिलेला पगार तुमच्या हाताखालची माणसे वापरत नाहीत. इंजिनिअर म्हणतात, प्रोव्हिजन नाही, कॉन्ट्रॅक्ट नाही. २,००० कोटींची कामे करताना छोट्या-छोट्या कामांसाठी सुद्धा प्रोव्हिजन नाही. प्रभाग अधिकारी त्यांच्या पॉवर्स कुठेही वापरत नाहीत. मग त्यांना पॉवर्स कशाला दिल्यात? ते एचओडी आहेत. तुम्ही स्वतः म्हणता त्यांना पॉवर्स आहेत. ७ दिवसांत टेंडर काढून खड्डे बुजवू शकता. या विषयावर खूप चर्चा झाली आहे. प्रभाग अधिकारी तुम्हाला घाबरतात त्यामुळे त्यांना दिलेल्या पॉवर्स ते वापरत नाहीत. अधिकारी खरी कामे करत असतील तर कमिशनर त्यांना पनिशमेंट देणार नाहीत. अधिकारी खोटी कामे करतात. तुम्ही छोटी-छोटी टेंडर काढायचे काम पावसाळ्यात का करत नाही? असे प्रभाग अधिका-यांना विचारले तर ते म्हणतात आम्हाला आयुक्त साहेबांची भिती वाटते.

कमिशनरांनी ज्यांनी खोटी कामे केली त्यांना पनिशमेंट केली आहे. सगळ्या अधिका-यांना शिक्षा केलेली नाही. प्रभाग अधिका-यांना १० लाख पर्यंत विषय मंजूर करायची पॉवर आहे. ती त्यांनी वापरलेली नाही. ते त्यांची पॉवर ७ दिवसांत वापरु शकतात. कितीही छोटे काम असलेतरी ते त्यांनी केले पाहिजे. प्रोव्हिजन नाही, बजेट नाही हे आम्ही ऐकून घेणार नाही. इमरजन्सी क्लॉज पद्धत करु शकतात. पूर्वी का केले नाही? अधिका-यांना भिती वाटते, ते करणार नाहीत. १० टक्के ऐवजी २० टक्के वाढ करु शकतो. इतकी प्रोव्हिजन असताना नगरसेवकांच्या छोट्या-छोट्या कामांना सुद्धा प्रोव्हिजन नाही. It is Shameful. इंटर्नल काम करायला पैसे नाहीत. तुम्ही महापालिकेत घाबरायचे कारण नाही. तुम्ही या लोकांना सांगा. ५०,००० चे काम कमिशनर यांच्या अप्रूव्हलमध्ये घ्या. अर्जंट काम आहे. कोटेशनमध्ये करुन का टाकले नाही? कमिशनर करणार नाही असे म्हणताय. एकट्या कमिशनरांचे नाव बदनाम का करतोय? तुमच्या लिमिटमध्ये जे काही असेल तर ते करा. प्रभाग अधिका-यांना भूमि आणि जिंदगीच्या पॉवर्स स्टँडींग कमिटीप्रमाणे दिल्या आहेत का. ते याचे अलॉटमेंट करु शकतात अशा पॉवर्स अधिका-यांना आहे का? अशा पॉवर्स अधिका-यांना नाहीत म्हणून ते करत नाहीत. तुम्हाला कोणी अधिकारी केले. दिलेल्या पॉवर्स वापरत नाहीत. फ्रस्ट्रेशन येते. अधिकारी नवीन नगरसेवकांना उत्तर देतात, प्रोव्हिजन नाही. यांना पुशअप करा. काम नीट केले नाहीतर पनिशमेंट करा. कमिशनर काही घोस्ट नाही.

**मा.महापौर** – संबंधित अधिका-यांना याबाबत खुलासा करावा.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रथमतः मी आयुक्त साहेबांचे अभिनंदन करतो. काही चुका आढळून आलेल्या आहेत, त्यामुळे खड्डे पडले आहेत. मुंबई, नागपूर इथे सुद्धा खड्डे आहेत. त्यापेक्षा पिंपरी चिंचवडमध्ये निश्चितच कमी खड्डे आहेत. पण कावळा बसायला व फांदी तुटायला एकच वेळ झाली. आपल्या चेअरमन मॅडम खड्यात पडल्या. याबद्दल ब-याचशा नगरसेवकांनी तक्रारी दिलेल्या आहेत. खड्डे होण्याला फक्त नगरसेवकच नाही तर अधिकारी सुद्धा कारणीभूत आहेत. यात लक्ष घालावे. माझ्या प्रभागात वेगळाच विषय आहे. माझ्या प्रभागात रेडझोन असल्यामुळे कामे निघत नाहीत. खड्डे भरण्यासाठी टेंडर नाही. माझ्या प्रभागात

टॉयलेट ब्लॉक्स नाहीत. त्याचा आऊटलेट गटारीला जोडलेला आहे. ही गटारे सुरु झाली आहेत. निगडीचे गटार डायरेक्ट पवना नदीला जाऊन मिळते. त्याठिकाणी मेंटेनन्स करण्यासाठी आपल्याकडे लेटर नाही. रेडझोन असेलतरी त्या भागातल्या नागरीकांना सेवासुविधा पुरवण्यासाठी कामे निघाली पाहीजेत. संबंधित अधिका-यांना आदेश द्या. त्या भागतली कामे सुरु करावीत.

**मा.शारदा बाबर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ता सगळे सत्ताधारी पक्षातील नगरसेवक बोललेत. आमच्यासारख्या नगरसेवकांचा हा खरेतर बोलण्याचा विषय आहे. खड्डे का पडतात ते समजायचे कारण नाही. मी नगरसेवक होण्या आधीपासून दरवर्षी पावसाळा आला की खड्यांचा विषय आलेलाच असतो. याच्या मागे भ्रष्टाचार आहे का. मेन कारण समजले पाहीजे. इथून पुढे खड्डे ज्यांच्यामुळे पडलेत त्यांना तुम्ही कामेच देऊ नयेत. याची दखल घ्यावी.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच ज्येष्ठ नगरसेवक मा.आर.एस.कुमार यांनी विषय मांडला. माझ्या प्रभागात पडलेले खड्डे बुजवायला बजेटमध्ये तरतूद नाही. त्यामुळे ते बुजवले जात नाहीत. सत्तारुढ पक्ष काय करतोय. नक्कीच खड्डे करत नाही. ते बुजवण्यासाठी भांडतोय. माझ्या प्रभागाचे आरोग्य धोक्यात आले आहे. तिथे कदम नावाची व्यक्ती नेमली आहे. अनधिकृत टप-यांवर कारवाई करणार असलात तरी पहिल्यांदा आरोग्य अधिकारी म्हणून त्यांची कामे व्यवस्थित होत नाहीत. प्रभागातील कचरा वेळेवर उचलला जात नाही. कचराकुंडयांची साफसफाई वेळेवर होत नाही. असे असताना त्यांची बीट निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. याचा खुलासा करावा.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, नेमेचि पावसाळा आला, अशा आपत्कालिन परिस्थितीत खड्डे बुजवण्यासाठी टेंडर नाही. काही सोयी नाहीत. यासाठी विनंती आहे, प्रभाग स्तरावर खड्यांसाठी ५० लाखाचे किंवा १ कोटीचे टेंडर रिझर्व्ह ठेवावे. याची तरतूद करत असाल तर पावसाळ्यामुळे खाणी पाण्याने भरल्या आहेत. माती मुरुम मिळते. एप्रिल किंवा मे महिन्यात चांगल्या प्रतीचा मुरुम प्रत्येक वॉर्डात २/४ गाड्या स्टॉक ठेवावा अशी विनंती आहे.

**मा.विनोद नढे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, २/३ दिवसांपूर्वी डांगे चौकातून जाताना एकाचा मृत्यू झाला होता. महापालिकेचे याबाबतीत दुर्देव म्हणायला लागेल. माझ्या प्रभागात एम.एम. विद्या मंदिर इथे रोज ३ ते ४ हजार जणांची ये-जा असते. तिथे गुडघ्यापर्यंत पाणी साचले आहे. दरवर्षी सूचना करुन सुद्धा अधिकारी भेटत नाहीत. अधिका-यांना अशा सूचना देऊन रस्ता दुरुस्त करावा अशी विनंती करतो.

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्वांनी खड्यांचा प्रश्न मांडला आहे. या विषयावर बोलणार आहे. मा.नढे यांनी हाच विषय याठिकाणी मांडला आहे. थेरगावात जाताना रस्त्याची दूरावस्था झाली आहे. थेरगाव परिसरात अनेक खड्डे येत आहेत. पिंपरी चिंचवड शहरात पावसाळ्यामुळे सगळीकडे खड्डे झाले आहेत. जर आपल्याकडे अचानक दूर्घटना घडलीतर त्याठिकाणी कारवाई करायची, लवकरात लवकर काम करुन घ्यायचे. प्रभागनिहाय, एस्टीमेट ब्लॉकवाईज लवकरात लवकर कामे व्हायला पाहीजेत. या कामांना फार वेळ लागतो. एम.एम. शाळेबद्दल ३/४ वेळा सांगितले होते. विद्यार्थ्यांचे एवढे हाल होत आहेत. पालकांना तिथे जाता येत नाही. उपमुख्यमंत्री मा.अजित पवार काळेवाडीत आले होते तिथे शाळेच्या रस्त्याची अशी अवस्था का आहे हे त्यांनी विचारले होते. मी देखील प्रभाग मिटींगमध्ये ३/४ वेळा हा विषय मांडला आहे. याबद्दल आमदार सुद्धा बोलले होते. तिथे असलेल्या सोसायट्या, विद्यार्थ्यांसाठी लवकरात लवकर काम केले पाहिजे. त्याठिकाणी चिखल होऊन बसला आहे. मुलांना शाळेत जाता येत नाही. आमची कामे पटकन होत नसतील तर एवढी श्रीमंत महापालिका असताना तिला गालबोट लागेल. माझी विनंती आहे की, खड्डे बुजवायचे काम लवकरात लवकर झाले पाहिजे. एम.एम. शाळेपाठीमागील रस्त्यावर डांबर टाकता आले नाहीतरी चांगला मुरुम टाकून किमान विद्यार्थ्यांना जाण्या-येण्यासाठी तो रस्ता झाला पाहिजे. माझ्या प्रभागात कच-याचा सुद्धा प्रश्न आहे. सोसायट्यांतील लोकांची अवघड परिस्थिती आहे. स्वच्छतेच्या काही अडचणी आहेत. त्या सुद्धा या पावसाळ्याच्या निमित्ताने दूर केल्या पाहिजेत. प्रभागात सुद्धा हा विषय मांडला आहे. हे अधिका-यांना करायला सांगितले पाहिजे. २/३ महिने झाले, थेरगावात लिकेज झाले आहे. पाण्याचा निचरा नीट न झाल्यामुळे खड्डे पडायला सुरुवात झाली आहे. आत्तासुद्धा तिथे खड्डे आहेत. हे काम सुद्धा लवकर होत नाही. नगरसेवकांच्या

तक्रारी लवकर दूर होत नसतील तर नागरीकांच्या तक्रारी कधी लवकर दूर होणार आहेत. त्या लवकर दूर झाल्या पाहीजेत ही नम्र विनंती आहे.

**मा.अनिता तापकीर** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सभागृहात खड्यांविषयी चर्चा चाललेली आहे. शहरात सतत पाऊस पडतोय. जे खड्डे झाले आहेत, त्याविषयी सूचना करायची आहे, कार्यकारी अभियंता यांना महापालिकेच्या गाड्या दिलेल्या आहेत. त्यांनी गाड्या घेऊन पाऊस असताना शहरातून फिरावे. तर ही समस्या येणार नाही. शहरात खड्डे दिसणार नाहीत. शहरातील मुलांना त्रास होणार नाही. अधिका-यांना जशी सभागृहात बसायला ड्रेसची सक्ती केलेली आहे, तशीच त्यांना गाड्यांतून वॉर्डामध्ये फिरायला सुद्धा सक्ती करावी. म्हणजे खड्यांविषयी सभागृहात जी चर्चा चालू आहे ती पुन्हा होणार नाही एवढी विनंती करते.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर माझ्या वॉर्डात खड्डे भरपूर झाले आहेत. खरेतर परमेश्वराला देखील अपेक्षित नसेल, या शहरात एवढे खड्डे पडतील. माझ्या वॉर्डात मोठमोठे खड्डे पडले आहेत. नेमकी ज्यावेळी गाडी जाते, त्यावेळी अपघात झालेला असतो. रस्ता मोठा किंवा छोटा असो अपघात होतो. आमच्या चेअरमन पडल्या. त्यांना कुठेही लागले नाही. पण जेव्हा वयस्कर व्यक्ती, महिला, लहान मुले पडतात, यात एखाद्याचा जीवसुद्धा जाऊ शकतो. याकडे गांभीर्याने पाहीले पाहिजे. बिगर टक्यांचे टेंडर काढा. रस्ता बिगर खड्यांचा किमान ५ वर्षे तरी राहील. पेपरमध्ये बरीचशी चर्चा येते. बिगर टक्यांचे टेंडरने कामे केलीत तर बिगर खड्यांचा रस्ता नक्कीच याठिकाणी होईल. दरवर्षी जेव्हा चिखल होतो, मुरुम टाका म्हणून सांगतात. हमखास तो मुरुम मातीमिश्रित असतो. खर्चिक नसतो. त्यामुळे परत खड्यांचा रस्ता चिखलाचा रस्ता होतो. कुठला खड्डा, कुठला रस्ता कळत नाही. चांगल्या प्रतीचे मुरुम देऊन तातडीने काय करता येईल ते करु शकतो. खड्यांसाठी एक हेड सुद्धा निर्माण करावे. त्याचे नियोजन करुन ते बुजवले पाहिजेत अशी अपेक्षा याठिकाणी आहे. सगळे बोलले. खड्डे हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. याबद्दल सारासार विचार करावा. जसे वाघेरे ताईंना सांगितले, बेकायदेशीर बांधकामाची नोंद तत्परतेने करतो, त्याच पद्धतीने खड्यांची नोंद आपल्याकडे ठेवावी. जो रोड कोणत्या

ठेकेदाराने केला आहे, त्याच्यावर कारवाई करा. ज्या इंजिनिअरच्या निरीक्षणाखाली या रोडचे काम पार पडले त्याच्यावर कारवाई करा. म्हणजे खड्डे व्हायचे बंद पडतील. आपल्याला बेस्ट सिटी पुरस्कार मिळाला आहे. आता हे शहर खड्यांचे शहर कोणी म्हणू नये अशी अपेक्षा व्यक्त करते.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या वर्षी नेहमीपेक्षा पाऊस जास्त आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सर्व महापालिकांत, सर्व वर्तमानपत्रांचे पृष्ठभाग खड्यांच्या चित्रांनी व्यापलेले आहेत. पिंपरी चिंचवड शहर यापेक्षा वेगळे नाही. परंतू एक गोष्ट याठिकाणी नमूद करावयाची आहे की, या शहराचा काही भाग चांगल्या पद्धतीने विकसित झाला आहे, त्याठिकाणी खड्यांची परिस्थिती एवढी गंभीर नाही. परंतू जो भाग महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेला आहे. त्याठिकाणी खड्डे बुजवण्यासाठी डांबरी रस्त्यांची गरज आहे. आमच्या भागात रस्ताच नाही. त्यामुळे खड्डे बुजवायचा प्रश्नच निर्माण होत नाही. मातीचे कच्चे रस्ते आहेत. त्यांना दलदलीचे स्वरुप निर्माण झाले आहे. अत्यंत दयनीय अवस्था आहे. अजून टेंडर प्रोसेस झालेले नाहीत. शहर अभियंता किंवा कार्यकारी अभियंता यांना नम्रपणे इथे उभे राहून रिपोर्टींग द्यावे ख-या अर्थाने शहरात खड्यांमुळे एवढे अपघात होत आहेत. याचे रिपोर्टींग केले आहे का. खरेतर रिपोर्टींग सभागृहामध्ये सादर केले पाहिजे. किती प्रमाणात व कशा पद्धतीने खड्डे पडले याचा खुलासा आपण निश्चितपणे करावा. खरेतर याचे रिपोर्टींग देखील होते का हे सभागृहाला सादर करावे. मा.आर.एस.कुमार यांनी खड्यांविषयी अधिका-यांना विचारले तर त्यांनी तरतूद नाही असे सांगितले. ते असेच म्हणतात. नन्हाचा पाढा चालू आहे. यातून नकारात्मक मानसिकता सुरु होते. पोषाख बदलून मानसिकता बदलणार नाही हे मा.योगेश बहल यांनी मागिल सभेमध्ये सांगितलेच आहे. नकारात्मक मानसिकतेचे खड्डे पहिले भरा म्हणजे ख-या अर्थाने शहराचा विकास होईल. अधिकारी तुम्हाला किती घाबरतात. चांगली कामे करायला सुद्धा घाबरतात. तुमच्या लक्षात येत नाही. आयुक्तांनी याचे निरीक्षण मुल्य मोजावे. अधिका-यांनी चांगली कामे करावीत. आम्हाला बोलायची गरज पडणार नाही. आपण अधिका-यांची कानउघडणी करायला पाहिजे. क्लॉज देऊन टाकला तरी परिस्थितीनुसार टेंडर काढले जाते. हे अधिका-यांना माहित नाही का. च-होलीच्या ग्रामीण भागात मुरुम मुरुम करत

होतो. तो मिळाला नाही. मातीचा मुरुम मिळाला. आपले अधिकारी इथे अजिबात फिरकत नाहीत. स्वतः नगरसेवक मुरुम आणून टाकतात. एवढी त्यांनी अक्कल गहाण ठेवली आहे. याचे वाईट वाटते. शहराचे शांघाय होईल अशा गप्पा मारतो. परदेशात ज्या पद्धतीचे रस्ते अहेत, ते किती चांगल्या पद्धतीचे आहेत. या खड्यांना केवळ अधिकारीच कारणीभूत नाहीत तर सगळेच कारणीभूत आहेत. खरेतर रस्त्यांवर खड्डे पडायचे कारण टक्केवारी हे आहे. मला वाटते, आपले शहर सुद्धा इतर शहरांप्रमाणे चांगले करायचे असेलतर कोणीही इथे टक्केवारीसाठी सभागृहात आलेला नाही. चांगले करण्यासाठी सगळ्या नगरसेवकांची साथ आहे. अधिका-यांच्या सवयी बदलायची गरज आहे. एस.जी.एस.चे रिपोर्टींग यात सुद्धा मिलीभगत होते. खोटे रिपोर्टींग केले जाते. संगनमत होते. त्याठिकाणी चुकीचे मटेरिअल वापरले जाते. या सर्व गोष्टी किती वर्षे चालू आहेत हे उघड्या डोळ्यांनी पाहतोय. यासाठी आम्ही निवडून आलेलो असलो तरी माझ्यासारख्या नगरसेवकाला यापुढे हे पाहणे शक्य नाही. अतिशय शरम वाटते. अतिशय पारदर्शकपणे कामे करावीत. पिंपरी चिंचवड शहरवासियांची नगरसेवकांकडून अपेक्षा आहे की, आमच्याकडून काहीतरी चांगले काम व्हावे म्हणून चांगल्या पद्धतीने शहराचे नियोजन होईल. चांगले कन्सल्टंट असले तरी रस्ते पाहीलेतर तसे वाटत नाही. कोणत्याही प्रकारचे टेक्निक न वापरता ढोबळ पद्धतीने रस्ते केले जातात. अतिशय दूर्दैवी गोष्ट आहे. याठिकाणी लक्ष घालावे एवढी प्रार्थना करतो. तुम्ही स्वतः येऊन बघा परिस्थिती काय आहे. मला नगरसेवक होऊन ऑक्टोबरमध्ये दीड वर्षे पूर्ण होणार आहेत. आमच्याकडे अजूनही रस्ते झालेले नाहीत. २ दिवसांपासून माझ्या वॉर्डात पाणी नाही. आज तिसरा दिवस आहे. अधिकारी वर्ग पुढे रेटून नेतात. काही ठिकाणी २४ तास पाणी, आमच्याकडे पाणी नाही पण आम्ही काही करु शकत नाही. मी याचा जाहीर निषेध करतो. एका भागात २४ तास पाणी देता आणि एका भागात अर्धा तास सुद्धा पाणी देऊ शकत नाही. आम्ही पावसाचे पाणी प्यायचे का. याची चौकशी करा. अधिकारी फक्त ऑफीसमध्ये बसतात, प्रभागांमध्ये फिरत नाहीत. यांना घाणेरडी सवय लागली आहे. यांचा १ महिन्याचा पगार कपात करा. क प्रभागातील सर्व अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई म्हणून त्यांचा १ महिन्याचे वेतन कट करा अशी नवीन समाविष्ट ग्रामीण भागाच्या वतीने मागणी करतो. मला अपेक्षा आहे की, आपण माझी मागणी पूर्ण कराल. शहर अभियंता यांनी खुलासा करावा. शहरात मोठमोठे खड्डे

पडलेले आहेत. त्याविषयी सांगू शकत नसालतर शहराची आजची परिस्थिती काय आहे. इतके निष्क्रिय प्रशासन दुसरे नाही. तुम्ही मला बोलायची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद!

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमची गावे महापालिकेत समाविष्ट होऊन १७ वर्षे झाली. च-होलीत वाईट परिस्थिती आहे. पुनावळेतले रस्ते तर मृत्यूचे सापळे झालेले आहेत. दर महिन्यात एका मनुष्याचा मृत्यू होत असतो. खड्डे बुजवत नाहीत. लोक खाली पडतात. मुरुम टाकला तर त्याचा गाळ होतो. त्यादिवशी पालखी आलीतर अशीच परिस्थिती झाली, एवढे लोक घसरून पडले. २०० लोक पडले. अग्निशामक दलाची गाडी पाठवली. आळंदीकडे जाणारा रस्ता नक्की कोणाकडे आहे याची उत्तर कोणी देत नाही. आळंदीच्या रस्त्याविषयी १७ वर्षांपासून मागणी करतोय, तो काणी घेत नाही. हा रस्ता विभागीय आयुक्तांकडे वर्ग असल्याचे वारंवार उत्तर दिले जाते. या रस्त्यावरून असंख्या वारकरी येत असतात. पुणे-मुंबई रस्त्यानंतर आळंदी रस्त्यावरच जास्त रहदारी चालू असते. म्हणून माझी विनंती आहे, हा रस्ता होण्यासाठी पाठपुरावा करावा व रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी प्रयत्न करावा.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खड्यांबद्दल बरेच नगरसेवक बोलले यावरुन याचे गांभिर्य कळते आहे. पाऊस व खड्यांचे जवळचे नाते आहे. आपण स्टॉर्म वॉटर चांगल्या पद्धतीने डेव्हलप केले नाही म्हणून माझी विनंती आहे की, खड्डे बुजवत नसल्यामुळे त्यावर साचलेल्या पाण्यामुळे रस्ते खराब होत आहेत. रस्त्यांवर पाणी साचले नाही पाहीजे. मा.आर.एस.कुमार यांनी सांगितल्याप्रमाणे 10 वर्षांपूर्वी डांबराचे प्रमाण कमी केले होते. 2005 पासून पावसाचे प्रमाण वाढले आहे, त्याप्रमाणात डांबराचे प्रमाण सुद्धा वाढायला पाहीजे होते. गल्लीबोळांत स्टॉर्म वॉटर सिस्टीम केली पाहीजे. कासारवाडीत गेल्या 15 दिवसांपासून 110 घरे ड्रेनेजच्या पाण्यामध्ये होती. रस्त्यांची क्वालिटी सुधारण्यासाठी प्रथम स्टॉर्म वॉटर सिस्टीमचा विचार करावा.

**मा.सुलभा ऊबाळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खड्यांवर बोलले ते सगळे कार्यक्षम नगरसेवक व ज्यांच्या वॉर्डात खड्डे नाहीत ते बोलले नाहीत. मा.शहर

सुधारणा समितीच्या अध्यक्षा मा.सुपे ताई यांचे आभार मानले पाहिजेत. आपण खरे सांगितल्यामुळे ते सगळ्यांच्या लक्षात आले. तासभर खड्यांचा विषय रंगणार. आपण सकाळी 9 पासून रात्री 9 पर्यंत मिटिंगमध्ये व्यस्त असता. शहराच्या कामकाजात सुधारणा करण्यासाठी जाणिवपूर्वक मिटींगज् घेत केडर पद्धतीने सुरुवात केली आहे. आपल्या चाणाक्ष, दक्ष नजरेतून खड्डे कसे सुटले असा प्रश्न मला पडला आहे. याचा एवढा ऊहापोह व्हावा. अतिक्रमण कारवाई, पंचनामा, पूररेषा यातून वेळ मिळत नसावा. शहरातील एवढा मोठा खड्यांचा विषय आपल्या नजरेतून सुटलेला आहे. मा.महापौर साहेब, खड्डे या विषयावर बराच वेळ चर्चा झाली आहे. याठिकाणी छोट्या रस्त्यांवर, मोठ्या रस्त्यांवर सुद्धा खड्डे पडलेले आहेत. ज्याठिकाणी ट्रान्स्पोर्ट, वाहनांची रेलचेल जास्त चालू असते, जिथे जड वाहनांची रेलचेल चालू असते तिथे जास्त खड्डे होतात. कालच स्टँडींग चेअरमन म्हणत होते, सिमेंटचे रस्ते असावेत. महत्वाच्या ठिकाणी सिमेंटचे रस्ते केले गेले पाहिजेत. वाहनांची रेलचेल जिथे जास्त चालू असते तिथे सिमेंटचे रस्ते केले तर अशा प्रकारचे खड्डे पडणार नाहीत. दुसरा विषय महत्वाचा आहे. चौकाचौकांमध्ये जनावरे व कुत्री फिरत असतात. त्यामुळे अपघात घडतात. कुत्र्यांचा विषय सुरु झाला की तासभर तरी चर्चा सुरु राहू शकते. मी या विषयावर परत बोलणार नाही. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गोरे यांचा फोन नंबर तर प्रत्येक नगरसेवकाकडे असतोच. त्यांना फोन केला नाही असे कोणी सापडणार नाही. परंतू डॉ.गोरेंना फोन केल्यानंतरच कुत्र्यांना पकडणारी टीम व त्यांची गाडी येते. असे म्हणतात की, कर्मचारी नगरसेवकाच्या घरी येऊन सही घेऊन जातात. आम्ही आलो परंतू कुत्री सापडली नाहीत. आत्ता कुत्र्यांबाबत सांगायचे म्हटलेतरी एकटी दुकट्याने कुत्री फिरत नाहीत तर टोळक्याने फिरत असतात. चौकाचौकातून दबा धरुन बसलेले असतात. सगळ्यांनी एकी करुन जायचे दिवस असल्यामुळे बहुतेक कुत्र्यांनी सुद्धा युती केलेली दिसते. कुत्री एवढी हुशार झाल्यामुळे कुत्र्यांची गाडी आल्यानंतर त्यांना वास येतो का काय, ती पळून जातात. एक संस्था आहे. कुत्री पकडल्यानंतर पैसे देणार आहेत. परंतू त्यांच्याकडून कधी अहवाल घेतला नाही. डॉ.गोरे वेगवेगळ्या कामांत व्यस्त असतात. ही संस्था अत्यंत बेजबाबदार आहे. त्यांच्याकडून काम होत नाही. असा नियम आहे, ज्या जागेवरुन कुत्री पकडून नेली, त्याच जागी लसीकरण करुन परत सोडायची. म्हणजे अवघड उपक्रम आहे. त्याला कायद्याचा फार मोठा भाग आहे.

तुमच्याशी याविषयी भांडू शकणार नाही. परंतू अशा शहराच्या बाहेर कुठे पॉईंट आऊट करुन कुत्र्यांना मारणारे मारु शकत नाही. कायद्याने बंदी आहे. मोकाट जनावरे कुठून आलीत त्याचठिकाणी त्यांची वेगळी व्यवस्था करावी. तिथे त्यांच्यावर औषधोपचार करावेत. त्यांच्यासाठी वेगळा मतदारसंघ किंवा वॉर्ड केलातर यास कोणाचीही हरकत नसावी. लहान-लहान मुले शाळेत सायकल वरुन किंवा चालत जातात. त्यांच्या पाठीमागे ही जनावरे लागतात. नंतर त्यांच्या आया आमच्यावर कुत्र्यासारख्या ओरडतात. त्यांच्या मुलांच्या जिवाला धोका झालेला आहे. सकाळी सकाळी असे फोन घेणेसुद्धा असह्य होते. जेव्हा खड्यांच्या विषयावर खुलासा कराल, तेव्हा या विषयावर निश्चितपणे खुलासा व्हावा. आपल्या सगळ्या नगरसेवकांना नागपंचमी संदर्भात पत्र लिहिले आहे, 8 वॉर्डांत कुठेही नागपंचमी साजरी होऊ नये. आम्हाला सुद्धा महापालिकेच्या आवारात येऊन नागपंचमी साजरी करावी लागेल. आपण सगळ्या शहराचे महापौर आहात. सगळ्या नगरसेवकांवर सगळीकडे सारखी कृपादृष्टी ठेवावी. सगळ्यात आनंदाची गोष्ट म्हणजे मा.मंगलाताईंच्या वॉर्डातील सर्पउद्यानामध्ये फक्त नागपंचमी साजरी व्हावी.

**मा.कांबळे (**शहर अभियंता**)** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,महापालिकेच्या हद्दीत खड्यांसंदर्भात सन्मा. सदस्यांनी जे प्रश्न मांडलेले आहेत. पण या वेळेला दि.३१ मार्च पर्यंत सर्व खड्डे भरलेले होते. परंतू या पाऊस सलग महिनाभर चालू असल्यामुळे खड्डे बुजवायला जी उघडीप पाहिजे ती मिळत नसल्यामुळे खड्डे बुजवायला वेळ मिळत नव्हता. १/२ दिवसांत उघडीप मिळाली तर ते नक्की बुजवण्यात येतील. मा.आप्पा बारणे यांनी सांगीतले, खड्डे भरले जात नाहीत. ड प्रभागात खड्डे भरायची कारवाई चालू आहे. मा.आर.एस.कुमार यांनी सांगीतले डांबरीकरणाचे दर प्रमाणापेक्षा जास्त आहेत. डांबरीकरणाचे दर १५ टक्के किंवा त्याच्या खाली आहेत. पूर्वीपासून जे दर ठरवले आहेत, फायनल झालेले आहेत, त्याप्रमाणेच काम करु. सद्यस्थितीत तात्पुरता उपाय म्हणून मुरुम भरतोय. आत्ता मुरुम मिळतोय, तो तसाच मिळतोय. माती वाटते. २/३ दिवसांत उघडीप मिळाली तर खड्डे भरु. मागील महिन्यात सर्व कार्यकारी अभियंत्यांना आदेश दिलेले आहेत. मी माझ्या स्तरावर मिटींग घेतो आहे. खड्डे भरले जातील. डांबरीकरणाने खड्डे भरुन घेऊ. वेगवेगळ्या प्रभागांतून बजेटमध्ये प्रोव्हिजन

नाही अशा तक्रारी येतात, असे सांगण्यात येते. परंतू अशी परिस्थिती नाही. बजेटमध्ये प्रोव्हिजन नाही म्हणून खड्डे भरत नाही अशी परिस्थिती नाही. मा.झामाबाई बारणे यांनी ज्या रस्त्याचा उल्लेख केला तो रस्ता प्राधिकरणात असल्यामुळे आपण त्यांना तसे पत्र लिहिलेले आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सिटी इंजिनिअर यांनी जे सांगितले ते मला थोडे-थोडे मान्य आहे. म्हणजे कुणाचा तरी जीव गेल्यानंतर प्रशासन त्या मनुष्याचा जीव भरु देणार आहे का? त्याचे दवाखान्याचे बील भरुन देणार आहे का? वायसीएममध्ये सुद्धा बील मंजूर करत नाहीत. आपली मिटींग झाली नव्हती का? आयुक्त साहेबांनी खुलासा करावा. आपल्या कक्षात अशीच मिटींग झाली का नाही. चर्चा झाली असलीतरी कमिश्नर यांना सुद्धा कळू दे. मिटींग झाल्यानंतर सुद्धा एवढे सभागृह बोलते. नगरसेवकांना रोडवर कामाला घ्या. कचरा कुंड्या भरुन वाहतात. मुरुमावरुन वाहने घसरतात. कुठेतरी अशी घटना झाली, कोणी घसरून पडले की नगरसेवकाने फोन करायचा. मोठा खड्डा पडल्यानंतर रात्री सव्वा १ वा. मला फोन करावा लागला. जोपर्यंत खडी जात नाही, तोपर्यंत खड्डे बुजवले जाणार नाहीत. हे नगरसेवकांचे काम आहे का? याबाबत मिटींग झाली असताना खड्डे या विषयावर सभागृहाला का बोलावे लागते. कच-याची सुद्धा हीच परिस्थिती आहे. आत्ता मा.थोरात साहेब बोलले, आमची गाडी फेल झाली. रोड स्ट्रूपर २.०० वा. भेटायला येत नाही म्हणजे शहराची परिस्थिती अजिबात चांगली नाही. मागील वेळी सुद्धा महापालिका सभेआधी फोन करुन सांगितले होते. नगरसेवकाच्या मनात गुंता होतो. मग तो राग निघतो. मग नगरसेवकाची चांगली मानसिकता रहात नाही. कमिशनर यांनी विषय दिला म्हणजे घरचा विषय नाही. चांगली कामे करण्यासाठी सुद्धा मानसिकता रहात नाही. परत परत तेच विषय़ येतात. रेड झोन आहे म्हणजे शास्तीकर लावत नाही. का म्हणून तिथे मुरुम टाकायचा नाही. त्यांना बेसिक सुविधा दिल्या पाहिजेत. आपण जेएनएनयूआरएमची घरे कशाला बांधून द्यायची, सुविधा द्यायच्या. कामकाज बंद केलेतर बरे राहिल. सगळी सेवा देऊन सुद्धा त्यांनी काही कामच करायचे नाही. तुम्ही आल्यानंतर मिटींग घेतली, आधी मिटींग घेतली नव्हती. तुमच्यासारख्या अधिका-याकडून अशी अजिबात अपेक्षा नाही. तुमचा धाक अधिका-यांवर राहिलेला आहे का. तुम्ही स्वतःला विचारा. तुमचा धाक

असतातर शहरात एकही खड्डा दिसला नसता. नगरसेवक कमिशनरांकडे अधिकृत कंम्प्लेण्ट करतील. प्रत्येकाला वाटले असते, इथे कुठे धाक वाटतोय का. नुसता बाऊ केला आहे. एवढा कोणीही पडला तरी म्हणायचे, वाघोबा आला, वाघोबा आला. एखाद्या दिवशी वाघोबा खराच आला तर काय होईल, त्यालाच कळायचे नाही. कमिशनर तुम्हाला सगळे घाबरतात. तुमच्या चेह-यावर किंचित हसू आले. राजकारणात शहरात कामे होणे गरजेचे आहे. सुलभा ऊबाळे ताईंनी सांगितले, ही अत्यंत खरी परिस्थिती आहे. डॉ.गोरे यांना कधीही फोन करा. ते म्हणतात, मला माहित आहे. त्यांना फोन करायची गरज वाटत नाही. १५/२० कुत्री जिथून पकडली तिथेच सोडली जातात. माझ्या माहितीप्रमाणे त्यांचे रिपोर्ट चेक करा. ४ महिन्याच्या पिल्लावर सुद्धा नसबंदीचे ऑपरेशन केले आहे. कसे केले, कशासाठी केले. त्यांना एवढे पैसे देतोय. कुठेतरी अधिका-यांना आदेश द्यावेत. खरोखरच वाईट परिस्थिती आहे. उद्या आम्ही बोललो नाहीतर खड्डे पडल्यामुळे अपघात घडतो, एखादी दूर्देवी घटना घडलीतर. शहरावर राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची सत्ता आहे. पुण्यातला पहिला फोटो बघा. आलेला गंभीर जखमी आहे. खरोखरच आशाताई सभेला आल्या आहेत. त्या म्हणाल्या, मला एवढे लागले नाही. आज एक नगरसेविका बोलते. नगरसेवकांना हे बोलायची वेळ का आली पाहिजे याचा खुलासा तुम्ही करा. मिटींग झाल्यानंतर एवढे नगरसेवक का बोलले. बीट निरीक्षकाबद्दल सांगणार आहे. माझ्या भागातील सुपरवायजर पाटील यांना बोलले तर ते म्हणाले, माझ्या घरातले दुसरे काम आहे. माझ्याकडे २०० अनधिकृत बांधकामांच्या नोंदी करायचे काम आहे. तुमचे काम नंतर करु. अधिका-याने नक्की कोणते काम करायचे याची खरेतर व्यवस्थित व्यवस्था लावा. आशाताईंनी सांगितले ती गोष्ट खरी आहे. सत्य परिस्थीती आहे. बीट निरीक्षकांना डबल कामासाठी नेमले आहे. डबल चार्ज असल्यावर कसा त्रास होतो. पीएमपीएमएलमध्ये काहीतरी करण्यासारखे तरी आहे. मिटींग घेणार असाल तर त्यावर एवढ्या लोकांनी बोलावे हा तुमचा अपमान आहे. तुम्ही स्वतःला असे समजता, त्यादृष्टीने काम करावे.

**मा.आर.एस.कुमार**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,पूर्वी ऊगीले साहेब आले त्यावेळी डांबराचे प्रमाण कमी केले असे म्हणायला पाहीजे. चुकीचे उत्तर दिले आहे. डांबर

वाढवून द्यायला काय हरकत आहे. डांबर कमी केले म्हणून खड्डे झाले. 5 टक्के प्रमाण केलेतर ठेकेदार 4.5 टक्के टाकतो. त्यांना परत उत्तर द्यायला सांगा.

**मा.निर्मला काळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, डुकरांबाबत तक्रार करुन सुद्धा, पाठपुरावा करुन सुद्धा अधिका-यांची मानसिकता तयार नाही. याबद्दल डॉ. गोरे व आयुक्तांकडे तक्रार केली आहे. तरी काम पूर्ण झालेले नाही. स्वच्छतेबद्दल बोलले. नागरीकांना त्रास होतो आहे. तसेच शारिरीक इजा झाली आहे या तक्रारीची दखल घ्यावी.

**मा.संगिता भोंडवे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वाल्हेकरवाडीत आलात तर तुम्हाला खड्डे बघून वाईट वाटेल अशी अवस्था आहे. दर ८ दिवसांत एक गडी मारला जातोय. माझ्या प्रभागात खड्डे बघायला यावे अशी आयुक्त साहेबांना विनंती राहिल.

**मा.वसंत लोंढे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खड्यांवर सगळेच नगरसेवक बोलणार आहेत. पाऊस पडल्यानंतर खड्डे पडत असतात. आपण टिव्हीत रोज पाहतोय. सगळ्या शहरांत खड्डे पड़ले आहेत. परंतू पुण्यातील जंगली महाराज रोड ३० वर्षांपूर्वी केलेला आहे. तिथे ठेकेदाराने १० वर्षांची गॅरंटी दिली होती. आजही रस्ता क्लिन आहे. आपण मिटींग लावली. शहरातील पूर्ण रस्ते तयार झाले त्यानंतर मिटींग लावली. आपली कामाची क्वालिटी, पद्धत बघा. डांबर म्हणून विशिष्ट काळे ऑईल घालतात. फक्त डांबरासारखा रंग येतो. तुमचा काही दोष नाही. मुळ मुद्दा आहे की डांबर वापरत नाहीत. काळे ऑईल वापरतात. खड्डे झाल्यावर त्यावरुन वाहने गेल्यावर रस्त्याची किती वाट लागते हे सुद्धा पाहिले पाहिजे. रोड करण्याआधीच खबरदारी घ्या. इंजिनिअर यांनी रस्ता व्यवस्थित झाला का नाही हे पाहिले पाहिजे. पाणी साचल्यानंतर खड्डे तयार होणारच. ग्रामिण भागाचा प्रश्नच नाही. रस्तेच नाहीत त्यामुळे खड्डे नाहीत. रेडझोनमुळे दुर्लक्ष झालेले आहे. नुसता मुरुम सुद्धा टाकलेला नाही. मनपा हद्दीत नसताना बोपखेल, च-होली इथे आपण पाणी दिलेले आहे. आता नुसता मुरुम सुद्धा टाकला जात नाही. माझ्या वॉर्डात जनावरे रस्त्यात बसतात. जनावरांना कोंडवाड्यात घातले पाहिजे. प्रामुख्याने खड्यांवर काम करताना प्रथमतः रस्ता करा मग इंजिनिअर आहे का ते पहा. डांबरीकरणाचा ठेकेदार नसतो. आपण फक्त

मलमपट्टी करत असतो. पाऊस आल्यावर रस्ता उखडतो. क्वालिटी बरोबर नाही याकडे लक्ष द्या, निश्चित खड्डे कमी होतील.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,खरेतर खड्यांच्या याविषयात मा.आप्पा बारणे यांनी विषय घेतला त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानतो. सर्वांना सभागृहात प्रत्येकाच्या वॉर्डात कामाच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड महापालिका खड्यात गेली का काय असे जवळपास या चर्चेवरुन वाटते आहे. पिंपरी चिंचवड महापालिका खड्यात जायला लागली असे दिसते आहे. रस्त्यावर खड्डे पडले आहेत का काय ही शंका यायला लागली आहे. मा.मंगलाताई कदम यांनी जो प्रश्न मांडला आहे. मा.सुजाता पालांडे ताई यासंदर्भात बोलल्या. आरोग्य अधिका-यांना स्थापत्यचे काम देऊन बीटनिरिक्षक नेमले आहे. एक महत्वाचा विषय आहे. डॉ. रॉय हे आरोग्य विभागाचे प्रमुख आहेत. ज्या माणसाला हे काम दिलेले आहे, तो माणूस जर अनधिकृत बांधकामाचे काम करत असेल, त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल झाला असेल तर अशा माणसाला हे काम सोपवले आहे. इथे कुठेतरी चूक करतो असे वाटते आहे. ज्यावेळी सॅनिटरी इन्सपेक्टरने अनधिकृत बांधकामाच्या माध्यमातून त्या माणसाचे काम केलेले आहे. डॉ.रॉय यांच्याकडे डीपीएच पदवी नसताना, पब्लिक हेल्थ कोर्स नसताना, हे पद निर्मिती नसताना बरेच दिवस पद भरती पेंडींग ठेवली आहे. पद रिक्त ठेवत असताना कोणत्याही सभागृहाची परमिशन नाही. समितीमधून विषय न आणता त्यांना डायरेक्ट पदोन्नती कोणत्या बेसिसवर दिली आहे. आम्हाला कायदा सांगितला जातो. आपण कायदा तोडत आहात. आपण आमच्यासमोर कायदा आणता. पदोन्नती देताना कोणत्या समितीच्या माध्यमातून विषय आणला, सभागृहाची मान्यता घेतली का, वैद्यकीय अधिकारी म्हणून कोणत्या बेसिसवर त्यांची नेमणूक केली हा महत्वाचा प्रश्न आहे. याची उत्तरे द्यावी लागतील. माझ्यासमोर अनधिकृत बांधकामाची लिस्ट आहे. ४९२ बांधकामे आहेत. यासंदर्भात आपण रेसिडेन्शियल घरांना बी3 बांधकामांवर कारवाई करणार नाही असे सगळ्या नगरसेवकांसमोर सांगितले होते. अनधिकृत बांधकामासंदर्भात बोललो तर तुम्ही आम्हाला धमकी देता पद रद्द केले जाईल, वेगळ्या पद्धतीने हॅरॅसमेंट केली जाईल. आपले अधिकारी अनधिकृत बांधकाम करत असतील तर त्यासाठी काय न्याय आहे. नगरसेवकाला धमकी देता आणि त्यांना

पदोन्नती आहे का. आपल्याला सभागृहाची विनंती आहे की, आजच्या आज त्यांना नोकरीतून निलंबित करा. तरच आम्हाला वाटेल की दोघांनाही समान न्याय दिला आहे. एकिकडे गोरगरीबांची घरे पाडायची आणि अधिकारी अनधिकृतपणे घर करत असेल तर त्याला पाठीशी घालता आहात का. हा न्याय समजत नाही. कोणत्या माध्यमातून कामे करतो. खड्यांचा विषय का चालला आहे. अधिका-यांना एस्टिमेट करायला, काम करायला वेळच नाही. ऊठले-सुटले अधिकारी आयुक्तांच्या मिटींगला असतात. आपण नागरीकांची कामे करा. १६ महिने झाले आम्ही नगरसेवक म्हणून निवडून आलो, आपण काय मोठे काम केले हे सभागृहासमोर सांगावे. कोणते काम चांगल्या पद्धतीने चांगले काम केले आहे. रस्त्यात खड्डे पडले आहेत असे नगरसेवकच म्हणत असतील तर यापेक्षा महापालिकेचे दुर्भाग्य ते काय. जगातील श्रीमंत महापालिकेत खड्डे पडले हे प्रत्येक नगरसेवक म्हणतोय. यापेक्षा वाईट दिवस नसेल. पूर्वी प्रभागाची मिटींग झाली होती त्यावेळी ढेरे साहेबांना मी मिटींगमध्ये सांगितले होते, आयुक्त साहेबांना प्रभाग मिटींगमध्ये बोलवा. आमच्या समस्या मांडू द्या. आयुक्तांना प्रभागात यायला वेळ नाही. याचे कारण काय तिथे सुद्धा नगरसेवक असतात. अधिका-यांना एस्टिमेट करायला, काम करायला वेळ देत नसालतर नगरसेवकांनी काय करायचे. अनधिकृत बांधकामांच्या माध्यमातून समिती निर्माण करा. अधिकारी तुमच्या दबावाखाली आहेत. तुम्ही किचकट प्रोसिजर करताय. एकट्या आयुक्तांचा दबाव इतका आहे की, आमच्या अधिका-यांचा फूटबॉल झाला आहे. स्थापत्यचा अधिकारी असेल तर त्याला तेच काम सांगा. आरोग्याचा अधिकारी असेल तर त्याला आरोग्यचेच काम सांगा. काम केले नाहीतर पनिशमेंट द्या. एकाच व्यक्तीला अनेक प्रकारची कामे दिली, त्याची ताकद असली तरी, त्याचा स्टॅमिना असला तरी अशा माध्यमातून कामे करु नयेत. कामे करताना अधिका-यांची मानसिकता बदलली पाहिजे. ड्रेसकोड घातला, चांगले कपडे घातले यातून काही बदल होणार नाही. अधिका-यांना तुमच्याकडे बघून प्रेम वाटले पाहिजे. अशा पद्धतीने कामे केली पाहिजेत. एक पदाधिकारी असा नाही की त्याला तुमच्यासमोर चांगला विषय मांडायची हिंमत नाही. याला कारण आपली दहशत आहे. अधिका-यांना प्रेमाने सांगावे. त्यांच्याकडून कामे करुन घ्या, ती शंभर टक्के कामे करतील. अनधिकृत बांधकामाच्या विषयात फौजदारी आणली. हे प्रत्यक्ष थांबवावे. माझ्याकडे ४५० जणांची यादी आहे. ऑनलाईन याद्या

काढल्या आहेत. एक फौजदारी गुन्हा दाखल करत असताना, नागरीक म्हणाले, विद्युतवाले ५,००० रु., पोलिस १५ ते २०,००० रु. घेतात. अशा माध्यमातून त्याला नाहक त्रास देताय. तुम्ही दिलेला शब्द पाळला का. तुम्ही महापौरांच्या अँटी चेंबरमध्ये बोलला होता, मी बी३च्या बांधकामांना हात लावणार नाही. तुम्हाला सूट दिलीतर तुम्ही आमचे नरडेच कापायला निघालात का. असे असताना आपल्याला सभागृहाच्या वतीने विनंती आहे, बी३ घरांवर फौजदारी होता कामा नये. कायदेशीर कारवाई करु नका. पुन्हा एकदा विनंती राहील की, शासनाचा निर्णय प्रलंबित आहे. कायदेशीर चर्चा चालू आहे. ३ आमदारांची चर्चा चालू आहे. सर्वपक्षीय मोर्चा त्या माध्यमातून निघाला आहे. एखाद्या नागरीकाला पासपोर्ट काढायचा असेल तर त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल असल्यामुळे त्या पासपोर्ट मिळणार नाही. अशा माणसाला कॅरेक्टर सर्टिफिकेट द्या. त्याला कॅरेक्टर सर्टिफिकेट सुद्धा मिळणार नाही. दुसरीकडे डॉ.रॉय यांना अधिकारी म्हणून पदोन्नती देऊन वैद्यकीय अधिकारी म्हणून ठेवत असालतर शंभर टक्के धोका देऊन काम करताय. आज आम्हाला याचे उत्तर पाहिजे. डॉ.रॉय यांना नोकरीतून कायमस्वरुपी बाहेर काढावे. यांची पदोन्नती सगळे रद्द करावे. आपण ते करावे अशी आपल्याला विनंती करतो.

**मा.संपत पवार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.सुलभा ऊबाळे ताईंनी कुत्र्यांचा विषय काढला. आमच्या थेरगावात २५/३० कुत्र्यांची टोळी आहे. कुत्री किती हुशार असतात. मयत आल्यावर व मयत अर्धी जळाल्यावर तिथे जातात. थेरगावात स्मशानभूमी  गेली १५ ते २० वर्षांपासून आहे. तिथे वॉचमन नाही, शिपाई नाही. दाखला घ्यायला मनुष्य नाही. लाकडाची विक्री करणारेच स्मशान दाखला घेतात. कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी विनंती आहे.

**मा.प्रसाद शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ३१ मे आधी शहरातील सर्व खड्डे बुजवले होते असे सांगितले गेले. परंतू गेले १ वर्षापासून एम्पायर इस्टेटमध्ये एवढे खड्डे आहेत. १ वर्षापासून ते बुजवलेले नाहीत. ३१ मे आधीच सगळे खड्डे बुजवले हे कोणत्या अधिका-याने सांगितले. प्रत्येक अधिकारी सांगतो, २/३ दिवसांत

पाऊस थांबल्यावर डांबरीकरण करु. असे किती डांबरीकरण केले ते सांगावे. पुणे महापालिकेत आत्ता सुद्धा डांबरीकरण चालू आहे. आपल्याकडे असे का करत नाहीत.

**मा.सविता साळुंखे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, परदेशांत इन्फ्रास्ट्रक्चरवर जास्तीत जास्त पैसा खर्च केला जातो. मागील वर्षी मी ऑस्ट्रेलियाला गेले होते. तिथे रस्त्यावर पावसाचे पाणी साचत नाही. नागरीकांच्या तुमच्याकडून खूप अपेक्षा आहेत. तुम्ही पिंपरी चिंचवड शहर सुधारायचे चांगले काम हाती घेतले आहे. इन्फ्रास्ट्रक्चरबाबत जास्त काम केले असते तर आज सभागृहाचा वेळ गेला नसता. यावर जास्तीत जास्त काम करावे. शहराची हिच अपेक्षा आहे. अधिकारीच सांगतात, तरतूद नाही. याचा अर्थ अधिकारी खोटे बोलतात का कमिशनर खोटे बोलतात हेच कळत नाही. माझ्या भगिनी सुपे ताई यांना काही झाले असते तर. आमचा नगरसेवकांचा जीवन बिमा उतरावा एवढी विनंती करते.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण मिटींग घेतली होती. खड्डे या विषयावर सगळेच बोलले आहेत. आपत्कालिन व्यवस्थापन यात लाईटचा करंट उतरला तर यासाठी काय व्यवस्था केली आहे. गेल्या वर्षी माझ्या वॉर्डातल्या पत्राशेडमध्ये पूर्ण करंट आला होता. कार्यकारी अभियंता यांनी भेट दिली होती. वर्षभरात काहीच झाले नाही. अंडरग्राऊंड केबलिंग करायची अत्यंत आवश्यकता आहे. त्यासाठी १५/२० लाखांची तरतूद केली आहे. ५९ लाखांची केबल ठेकेदाराने पळवून नेली. लोकांच्या जिविताचा प्रश्न आहे. तिथे अंडरग्राऊंड केबल करावी. एमएसईबी म्हणते, आम्ही काम बंद केले आहे. महापालिका म्हणते, आमचे धोरण नाही. माझ्या वॉर्डात पूर्ण करंट उतरला आहे. पालिकेचे लोक म्हणतात हे आमचे काम नाही. एमएसईबी म्हणते आमचे काम नाही. आपत्ती व्यवस्थापन मधून कामे करावीत.

**मा.शुभांगी लोंढे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,मा.सुपे ताईंच्या बाबतीत जी घटना घडली असे कोणाच्या बाबतीत घडू नये. आपल्या सर्वांसाठी दूर्देवाची गोष्ट आहे. पावसाळ्याचे पाणी जाण्यासाठी स्टॉर्म वॉटरची व्यवस्था व्यवस्थित नाही. त्यामुळे पाणी जाऊ शकत नाही. जागोजागी खड्यांमुळे पाणी साचते. मच्छरांचे प्रमाण वाढले

हे. नागरीकांचे आरोग्य धोक्यात आहे. याबाबतीत काळजी घ्यावी. चेंबरला प्लास्टर करुन घेण्यात यावे.

**मा.डॉ.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेत त्याबद्दल थोडक्यात निवेदन करतो. गेले काही दिवसांत शहरातील विविध रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. याविषयी अनेक सन्मा. सदस्यांनी याठिकाणी विषय उपस्थित केला आहे.

शहरात अनेक ठिकाणी ख़ड्डे पडलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. २/३ मुद्दे याअनुषंगाने मांडावयाचे आहेत. शहरातील जे रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे आहेत, त्यांवर खड्डे नाहीत. उरलेल्या डांबरी रस्त्यांवर खड्डे पडलेले आहेत. गेल्या दीड महिन्यात सलग पाऊस पडतो आहे. गेल्या ३/४ दिवसांच्या काळात पूर्ण उघडीप पडली असा कालावधी आला नाही. त्यामुळे उघडीप असेलतर डांबराचे काम व्यवस्थित टिकून राहते. नाहीतर पूर्वीपेक्षा खड्डे अधिक मोठा होतो. त्यामुळे इंजिनिअर्सना गेल्या महिन्यात सूचना दिल्या होत्या,जिथे-जिथे खड्डे पडले आहेत,तिथे उघडीप मिळाल्यावर ताबडतोब बुजवण्यात यावेत. तशी तयारी इंजिनिअर यांनी केलेली आहे. जोपर्यंत पर्यायी व्यवस्था करताना मुरुम किंवा तत्सम व्यवस्था करताना यात काही प्रमाणात गैरसोय सुद्धा होते. हा फार नित्कृष्ट असणार नाही. आपत्ती व्यवस्थापन या विभागाच्या २ बैठका प्रशासकीय पातळीवर सन्मा.महापौर यांच्या उपस्थितीत झाल्या होत्या. पावसाळ्यामध्ये शहरामध्ये कोणत्या प्रकारच्या अडचणी येऊ शकतात. पूर परिस्थिती येऊ शकते. आपत्ती व्यवस्थापनाच्या अनुषंगाने आरोग्य अधिकारी, इंजिनिअरींग यांच्याकडून याबाबत आखणी व नियोजन करण्यात येते आहे. शहरात ज्या ठिकाणी खड्डे पडले आहेत. ते रस्ते वस्तुतः २/३ किंवा ४ वर्षांपूर्वी झालेले आहेत. त्याबाबतीत आपत्ती व्यवस्थापन, नियोजन करता येणे शक्य नाही. याबाबत उपाय करता येणे शक्य आहे. पावसाने उघडीप मिळाल्यानंतर दुरुस्ती करता येईल. गेल्या २० दिवसांत अशी वेळी आली नाही. लोकसत्ता पेपरमध्ये बातमी आली होती. खड्डे बुजवायला अनुकूल परिस्थिती मिळाली नाही हे कृपया समजून घ्यावे. ज्यावेळी भविष्यात रस्त्याचे नियोजन करायचे त्यावेळी वाहतुकीच्या दर्जाला चांगले असलेले रस्ते, शहराच्या उपयोगाच्या दृष्टीकोणातून महत्वाचे रस्ते कॉंक्रीटचे करणे शहराच्या हिताचे राहील.

कॉम्पॅक्टर बंद असल्याचा विषय मांडला आहे. दोन दिवसांपूर्वी आढाव घेतला होता. ड प्रभागात ६ कॉम्पॅक्टर बंद आहेत. दुस-याचा अपघात झाला आहे. एक

रिकामा आहे. अधिका-यांना खुलासा विचारला आहे. पत्र दिले आहे. सहशहर अभियंता, आरोग्य विभागाचे मुख्य अधिकारी, सहा.आयुक्त यांना अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा उद्भवणार नाही अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. एक गाडी स्पेअर असावी असा मुद्दा चर्चेत आला आहे. त्याप्रमाणे स्थापत्य विभागाला सूचना दिलेली आहे. त्याप्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे.

अधिकारी त्यांना दिलेले अधिकार वापरत नाहीत. मुख्यालयाकडे बोट दाखवतात असा मुद्दा मांडण्यात आला आहे. वस्तुतः सभागृहाने जे अधिकार प्रदान केलेले आहेत १० लाखापर्यंतची कामे किंवा प्रशासकीय अधिकार असतील तर पूर्णतः त्याच स्तरावरील प्रभाग अधिकारी यांना हे अधिकार दिले आहेत. बजेट त्याच स्तरावर तयार केलेले आहे. याला सभागृहाने मान्यता सुद्धा दिलेली आहे. त्यामुळे त्यात मुख्य आरोग्य कार्यालय किंवा मुख्य अधिकारी यांचा हस्तक्षेप नसतो. या बाबी निदर्शनास आणून दिल्यानंतर संबंधित अधिका-यांवर कारवाई निश्चित केली जाईल. मा.योगेश बहल यांनी २/3 महिन्यांपूर्वी विषय मांडला होता. अधिका-यांना मोठ्या प्रमाणात वित्तिय व प्रशासकीय अधिकार डेलिगेट करण्याचा विषय झाला. अधिका-यांना प्रशासकीय व वित्तिय स्वरुपाचे अधिकार त्यांच्याशी चर्चा करुन प्रदान करण्यात येत आहेत. या विषयावर  वेळा चर्चा झाली आहे. त्यांना विश्वासात घेऊन, गरज व क्षमता विचारात घेऊन अधिक वित्तिय व प्रशासकीय अधिकारी पुढील महिन्यामध्ये प्रदान करण्यात येत आहेत.

बीड निरीक्षक यांची ऑर्डर वस्तुतः शासन नियमाप्रमाणे केलेली आहे. शासनाचा आदेश होता. प्रत्येक प्रभागात,प्रत्येक वॉर्डात अनधिकृत बांधकामे शोधण्यासाठी बीट निरीक्षक अशी यंत्रणा असावी. हे काम निष्कासित करण्यासाठी कलम 396 प्रमाणे मुंबई मनपा कायद्यानुसार डिस्क्रिनेटींग ऑफीसर यानुसार अपॉईंट करावेत. 2009चा शासन निर्णय, मार्च 2012 चा कायद्यातील बदल यानुसार डिस्क्रिनेटींग ऑफीसर नेमले होते. बीट निरीक्षक 2009 मध्ये नेमले होते. पद निर्देशित अधिकारी मार्च 2012 मध्ये नेमल्यानंतर आवश्यक ते बदल करायची गरज होती. त्यानुसार आदेश निर्गमित केले. त्यांचे काम फक्त अनधिकृत बांधकामे शोधण्याचे आहे. ते त्यांचे नियमित काम करत असतात. येता-जाता कुठे अनधिकृत बांधकाम दिसले तर फक्त आल्यानंतर ऑफीसमध्ये रजिस्टरमध्ये नोंद करायची आहे. पंचनामा करणे, एफआयआर ही

कोणतीही कामे त्यांना दिलेली नाहीत. तो फक्त लिमिटेड एरियात काम करतो. डोळे उघडे ठेवून बघायचे व नोंद घ्यायची एवढेच लिमिटेड काम त्यांना दिलेले आहे. जेणेकरुन झोनमध्ये अनधिकृत काम होत असेल तर अधिकारी निर्णय घेऊ शकतील.

रेड झोनबाबत प्रश्न उपस्थित झाला होता. मेंटेनन्सची कामे करण्याबाबत मध्यंतरी लिगल डिपार्टमेंट यांचे ओपिनियन घेतले होते. यासंदर्भात 5 वर्षांपूर्वी एक रिट पिटीशन झाले होते. त्यावेळी मा.न्यायालयाने सांगितले होते, रेड झोन एरियामध्ये तातडीची कामे,रस्त्याच्या लेवलची कामे,विस्तारीकरण तत्सम स्वरुपाची कामे करण्यासाठी कोणताही प्रतिबंध नाही. नवीन इन्फ्रास्ट्रक्चर उभारणे अशा प्रकारच्या कामाला प्रतिबंध आहे. हा मुद्दा मा.विनया तापकीर यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये मांडला होता. तशा स्वरुपाची कामे करण्यासाठी विभागाला निर्देश दिलेले आहेत. रस्त्याचे काम असेलतर त्याला लोकवस्ती असे म्हणत नाहीत. अशा स्वरुपाचे काम करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. याविषयी महापालिकेची घरकुल योजना यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. मा.उच्च न्यायालयाने डिफेन्स डिपार्टमेंटकडून एन.ओ.सी. आणावी असे निर्देश दिले होते. गेल्या महिन्यात डिफेन्स कमिशनर यांच्याकडे याबाबत फॉलोअप केला. त्यांनी एन.ओ.सी. दिली नाही. संरक्षण मंत्रालयामध्ये 3 दिवस बैठक झाली होती. त्यांनी सर्व ऐकून घेतले पण निर्णय दिलेला नाही. हा घटनाक्रम व बाबी लक्षात घेता ज्या नोटीफीकेशनला चॅलेंज करणार ते दाखल करण्यात आले आहे. अधिसूचनेत नमूद आहे. डिफेन्स ॲक्टनुसार संरक्षण मंत्री यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून यांच्यापुरता यांना आदेश केलेला नाही. आपल्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये आजही यलो झोन, निवासी झोन दिसतो. 7/12, संरक्षित क्षेत्र, प्रतिबंधित क्षेत्र याबाबत हायकोर्टाच्या अधिसूचनेला चॅलेंज करण्यासाठी रिट पिटीशन दाखल केलेले आहे. कोर्टाचे जसे निर्देश होतील, त्याप्रमाणे आपल्याला अधिकृत भूसंपादन करता येतील.

डॉ.रॉय यांचे अनधिकृत बांधकाम असताना त्यांची पदोन्नती करण्यात आली, त्यांचा विषय डायरेक्ट कसा घेतला, जी.बी. समोर विषय का आला नाही असे मुद्दे मांडले गेले. याबाबत स्पष्ट करतो की, डॉ.रॉय यांना तात्पुरता पदभार दिलेला आहे. हा सभागृहाचा अधिकार आहे, त्याप्रमाणे सक्षम समितीमार्फत विषय आणण्यात येईल. नाहीतर अडचण निर्माण होईल. दि. 31 मे ला डॉ.गायकवाड रिटायर्ड झाल्यानंतर

त्यांना हा पदभार देण्यात आला आहे. त्यावेळच्या परिस्थितीनुसार असा निर्णय घेण्यात आला आहे. आपल्या सेवा प्रवेश नियमावलीत म्हटले आहे. वैद्यकीय अधिकारी पदासाठी 5 वर्षांचा अनुभव, शैक्षणिक अर्हता एमबीबीएस व डीपीएच असली पाहिजे. दि. 31 मे रोजी डॉ.गायकवाड रिटायर्ड झाले त्यावेळी डॉ. साळवी व डॉ.रॉय हे दोघेही या पदासाठी पात्र आहेत. डॉ. साळवी यांनी एम.डी. पूर्ण केलेले आहे तर डॉ. रॉय हे एमबीबीएस आहेत. दोघांनीही डीपीएच पूर्ण केलेले आहे. दोघांचीही वैद्यकीय सेवा 5 वर्षे झाली आहे. तरीदेखील सेवा ज्येष्ठता यादीमध्ये डॉ. रॉय हे 20 क्रमांकावर आहेत तर डॉ.साळवी हे 24 क्रमांकावर आहेत. डॉ.रॉय हे डॉ.साळवींपेक्षा सिनिअर असल्यामुळे सामान्य प्रशासन नियमाप्रमाणे डॉ.रॉय यांना पदभार देण्यात आला आहे. नियमानुसार सभागृहात विषय घेऊन येऊ, त्याप्रमाणे निर्णय घ्यायचा आहे. डॉ.साळवे यांना वैद्यकीय संचालक पदाचा पदभार देण्यात आला आहे. अतिरिक्त वैद्यकीय अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात आली आहे. प्रशासनाकडून कोणत्याही व्यक्तीला डावलून कोणत्याही व्यक्तीवर अन्याय केला जात नाही. लिगली स्क्रूटीनी करुन कोर्टात चॅलेंज करु शकतो. शासन नियमाप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे. अनधिकृत बांधकामासंदर्भात त्यांना नोटीस देण्यात आली आहे. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सामान्य व्यक्तीला जो न्याय तोच न्याय अधिका-यांना केला आहे. त्यांनी त्यांचे बांधकाम काढलेले आहे.

बी3 बांधकामांवर कारवाई करणार नाही असे मी म्हणालो होतो. बांधकामे निष्कासित करताना याचा प्राधान्यक्रम ठरविला जातो. दि.31 मार्च 2012 नंतरच्या बांधकामांबाबतीत हा प्राधान्यक्रम आहे. पूररेषेतील बांधकामे, आरक्षणातील बांधकामे निष्कासित करत आहोत. सर्वांच्या डोक्यात हेच असते. नोटीस, पंचनामा इथपर्यंत प्रक्रिया होते. दरम्यान पिंपरी चिंचवडमध्ये दूर्घटना घडली होती. अधिकारी किंवा इतर कोणी अशी बांधकामे पाडतील का? असा प्रश्न उपस्थित होतो म्हणून बी3 बाबत जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात येत आहे. आत्ता या सभागृहात भावना व्यक्त करण्यात आली की, हा विषय शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे कोणतीही कारवाई करु नये. याबाबतीत भूमिका स्पष्ट करतो की, सध्या दि.31 मार्च 2012 नंतरच्या बांधकामांबाबत भूमिका घेतली आहे. हा प्रश्न शासनाकडे सादर केलेला आहे. आधीच्या आयुक्तांना दि.31 मार्च पर्यंत संदर्भित केले होते. प्रयत्न करुन दि.31 मार्च 2012 पर्यंतच्या बांधकामांचा विषय राज्य शासनाकडे संदर्भित केला आहे. निवेदन केले आहे.

कायद्यात बदल केला आहे. अधिका-यांना जबाबदार धरण्यात आले आहे. हाय कोर्टाची मुदत दि.31 मार्च 2012 रोजी संपलेली आहे. सामान्य लोक, पदाधिकारी, आमदार, उपमुख्यमंत्री यांच्याबरोबर घेतलेल्या बैठकांमध्ये यापुढे अनधिकृत बांधकामे करायची नाहीत असे स्पष्ट निर्देश दिलेले असताना कट ऑफ डेट मार्च 2012 घेतलेली होती. पूर्ण आदेश फेब्रुवारी 2011 ला झालेला होता. 4 ते 8 महिन्यांत बांधकाम पूर्ण होऊ शकते. फेब्रुवारी 2011 ला हायकोर्टाची ऑर्डर होती. सभागृहात 2011 ला यावर चर्चा झाली होती की, ऊल्हासनगरच्या धर्तीवर शहरातील बांधकामे नियमित करावीत. हे सगळ्यांना माहिती आहे. याचे रिपोर्टींग सगळ्यांपर्यंत झालेले आहे. याप्रमाणे एक वर्षानंतरची कट ऑफ डेट ठरलेली होती. 2011 मध्ये बांधकामे चालू होती ती 6 ते 8 महिन्यांत पूर्ण होणार. जाणिवपूर्वक कोणी नवीन बांधकाम करत असेलतर कायद्यातील जबाबदारी पार पाडणे आम्हाला अपरिहार्य आहे.

गेले वर्षभरात शहरात कोणती विकास कामे झाली नाहीत असा मुद्दा मांडला आहे. गेल्यावर्षातील पेंडींग असलेली महत्वाची कामे या वर्षी पूर्ण झाली आहेत. जेएनएनयूआरएम अंतर्गत मैला शुद्धीकरण प्रकल्प टप्पा 1 – डिसेंबर 2012 मध्ये पूर्ण केला. केंद्र शासनाकडे याचा अहवाल सादर केला आहे. च-होली मैला शुद्धीकरण प्रकल्प, पाणीपुरवठा टप्पा 2 पूर्ण झाला आहे. त्रिवेणीनगर प्राधिकरणाचा,तळवडेचा फ्लायओव्हर होतो आहे. लास्ट मुव्हमेंटला प्राधिकरणाच्या नियमानुसार अरेंजमेंट बदलाय़ला सांगितली म्हणून पाईपलाईल पडल्या आहेत. ई-गव्हर्नन्स, नॅशनल कमिशन मोड प्रोजेक्ट, १२ मार्ग, २८ पेंडॉलचे मॉडेल २०१२ मध्ये पूर्ण झाले आहे. केंद्र शासनाला अहवाल सादर केला. त्यानुसार सायन्स पार्कचा प्रोजेक्ट फेब्रुवारी पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. त्यानुसार तो पूर्ण केला आहे. बीआरटीमध्ये मोठ्या प्रमाणात टार्गेट आहे. आज सभागृहात विषय मंजूर झालातर पुढील महिन्यात त्याचे वाटपदेखील करता येऊ शकेल. संरक्षण विभागाकडून ऑगस्ट १२ मध्ये डांगे चौकापासून जमिन मिळाली आहे. डिसेंबरमध्ये काम पूर्ण होते आहे. नवीन प्रकल्पाची सुरुवात करून ते वर्षभरात पूर्ण करण्याची योजना आखली आहे. पर्यटन विकास आराखडा अंतिम केला आहे. यास सभागृहाने मान्यता दिली आहे. तरतूद झाली आहे. प्रकल्पाची निविदा झालेली आहे. वायसीएममध्ये पोस्टग्रॅज्युएट कोर्स अधिकृत चालू केला आहे. याबाबत आज केंद्र व राज्य शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. भोसरी हॉस्पिटलचा विषय मार्गी लागला आहे.

सन्माननीय सदस्यांच्या मान्यतेने जेएनएनयूआरएमच्या योजनेअंतर्गत पूर्ण शहरात २४X७ पाणीपुरवठा करायचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवला आहे. १०० कोटींच्या प्रकल्पासाठी कॉब (COEB) इन्स्टीट्युटचा अभिप्राय घेतला आहे. ताथवडे गाव महापालिका हद्दीत नव्याने समाविष्ट झाले आहे. त्यांचा डी.पी. तयार केला आहे. त्यांचा पाणीपुरवठा, जलःनिस्सारण याबाबत केंद्र शासनाकडे विषय पाठवला आहे. त्या-त्या क्षेत्रातील मलनिस्सारण, बीआरटी बस स्टेशन, इंडीयन ट्रान्सोर्ट सिस्टीमचा प्रोजेक्ट मंजुरीसाठी पाठवला आहे. याविषयी शहरातील उद्योगांतून होणारे प्रदूषण, एमआयडीसीतून होणारे प्रदूषणबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांप्रमाणे सूचना कंपन्यांना देऊन ट्रिटमेंट प्लॅन्ट उभारण्याचे नियोजन आहे. सांगवी परिसरातील चौकातून उड्डाण पूल करण्याचे नियोजन अंतिम टप्यात आहे. महत्वाचे चौक, मोठ्या प्रमाणात फुगेवाडी, रावेत इथे मा.महापौर यांच्या उपस्थितीत सादरीकरण केलेले आहे. केएसबी चौकातून भक्ती-शक्ती चौकातील पूलाचे काम अंतिम चरणात चालू आहे. लवकरच मा.महापौर यांना सादरीकरण करणार आहोत. त्यामुळे कामे होत नाहीत या गोष्टीशी मी सहमत नाही. यंत्रणेवर अनावश्यक ताण आहे. १९९२ मध्ये जी यंत्रणा होती तीच आज आहे. १९९२ मध्ये शहराची लोकसंख्या सव्वा पाच लाख होती. आज ती १८ लाख झालेली आहे. कामाचा लोड वाढला आहे. सगळा भार याच यंत्रणेवर आलेला आहे. यंत्रणा किती आहे याचा विचार करता निश्चितपणे विकास कामे करताना यंत्रणेवर कामाचा भार जास्त असल्यामुळे कामाला फार मोठा विलंब होतो. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. आपण शासनाकडे वाढीव पदांची मागणी केली आहे. सेवा प्रवेश नियमावलीत अंतिम करण्याचे काम सुरु आहे. सगळ्या विभागांचा आराखडा तयार झाला आहे. ऑगस्ट महिन्याच्या मा.महापालिका सभेमध्ये या प्रस्तावास मान्यता मिळाली तर तो प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर करु. राज्य शासनाकडून नवीन आराखड्याला मंजूरी घेतली जाईल. सभागृहामध्ये मागणी करण्यात आली होती. त्याप्रमाणे अनधिकृत बांधकामांसाठी स्वतंत्र यंत्रणा व विकास कामांसाठी वेगळी यंत्रणा असावी हे प्रस्तावित केलेले आहे. याला मान्यता मिळाली तर विकास कामांसाठी, विकास कामांच्या अंमलबजावणीसाठी अधिक गती प्राप्त होऊ शकेल.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपल्याला शासनाची कामे विचारली नव्हती. जे नगरसेवक अंतःकरणापासून बोलले होते, माझ्या वॉर्डात कामे होत नाहीत. त्यासंदर्भात खुलासा दिलेला नाही. सर्वसामान्य नागरिक, मतदारांशी मारलेल्या गोड गप्पा याच्याशी आमचा काही संबंध नाही. आमची मूळ भूमिका, मागणी आहे. त्यात आम्हाला आमच्या कामाशी मतलब आहे. पिंपरी चिंचवड शहराचा विकास आराखडा मागीतला नव्हता. शहर खड्डेमय झाले आहे. जो प्रश्न विचारला होता. शहराचा विकास आराखडा सांगितला आहे, काय-काय करणार आहोत. आमचे लोक मरायला लागले आहेत. त्यांना मेल्यावर पाणी पाजणार आहात का? आमची भावना त्याविषयी सहमत नाही. कायद्याच्या पद्धतीने सांगीतले, त्याच्याशी मी सहमत नाही. आमच्या भागातील विकास सांगतोय. इतर कामांच्या माध्यमातून बोलतोय. आपण काम केलेले आहे. पूर्वीच्या आयुक्तांना हे सुद्धा सांगितले होते. गेले ५ वर्षे कामे चालू आहेत. नवीन धोरण काय, काम काय हा प्रश्न आहे. डॉ.रॉय यांनी डी.पी.एच. परिक्षा पास केली आहे का. यांनी परिक्षा कधी दिली, पेपर कधी आले याची माहिती पाहिजे. अनाधिकृत बांधकामांबाबत अधिका-यांना वेगळा निर्णय देणार आहात का? आम्ही सुद्धा हेच उद्योग करु. जो मनुष्य चुकीचे काम करत असेल तर त्यालाच हेड करणार का? आम्हाला सांगा, दिल्ली, यू.एस.ए. तील धोरण तुम्ही चिखलीत आणताय. आमच्या वॉर्डातली कामे करावीत. प्रभागात अधिकारी आमची कामे करत नाहीत. गेल्या मिटींगमध्ये सांगितले होते, अधिकारी म्हणतात या कामाचे टेंडर नाही. असे असेल तर ते अधिका-यांकडून लिहून द्या. आम्हाला तुम्हाला ७/१२ आणून द्यावा लागेल. आमचे म्हणणे आहे, आम्ही वॉर्डाची भूमिका मांडायला इथे आलो आहोत. शहर नंतर आहे. पुढील ५ वर्षांनंतर आम्ही दिसणार नाही. नागरीकांनी आम्हाला त्यांची कामे करण्यासाठी इथे पाठवले आहे. शहराचा विकास करण्य़ासाठी नाही. शहराचा विकास होईल तेव्हा होईल. १४ महिने झालेतरी आपण परत हे केले, ते केले असे करुन परत इथेच आणून सोडताय. डॉ.रॉय यांना कामातून बाहेर काढा असे सभागृहाच्या वतीने सांगतो.

**मा.राजेंद्र काटे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर अभिनंदन करतो. शहराच्या दृष्टीकोणातून अतिशय मोलाचे काम तुम्ही केले आहे. निश्चितपणे शहर

विकसित होईल. खरेतर तुम्ही प्रत्येक वॉर्डात व्हिजिट द्या. अडचणी समजून घ्या. गल्लीबोळात फिरलातर ड्रेनेज लाईन्स पूर्णपणे राहिलेल्या नाहीत. अक्षरशः घुशी लागल्या आहेत. स्थानिक लोकांसाठी ख-या अर्थाने त्या दृष्टीने यात कोणतीही कामे होत नाहीत तर तुमचा काय उपयोग? गेले ५ वर्षांपासून पाण्यासाठी ओरडतोय. संबंधित शाळेचे काम अजूनही चालू झालेले नाही. दापोडी गावात पाण्यात एक थेंब सुद्धा नाही. एमआयडीसी इथे ३/३ दिवस लोकांना पाणी मिळत नाही. बीआरटीमध्ये मोठमोठे रस्ते, हायवे केले असे तुम्ही सांगितले. कासारवाडीत एक रस्ता करायला अडचण येते. गेले ३/६ महिन्यांत wbm होऊ शकत नाही. वॉर्डातल्या लोकांना बाजूला ठेवून बाहेरच्या लोकांसाठी शहर डेव्हलप करायचे. आपले पोट भरले नाही आणि दुस-यासमोर ताट ठेवून उपयोग काय? प्रत्येक वॉर्डात व्हिजिट द्या जेणेकरुन सविस्तर माहिती मिळेल. हे माझे नाही नागरिकांचे म्हणणे आहे.

**मा.श्रीरंग बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खरेतर आयुक्त साहेबांनी सभागृहात विकासाचा पाढाच वाचला. पहिल्या प्रथम वाटले, राजकीय भाषण आहे काय? संपूर्ण शहराचा विकास केला असे वाटले. परंतू आयुक्त साहेब, शहराला प्राथमिक गरजा देणे हे प्रामुख्याने महापालिकेचे काम आहे. आरोग्य, शाळा सर्व बाबतींत, पाणी असले पाहिजे, कचरा घाण उचलली पाहिजे. अनेक सदस्यांनी हायसिंथ काढली पाहिजे याचा उल्लेख केला. पवना नदीला पूर आल्यानंतर आपल्याकडून हालचाल होईल. पण निसर्गाने त्याचे काम केलेले आहे. नदीला पूर आल्यानंतर सगळे हायसिंथ पिंपरी चिंचवड शहरापासून दूर गेलेले आहे. प्रामुख्याने महापालिकेच्या वतीने अहवाल तयार केला आहे. त्यात त्रुटी दाखवल्या आहेत. त्यासंदर्भात बोलले असता, निश्चितपणे महापालिकेची चूक आहे. सर्वसामान्य माणसासाठी कारभार केला जात नाही. नागरीक प्रशासनावर रोजच्या घडीला अवलंबून असतात. झोपडपट्टी भागात टॉयलेटची अवस्था काय आहे? विद्यार्थी शालेय शिक्षणात घडतात. त्या शाळांतील टॉयलेटमधील स्वच्छतेची अवस्था काय आहे? कचरा दररोज उचलला जातो का? पावसाळ्याच्या दिवसांत ब-याचशा प्रमाणात ३० टक्के भागात ड्रेनेज लाईन चोक-अप होतात. सर्वसामान्य माणसाला पाणी नाही. मोठ्या गप्पा मारत असलात तरी मुलभूत नागरी सुविधांकडे दुर्लक्ष होत चालले आहे. म्हणून खड्यांचा विषय इथे निघाला.

पावसाळ्यापूर्वीच दक्षता घेतली असती. एका दिवसात माहिती होते का पाऊस कधी येणार माहिती होते. पूर्ण प्रशासनाकडून दक्षता घेतली नाहीतर चूका झाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात गप्पा मारता म्हणून सभागृहात सांगतो. आपली कुठेतरी चूक आहे. १५० कोटी खर्च करुन अंडरग्राऊंड कामे केलीतरी सर्वसामान्य वस्तीत जीवघेणा खेळ चालू होतो. आपण आपली जबाबदारी झटकून टाकतो. एमएसईबी यांनी काम हँन्ड ओव्हर केले म्हणून सांगतो. तिथे खेळणा-या कच्याबच्यांचा जीव जातो. सगळी चर्चा होत असताना या बाबी लक्षात आणून द्याव्यात. खुलासा करत असताना सांगत असतो, सभागृहात मांडलेल्या सगळ्या तक्रारींबाबतीत, निवारण करण्याबाबत, पूर्ण शहरातील विकासाचेबाबतीत सखोल चर्चा केली. सर्वसामान्य मनुष्य आपल्यावर अवलंबून आहे. कचरा उचलला जात नसेल, वेळेवर पाणी मिळत नसेल तर २० ते ३० टक्के भागात पाण्याची तक्रार आहे. तरीसुद्धा तक्रारींचे निराकरण केले जात नाही. पाणी मुलभूत गरज आहे. शहराचा कितीही विकास केलातरी त्याला त्याचे देणेघेणे नाही. एखादा हुशार असेल, फोन करत असेल, ई-मेल करत असलातरी सर्वसामान्य अशिक्षित वर्ग, कामगार यांच्या तक्रारींची दखल सदस्यांमार्फत घेतली पाहिजे. सभागृहातील सन्माननीय प्रामुख्याने आपल्या निर्देशाप्रमाणे अधिकारी वर्ग देखील डावलला जातो. आपण देखिल याची गांभिर्याने दखल घेऊन तक्रारींचे निराकरण करण्याबाबत संबंधित विभागाला सूचना द्याव्यात.

**मा.योगेश बहल** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अतिशय महत्वाच्या, अतिशय चांगल्या विषयाला भरपूर वेळ दिल्याबद्दल तुमचे आभार मानतो. पिंपरी चिंचवड महापालिकेचा रस्ता खड्यात का खड्डा रस्त्यात यापेक्षा आत्ता सांगितल्याप्रमाणे मा.भोईर, मा.आप्पा बारणे यांचा विषय झाला. आपले आभार यासाठी मानायचे, अधिका-यांना अधिकारी प्रदान करण्याबाबतचा विषय आणला आहे. जरी सभागृहाचा, लोकांचा, माझ्यासारख्यांचा रोष असेल तरी चालेल. मुंबईवरुन पुण्याला येताना रस्त्यावर बघितले तर किती खड्डे आहेत. मुंबईला जायला नको वाटते. त्यातुलनेत पिंपरी चिंचवडमध्ये खड्डे शंभर टक्के कमी आहेत. नगरसेवकांची मानसिकता खचली आहे. मनात खड्डे पडले आहेत ते कधी भरणार? शहर अभियंता श्री. कांबळे म्हणाले, पाऊस उघडला नाही, पाणी कमी झाले नाही म्हणून खड्डे भरता आले नाहीत.

सगळ्यांची भाषणे ऐकली. कुत्री, मांजरी, डुकरे, वाय.सी.एम., बेकायदेशीर बांधकामे, नागपंचमी सगळे नाकारले. त्या गोष्टींत हे खड्डे झालेले खड्डे आहेत. तुम्ही पण हे उधळून दिले. ते आम्हाला सर्वांना पाठांतर झालेले आहे. टप्पा १ टप्पा २ करतोय. कोर्टाने स्टे घेतला, अमुक झालेले आहे. बेसिक प्रॉब्लेम कुठे आहे. इतर सगळे चांगले देतो. अभ्यासपूर्वक देतो त्याबद्दल तुमचे अभिनंदन. अधिकारी समजून चुकले आहेत. कदाचित नगरसेवकांवर कारवाई काय याचे उत्तर द्याल का? ज्यादिवशी तुम्ही नगरसेवक म्हणून याल, त्यादिवशी तुम्ही प्रशासक व्हाल. त्याशिवाय तुम्ही उत्तम प्रशासक होणार नाही हे माझे ठाम मत आहे. टप्पा २ची कामे पूर्ण झाली. फक्त प्राधिकरणात अमुक केले, अमुक ठिकाणी योजना झाली, टेंडर द्यायचे आहे, टेंडर काढले आहे, ही कामे तुम्ही नसलात तरी होणार आहेत. ही कामे म्हणजे कामे नाहीत. दुसरी विनंती आहे. मनापासून विनंती करतो की, तुम्हाला फोन करतो तर म्हणता ई-मेल आय डी द्या, मी मिटींगमध्ये आहे. एचओडींना फोन करतो, ते म्हणतात मी मिटींगमध्ये आहे नंतर फोन करतो. ड्रेनेजचा माणूस मिटींगमध्ये, तो चार तासांनी फोन करतो. प्रत्येक अधिकारी हेच म्हणतो, मी मिटींगमध्ये आहे. तुम्ही यांना जबाबदार धरा, त्यांना त्यांची जबाबदारी कळू द्या. एक दिवस जी.बी.त जातो. मिटींगसाठी सगळे अधिकारी तर काहीच कामे होणार नाहीत. एक्झिक्युटीव्ह सांगणार एचओडींना विचारा. एचओडी म्हणतात अमुकअमुक करा, आयुक्तांशी बोलून घ्या. ही परिस्थिती महापालिकेची झालेली आहे. आम्ही देखील अनेक वेळा तुमचे चांगले गुण घेण्याचा प्रयत्न केला आहे. शिस्त लावत असताना तुम्ही स्वतःच्या चूका मान्य केल्या आहेत. त्यावेळी एवढी लोकसंख्या, त्यावेळचे एवढे अधिकारी ही परिस्थिती असताना या अधिका-यांना किती वेळ मिटींगमध्ये ठेवणार आहात? मिटींगमध्ये नेमके काय घडते ते सांगा. प्रशासन विभागाला रेव्हेन्यूचा चांगला माणूस द्या म्हणून तुम्हाला सांगितले तर तुम्ही सगळे बाजूला ठेवले व टेकाळे यांना नेमले. त्यांना कधी फोन करुन सांगितले, वर्ग ४चा माणूस आहे त्याची बदली करा. तर ते म्हणतात पाहून घेतो. आयुक्त साहेब, इतके चुकीचे अधिकारी भरले तर आम्ही इथे काय गप्पा मारायला आलो आहोत का? क्लास ४ च्या माणसाचे नाव सांगून सुद्धा त्याची ट्रान्सफर होत नसेल तर कचराकुली याने सहाय्यक आयुक्त व्हावे असे मी म्हणतोय. आमच्या शब्दाला किंमत नसेल तर आम्हाला खड्डे बुजवायला नेमावे. आम्ही नगरसेवक कशाला झालो आहोत? तुम्ही

कर्मचा-यांच्या बदल्या केल्या. थेरगावातला प्लंबर उचलून भोसरीला टाकला. भोसरीचा प्लंबर दुसरीकडेच टाकला. ज्या प्लंबरने १० वर्षे ड्रेनेजमध्ये काढली, त्याला पाणीपुरवठ्यामध्ये टाकले. त्याला तिथल्या पाण्याच्या लाईनची माहिती नाही. तो म्हणाला मी थेरगावात काम करत होतो. एकतर योगेश बहल, आप्पा बारणे, मंगलाताईंना नाहीतर प्लंबरला ड्रेनेज लाईन कुठे पाण्याची लाईन कुठे आहे हे माहित असते. बिल्डींग परमिशन विभागातील सगळे अधिकारी ड्रेनेज विभागात टाकले. तुम्ही बिल्डींग परमिशनमध्ये चांगले अधिकारी आणलेत. काय परिस्थिती आहे ती पहा. एकमेकांमध्ये ताळमेळ नाही. ३ लोकांकडे काम आहे. माझ्यासारखा नगरसेवक गेलातर जिजामाता यांच्याकडे, कासारवाडी यांच्याकडे नाही यांच्याकडे, किवळे माने यांच्याकडे, हे साने यांच्याकडे दिलेले आहे. १० ते १५ वर्षे जे तिथे काम करत होते त्यांना बाहेर हलवले त्याबद्दल सगळ्यांनी तुमचे अभिनंदन केले. सगळ्यांना एकाच वेळी हलवून टाकल्यामुळे डिपार्टमेंटच हलले आहे. भदाणे मॅडम यांच्या विभागात तरी काय. सर्वेअर, जे.ई. बदलले. सगळे बदलले काय परिस्थिती आहे. आम्ही रिकाम्या डोक्याने वागायचे. आयुक्त म्हणून तुम्ही पहिलेच नाहीत. शहराचा विकास होईलच. परंतू विस्कळीतपणा आला आहे. एक दिवसांत सगळे करता येणार नाही. १० वर्षांत बेकायदेशीर कामे झालीत. गाडी मागितलीतर गाडी मिळत नाही. गाडी खराब असते. कुठे अतिक्रमण पाडायचे म्हटले तर सगळी यंत्रणा तयार असते. सगळ्या गोष्टी मान्य करतोय. चूका झाल्याने दुस-या गोष्टींकडे दूर्लक्ष करुन घरे कशी वाचवता येतील यासाठी प्रयत्न करा अशी सर्वांची विनंती आहे. ड्रेनेज झाले, चेंबर झाले, ठेकेदाराला क्लिनिंग करता येत नाही. कितीवेळा सांगितले, लोकांकडून पैसे उकळतात. अधिका-याने खोली बांधली. ते सुद्धा माणसे आहेत. अधिकारी चूकांमधून शिकत नाहीत. सामान्य नागरिकांसाठी एक न्याय असतो व अधिका-यांसाठी दुसरा न्याय असतो. हे सर्व करत असताना, सर्वांना न्याय देत असताना, जस्टीफीकेशन देत असताना, नगरसेवक म्हणजे काय, त्याची व्याख्या काय हे तुमच्या तोंडातून ऐकायचे आहे. त्याची महापालिकेची कर्तव्ये काय असावीत. आमच्याकडे बेकायदेशीर काम झाले, ड्रेनेज तुंबले म्हणून आयुक्त साहेबांना फोन करायचा. वायसीएममध्ये गेल्यावर दुःख वाटते. अक्षरशः भिका-यासारखी, ससूनपेक्षाही वाईट परिस्थिती झाली आहे. चिठ्या लिहून देतो पण एक काम होत नाही. डॉ.जगदाळे यांची काय अवस्था झाली, डॉ.गायकवाड बिचारे सुटले असे

वायसीएममध्ये म्हणतात. ५० हजारांची औषध खरेदी बंद, सगळे बंद. आयुक्तांच्या अधिकारात टेंडर काढा. एमओएच यांना अधिकार देऊ नका. तुम्हाला त्या अधिका-यांवर विश्वास नाही. स्टोअर विभागाला औषध खरेदी देऊन टाका. लोकांचे हाल करु नका. साधी-साधी औषधे सुद्धा मिळत नाहीत. काय परिस्थिती आहे. सगळे नगरसेवक माझ्याकडे येऊन ओरडतात. आयुक्त साहेबांचा निषेध करायचा, सभा तहकूब करायची असे सगळे म्हणाले. मी म्हणालो, तसे करुन काही होणार नाही. तुम्ही यात बदल करा, करु शकता. काय परिस्थिती आहे. दुस-या कोणाला मंजुरीचे अधिकार द्या. सामान्य नागरिकांना पाणी, रस्ता पाहिजे. प्राथमिक शाळा, आरोग्य सुविधा पाहिजे. प्राथमिक शिक्षण पाहिजे. महापालिकेच्या मुलभूत कर्तव्यांकडे दूर्लक्ष करतोय. फ्लायओव्हर केलातरी यातून कोणाचेही समाधान होणार नाही. अधिका-यांना पूर्वी दिलेल्या अधिकारांत हस्तक्षेप करता असे चालणार नाही. प्रभाग अधिकारी जर काम करत नसतील तर आम्ही तुम्हाला धरणार. ते का करत नाहीत. स्वच्छता का होत नाही, कचरा का काढला जात नाही. बदल्या करायचे काम तुमच्याकडे. प्रभाग अधिकारी सरळ हात वर करतात. नवीन माणसाला काहीच कळत नाही. काम कसे करणार. तुम्ही वरुन खाली घेताय. तुम्हाला खालून वर जावे लागणार आहे. जो नगरसेवक नागरिकांची दखल घेतो, तो दुखावला जातो. नगरसेवकाला महिन्यातून एकच दिवस बोलायला असतो. इतर महापालिकांच्या तुलनेत बघा. चाकण रोड असेल, आपली हद्द असेल, मुंबईवरुन पुण्याला यायला साडे चार तास लागतात. त्या रोडवर इतके खड्डे आहेत. त्या तुलनेत आपल्या रस्त्यांवरील खड्डे कमी आहेत. लोकांच्या, नागरीकांच्या मनातील खड्डे, तुमच्यावर असलेला रोष कसा काढणार, ते दुःख कसे काढणार. असे बसून मिटींगा घेऊन होणार नाही. आठवड्यातून एक मिटींग घ्या. एवढा वेळ बसवायचे त्यांचा खेळच आहे. ते म्हणतात, ४/५ तास बसवतात. जेवण नाही, पाणी नाही. चहा सुद्धा पाजत नाहीत. ड्रेसचे पैसे कापून घेतले. तुम्ही नगरसेवकाच्या अडचणी समजून घ्या. दापोडीच्या शाळेत इतके चांगले भाषण केले. तिथे टिपटिप पाणी पडतेय. मुख्य विभागाला आजपर्यंत ३ पत्रे दिली. त्या वॉर्डाच्या नगरसेविका गायकवाड ताई त्या कार्यक्रमाला होत्या. त्या म्हणाल्या, मी सुद्धा पत्र दिले होते. अधिकारी म्हणतात, महापालिकेत बजेट नाही. ही महापालिकेची शोकांतिका आहे. त्या शाळेच्या वरच्या बाजूला जो वर्ग भरतो. आख्खी भिंत पाण्याने भरलेली आहे.

शाळेमध्ये दूर्घटना घडली तर त्याला जबाबदार कोण. शाळा सुंदर ठेवू शकत नाही, गार्डन व्यवस्थित ठेवत नाही, जर पिण्याला पाणी व्यवस्थित देऊ शकत नाहीतर फ्लायओव्हर करु नका हे सर्वांचे दुःख आहे. तिथली स्वच्छता रोजच्या रोज व्हायला पाहिजे. रोड चांगले असले पाहिजेत. ड्रेनेज लाईन चांगल्या असल्या पाहिजेत. फोकस केल्यानंतर अडचणी दिसतात. परंतू अजेंडा बाजूला ठेवून दिड तास चर्चा करतोय. हे दुःख, वेदना सामान्य नागरिकाची वेदना आहे. तुम्ही नगरसेवकांना काय अधिकार ठेवला आहे. आम्हाला उत्तर द्या. आमचे काहीच ऐकले जात नाही. सरसकट प्लंबर बदलले. इलेक्ट्रीशियन बदलले, जे.ई. बदलले. कुठे पाण्याची लाईन, गटर लाईन त्यांना काही माहित नाही काय कामे करायची. यामुळे विस्कळीतपणा आला आहे. प्रत्येक जण तक्रार करत बसत नाही. त्यांचे टार्गेट सामान्य नागरिक आहे. त्यांचे टार्गेट नगरसेवक आहे हे किती बाजूंनी बोलले जाते आहे. माझ्या वार्डातला इलेक्ट्रीशियन बदली करुन टाकला. २/३ दिवस लाईट लागत नाही. ५/५ दिवस हायवेचे दिवे लागत नाहीत. लोक तक्रारी करतात. इलेक्ट्रीशियन म्हणतो, खालच्यांना सांगा. खालचे म्हणतात, मटेरिअल नाही, केबल नाही. अशी उत्तरे आम्ही ऐकायची का. या गोष्टींकडे लक्ष द्यावे अशी विनंती आहे. जे खड्डे सभागृहात मांडले गेले ते रस्त्यावरील खड्डे होते. नगरसेवकाच्या मानसिकतेला पडलेले खड्डे आहेत, ते तुम्ही उत्तम प्रशासक म्हणून भरुन काढावेत अशी विनंती करतो.

------------

(नवनिर्वाचित नगरसेविका मा.श्रद्धा लांडे यांचा मा.महापौर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.)

------------

**मा.सुजाता पलांडे** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १

दिनांक - २६/७/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.भूजि/१/कावि/१३६/२०१३ दि.१०/०४/२०१३

२) मा.स्थायी समिती सभा दिनांक १६/०४/२०१३ ठराव क्र.३२७७ नुसार

प्रस्तावासोबत जोडलेल्या पिंपरी चिंचवड मनपा भूमि जिंदगी विभागाच्या मिळकत वाटप नियमावली २०१३ यास मान्यता मिळणेकामी व त्यानुसार शासनास सादर करणेकामी सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, या विषयावर खुलासा करण्यात यावा.

**मा.गायकवाड** (सहा.आयुक्त,करसंकलन)-मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, आपण महापालिकेच्या मिळकती संदर्भात मिळकत वाढीबाबत नियमावली २०१३ मध्ये अशी एक नियमावली तयार केली आहे. ही नियमावली शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावयाची आहे. या नियमावलीमध्ये एकूण १२ भाग आहेत. १२ भागामध्ये कलम ७९ मध्ये 454, 455 खाली महापालिकेला जे अधिकार आहेत, त्याच्या आधारे ही नियमावली तयार केलेली आहे. पुणे महापालिकेने ज्या नियमाच्या आधारे नियमावली तयार केली होती. ती शासनाला सादर केली होती. शासनाने ती नियमावली मान्य केली आहे. त्याच धर्तीवर ही नियमावली तयार केली आहे. भाग 1 मध्ये कधीपासून पूर्तता होणार आहे याबाबत आहे, भाग २ मध्ये सुरक्षेची व्याख्या आहे. भाग ३ मध्ये जागा वाटपासंबंधिचे अधिकार नमूद आहेत. भाग ४ मध्ये कोणत्या मिळकतीचे वाटप करायचे हे दिलेले आहे. भाग ५ मध्ये मिळकतीचा विनियोग कसा करावा हे आहे. भाग ६ मध्ये भाडे आकारणीची मुदत कशी असेल, भाग ७ मध्ये जागेची मूळ आकारणी कशी केली जाईल याचा उल्लेख आहे. भाग ८ मध्ये मिळकतीच्या वेगवेगळया अटीशर्ती कोणत्या असतील याचा उल्लेख आहे. भाग ९ मध्ये मिळकतीच्या वाटपाची पद्धत नमूद केली आहे. महापालिकेच्या वेगवेगळया विशेष प्रकल्पांसंदर्भात अटीशर्ती नमूद आहेत. भाग ११ व भाग १२ मध्ये याचप्रमाणे यात नियमावली नमूद आहे. प्रामुख्याने या महत्वाच्या बाबी बाहेत. यात ११ महिन्यांच्या कालावधीत मिळकत वाटप होते. ज्या मिळकतींचे वाटप अधिकारी स्तरावर होते, १ वर्षांत ३० वर्षाच्या कालावधीसाठी मिळकतीचे निविदा पद्धतीने महापालिकेला मिळकतीचे वाटप करायचे अधिकार इथे दिले आहेत. ज्या मिळकती

महापालिकेच्या ताब्यात आहेत त्यांचा त्यात उल्लेख आहे. त्यांचे वाटपामध्ये स्थानिक परिसरातील व्यावसायीक व्यक्ती, मागासवर्गीय,निराधार महिला, राष्ट्रपती/राज्यपाल यांच्याकडून द्रोणाचार्य पुरस्कार विजेते खेळाडू यांच्यासाठी रिझर्वेशन ठेवले असल्याचे नमूद केले आहे. महापालिकेचे सेवक यांच्यासाठी रिझर्वेशन ठेवले आहे. त्याप्रमाणे ज्या व्यक्ती निविदा प्रक्रियेत भाग घेतील, त्यांच्यासाठी गाळे वाटपाची एकंदरीत नियमावली तयार केली आहे.

**मा.विलास नांदगुडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.प्रशांत शितोळे यांनी जो विषय मांडला आहे, तो मा.विधी समितीमार्फत यावा का मा.स्थायी समिती मार्फत डायरेक्ट देऊ शकतो का हा महत्वाचा प्रश्न आहे, याचा खुलासा करावा. मा.प्रशांत शितोळे यांचे म्हणणे आहे, विधी समितीचे अधिकार का घेताय? विधी समितीत विषय मांडल्यानंतर तो मा.महापालिका सभेमध्ये मंजूरीसाठी यावा.

**मा.तानाजी शिंदे** (अतिरिक्त आयुक्त) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कायद्याच्या तरतूदी अंतर्गत बायलॉज करतो, नियम करतो. जशी जकातीची नियमावली दिलेली होती. त्यावेळी सुद्धा स्थायी समितीची मान्यता घेऊन मा.महापालिका सभेमध्ये विषय घेतला होता. सभागृहाची मान्यता असेलतर प्रशासनामार्फत मा.विधी समिती समोर जाण्यासाठी प्रस्ताव ठेवला जाईल.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, तुम्ही हा विषय आणला. खूप चांगली गोष्ट आहे. चांगली नियमावली करतोय. महापालिकेच्या मिळकतींची निविदा काढून लोकांना योग्य दराने देण्यासाठी काम करणार आहोत. याअनुषंगाने एक सूचना आहे, आपल्या पूर्वीच्या मिळकतींपैकी महापालिकेच्या नेमक्या किती आहेत. ज्यांचे वाटप केलेले आहे, त्यांची मुदत नेमकी किती आहे. त्यापैकी किती मिळकतींचे पैसे नियमित मिळतात, किती मिळकतीचे पैसे येणार आहेत? जकातीचे उत्पन्न बंद होऊन एलबीटीच्या माध्यमातून उत्पन्न मिळणे अपेक्षित आहे. याचबरोबर आज आपल्यासमोर महापालिकेच्या मिळकतींचा अतिशय महत्वाचा विषय आहे. त्यापासून मोठया प्रमाणात उत्पन्न मिळू शकते. अगदी जर मोठ्या प्रमाणात टेंडर काढले तर योग्य दर मिळण्यात अडचण निश्चित नाही. उत्पन्नाचा चांगला सोर्स निर्माण होऊ

शकतो. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सभागृहाला हे माहित करुन दिले पाहिजे, आपलेकडे महापालिकेचे किती मिळकती आहे व किती मिळकतींचे वाटप केले आहे. कोणत्या दराने केले आहे व किती उत्पन्न महापालिकेला मिळते आहे, किती उत्पन्न मिळत नाही. थकबाकी किती आहे या गोष्टींचा प्रशासनाने विचार करुन सभागृहाला माहिती द्यावी. महापालिकेच्या अधिकृत, अनधिकृत किती मिळकती आहेत या संदर्भात माहिती मिळाली तर निश्चित उपयोग होईल. यात लक्ष घातले तर महापालिकेच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल.

**मा.आर.एस.कुमार**- मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, ११ महिन्यांच्या कराराने जागा वाटपाचा अधिकारी प्रभाग अधिका-यांना राहील, यात असे आहे का? ४/५ महिन्यांपासून बदल्या होत आहेत. ११ महिन्यांच्या कराराने देता येऊ शकते असे मी विचारल्यावर ते म्हणतात, दुसरा विभाग निर्णय घेणार. तिथे लोक गाड्या लावतात व पार्किंगचे पैसे वसूल करत नाहीत. जागा मोफत, पार्किंग मोफत. अधिका-यांना पॉवर्स दिलेल्या आहेत. मा.अजित गव्हाणे यांनी सांगितले ते खरे आहे. आपण भाडे वसूल करत नाही. ६ कोटी इतकी भाडे वसूलीची थकबाकी आहे. याप्रमाणे तुम्ही लिस्ट घेणार होता. गेले ५ वर्षांपासून लाखो करोडो रुपये वसूली झालेली नाही. ३ महिने भाडे भरले नाहीतर चौथ्या महिन्यात आपण ती प्रॉपर्टी काढून घेतली पाहिजे. याची जबाबदारी कोणाची आहे? जर भाडे वसूल करत नाहीत तर महापालिकेचे नुकसान होते. प्रायव्हेटमध्ये असे करतील का? अनेक लोक २/३ वर्षे महापालिकेच्या मिळकतींमध्ये राहतात पण भाडे देत नाहीत. लिस्ट बघितल्यावर कळेल. याला जबाबदार असणा-या अधिका-यावर कारवाई व्हायला पाहिजे.

**मा.बाबासाहेब धुमाळ** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुकनगरी पुर्वी होती ती आता राहीली नाही. ज्यावेळी वाहतुकनगरी उभारली, त्यावेळी ख-या अर्थाने पिंपरी चिंचवड शहरात नाशिक फाटा इथे वाहतुक व्यवस्था करत होतो. रस्त्यावर अडचण होते म्हणून त्यावेळी संपूर्ण १०० एकर जमिन संपादित करुन वाहतूक नगरी इथे व्यवस्था उपलब्ध करुन दिली होती. असे असताना फक्त २६ एकर जागा वाहतुक व्यवस्थेसाठी दिली. तिथे जवळपास पंधराशे ट्रक ये-जा करीत असतात. त्यावेळी नाशिक फाटा इथे रस्त्यावर नाक्याचे काम होत होते म्हणून

तुम्हाला प्लॉट दिले जातील त्याप्रमाणे त्यांनी व्यवसाय चालू केला. जवळजवळ १९८६पासून त्याठिकाणी वाहतुकनगरी तयार झाली. गेली १०/१५ वर्षे तिथे व्यवसाय करतोय. जवळ जवळ १९८६ पासून त्याठिकाणी वाहतुकनगरी तयार झाली व गेली सहा वर्षे त्याठिकाणी व्यवसाय करीत आहे. प्राधिकरणाला मोठे उत्पन्न देतोय. असे असताना आमची वाहने ज्याठिकाणी उभी करायला येतात, लाखो रुपयांचा माल ऑर्डर करुन वाहने उभी राहतात. कोणत्याही वाहनतळाचे अग्रीम घेतले जात नव्हते. कोणत्यातरी नगरसेवकाच्या डोक्यात कल्पना आली म्हणून त्याठिकाणी वाहनतळ उभारले. काही दिवसांपूर्वी त्या ठेकेदाराने वॉचमन ठेवला होता. त्यामुळे आपल्या गाडीचे संरक्षण होईल या आशेपोटी गाड्या उभ्या करत होते. त्या ठेकेदाराने धंदा चालू केला. राहिलेल्या जागेत वर्कशॉप चालू केले. १०/१५ जणांनी त्यावेळी सांगितले असे असे घडते आहे. त्यावेळी कोणीही लक्ष दिले नाही. वाहनतळ कमी पडू लागले. झोपडपट्टी व्हायला लागली. स्पेअर पार्टपासून सगळी दुकाने सुरु झाली. ठेकेदाराने महापालिकेचे कमीत कमी ११ लाख बुडवले आहेत. ज्यावेळी आम्ही कळवले की असे असे चालले हे, महापालिकेने त्याला मुदतपूर्व काढून टाकले. नवीन ठेकेदार येईल म्हणून त्याप्रमाणे तो तेथे आला. त्याची कल्पना आयुक्त साहेबांनी दिली. त्याने सुद्धा महापालिकेचे १७ लाख बुडवले. ठेकेदारांनी महापालिकेचे २५ ते ३० लाख बुडवले. तिसरा ठेकेदार आला, त्याने सुद्धा याचप्रकारे पैसे बुडवले. दुकानदारांकडून दादागिरी करुन १० ते १५ हजार प्रति महिना वसूल करायला सुरुवात केली. काही मंडळींनी सुद्धा आपण वसूली करायची याची कल्पना दिली होती. ती आयुक्त साहेबांनी कॅन्सल केली. याठिकाणी महापालिकेला उत्पन्न मिळत नाही. माझी विनंती आहे, टेंडर काढून उत्पन्न मिळणार नाही. ट्रकला किंवा मालाला संरक्षण दिले जात नाही. वाहतूकदारांना त्याठिकाणी वाहने उभी करण्यास परमिशन देण्यात यावी. त्याप्रमाणे पैसे द्यायला तयार होतो. असोसिएशन ठरवा, भाडे ठरवा. ठेकेदाराने गंडवले आहे. जास्तीत जास्त मंडळींचा त्याठिकाणी हात आहे. मी आयुष्यात कोणाकडूनही हप्ता घेतलेला नाही. असे असे चालले आहे म्हणून सांगत होतो. तिथे ऑल इंडिया कॉंग्रेस ट्रान्सपोर्ट युनियन आहे. जागेचे काय भाडे असेल ते ठरवा. आमची असोसिएशन आहे, ते पैसे भरायला तयार आहेत.

**मा.विलास नांदगुडे** – मा.महापौर साहेब, संबंधित विभागाने विषय क्रमांक १ विधी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** :- हा विषय मा.विधी समितीकडून आणावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३१७ विषय क्रमांक - १
दिनांक -२६/७/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमुका/२/कावि/३१२/२०१३
दि.३१/५/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक ११/६/२०१३ ठराव क्र.३५२४ नुसार

प्रस्तावासोबत जोडलेल्या पिंपरी चिंचवड मनपा भूमि जिंदगी विभागाच्या मिळकत वाटप नियमावली २०१३ यास मान्यता मिळणेकामी व त्यानुसार शासनास सादर करणेकामीचे विषयपत्र संबंधित विभागाने मा.विधी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारशी करणेकामी पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.अपर्णा डोके** -मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - २
दिनांक - २६/७/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जाक्र..आमुका२०१३/३१२/कावि/२/
दि१३/५/३१.
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक ११/६/२०१३ ठराव क्र.३५२४ नुसार

मे.रोटरी क्लब ऑफ पिंपरी-चिंचवड (शहरातील ६ शाखा) यांना प्रस्तावातील ६ जागा **१)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक, (सध्याचे Urinalsचे ठिकाणी), मुंबई-पुणे रस्ता, पिंपरी, पुणे-४११ ०१८, **२)** फुगेवाडी जकात नाक्याचे बाहेरील बाजूस, फुगेवाडी, पुणे-मुंबई रस्ता, पुणे-४११ ०१२, **३)** के.एस.बी. चौक, पिंपरी, पुणे-४११०१८ (आरक्षण क्र.१०), **४)** बर्ड व्हॅली (गेटचे बाजूस आतील मोकळी जागा), संभाजीनगर, चिंचवड, पुणे-४११ ०१९, **५)** साई चौक, (जेष्ठ नागरिक संघ वाचनालयाचे बाजूस) नवी सांगवी, पुणे-४११ ०२७, **६)** भोसरी उड्डाण पुलाखाली (समाधान हॉटेलसमोर पुलाच्या खांबास लागून), भोसरी, पुणे-४११ ०३९ (प्रत्येक ठिकाणी सुमारे ५०० चौ.फुट) ३० वर्षे कालावधीसाठी र.रु.१/- प्रति महिना नाममात्र भाड्याने व या जागांवरील जाहिरात हक्कांचे मोबदल्यात स्वखर्चाने "पैसे द्या व वापरा" तत्वावर महिला व पुरुषांकरीता सार्वजनिक स्वच्छतागृह उभारणीसाठी उपलब्ध करुन देण्यास व त्यांचेशी याबाबत करार (Memorandum of Understanding) करणेस "महाराष्ट्र महापालिका अधिनियम" कलम ७९ नुसार मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शितोळे**– मा.महापौर साहेब,सदर विषय तहकूब करण्यात यावा.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ३१८ विषय क्रमांक - २
दिनांक - २६/७/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमुका/२/कावि/३१२/२०१३ दि.३१/५/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक ११/६/२०१३ ठराव क्र.३५२४ नुसार

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.वैशाली काळभोर**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३१९ विषय क्रमांक - ३
दिनांक - २६/७/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/४/कावि/२५०/२०१३ दि.०२/०७/२०१३
२) मा.स्थायी समिती सभा दिनांक ०९/०७/२०१३ ठराव क्र.३६६९ नुसार

औंध मिलीटरी कॅम्प येथील मिलीटरी हद्दीमध्ये 25,000 वृक्षारोपण करणे व त्याचे 3 वर्षे देखभालसंरक्षण करणेचे काम महाराष्ट्र वनविकास महामंडळ/ यांना प्रतिवृक्ष र.रू.330/- या दराने देणेस व त्याकामी येणाया- रू.82,50,000/- खर्चास व यापुढे पर्यावरणाचे दृष्टीने मनपा हद्दीबाहेर 5 किआयुक्तसो .मी अंतर परिसरात वृक्षारोपण मा. यांचे व मास्थायी समितीचे मान्यतेने करणेस. तसेच सीएमई भोसरी गेट ते नविन पुना नाशिक रोड यामधील ज्या भागात वॉल कंपाऊंड बांधली आहे परंतु नागरिक रस्ता वापरत आहेत तेथे वृक्षारोपण करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.अश्विनी मराठे-**औंध मिलीटरी कॅम्प येथील मिलीटरी हद्द ही पालिकेच्या हद्दीबाहेर आहे. पिंपरी चिंचवड पालिकेतील सर्व नागरिक कर भरतात. तो निधी आपण हद्दीबाहेर खर्च करतो याचा खुलासा हवा आहे. पालिकेच्या हद्दीत जागा नाही का? त्यासाठी औंध कॅम्प मिलिटरी एरियात जायची का गरज पडते याचा खुलासा पाहिजे.

**मा.अश्विनी चिंचवडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वृक्षारोपणाबाबत आवाहन केले होते. त्याअनुषंगाने महानगरपालिकेच्या हद्दीतील सोसायट्या, लघुउद्योजक यांचे एकत्रित पथक आयोजित करण्यात आले होते. काही शैक्षणिक, सामाजिक व स्वयंसेवी संस्थांनी मा.उद्यान अधिक्षक यांना पत्र देऊन वृक्षारोपण कार्यक्रमात सहभागी होऊन मोफत रोपे उपलब्ध करुन देण्याबाबत मागणी केली होती. मा.उद्यान अधिक्षक यांना माहिती देऊन वृक्षारोपणाबाबत मार्गदर्शन करण्याबाबत विनंती केली होती. परंतू मा.उद्यान अधिक्षक व त्यांच्या कर्मचा-यांनी याबाबत काहीही संपर्क साधलेला नाही. पेपरमध्ये नोटीस आली. मिलिटरी हद्दीत वृक्षारोपण केले जाणार आहे. आपल्या प्रभागात जागा उपलब्ध आहे. आम्ही काय समजायचे? आम्हाला रोपे उपलब्ध होत

नाहीत. त्याबाबतीत निश्चित पत्रव्यवहार केला आहे. माझ्यापर्यंत कोणीही अधिकारी आलेले नाही. याचा खुलासा मला हवा आहे.

**मा.उल्हास शेटटी** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – तळवडे,देहूरोड एरिया येथे जागा उपलब्ध आहे त्या ठिकाणी झाडे लावण्यास काहीच हरकत नाही.

**मा.गोरक्ष लोखंडे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, झाडे लावण्याचा विषय मागील वर्षी आला होता. मी सुध्दा रानजाई नावाच्या संस्थेचे काम पाहतो. उद्यान अधिक्षकांना पत्र देऊन देखील त्यांनी परत कळवले नाही. काही पर्यावरणविषयक संस्था पुढे येऊन शहराचा ग्रीन बेल्ट वाढवण्यासाठी, शहर सुंदर, हरित करण्यासाठी पुढे येत असतील तर आपण त्यांना संधी दिली पाहिजे, प्रोत्साहन दिले पाहिजे. मिलिटरीच्या जागेत रोपे लावणार, फार मोठा खर्च होतो आहे. तो झालाच पाहिजे. पर्यावरण राखले पाहिजे. आपल्याला विनंती आहे की, संबंधितांना तसा आदेश देण्यात यावा.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाला माझा विरोध नाही. २००४ पासून आपण देहूरोड मिलिटरी हद्दीत वृक्षारोपण केले होते. त्यातील किती रोपे आहेत. कुठे वणवा लागला नाही. जुन्या पुणे-मुंबई हायवेने गेल्यानंतर मिलिटरी हद्दीतून वृक्ष लावून घेणार. 3 वर्षांनंतर असे दिसते की त्यांची कोणी देखभाल करते असे वाटत नाही. त्याठिकाणी वणवा लागल्यानंतर किती झाडे तिथे आहेत, याकडे आपल्या लोकांचे लक्ष असावे. प्रॉपर जागेत झाडे लागली आहेत का? कितीतरी उद्यानांमध्ये झाडे लावायची आहेत. ट्रिटमेंट प्लॅन्टसाठी सव्वाकोटी रुपये खर्च केल्याचे सांगतोय. विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी मोठे उद्यान बांधू शकतो. आंबा, चिंच, वड ही झाडे लावली. विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी चांगल्या पद्धतीचे गार्डन व्हावे. खूप वेळा मागणी केली. किती बोलायचे. अधिका-यांचे मनोधैर्य खचले नाही पाहिजे. प्रत्येक विषयाला अधिका-यांना टार्गेट करायचे. त्यांची मानसिकता काम करायची राहणार नाही. जिथे-जिथे मागणी केली, तिथे द्यायला काय हरकत आहे का? झाडे दिली गेली पाहिजेत. ती लागतात का नाही. ज्यांनी मागणी केली तिथेच वळून जातात, याचा विचार केला पाहिजे. मिलिटरी हद्दीत झाडे दिल्यानंतर आपल्याला कमीतकमी पाहण्याचा अधिकार तरी राहणार आहे का? देहू रोडला लाखोंनी झाडे लावली. मा.राज्यपालांनी लावलेले झाड तरी जतन झाले आहे का? आपण केवळ पैसे द्यायचे असे होऊ नये, याचा खुलासा द्यावा.

**मा.श्रीरंग बारणे**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,मा.मंगलाताईंनी सांगितले, त्याचा खुलासा देत नाही. महापालिकेने त्यावर कंपाऊंड केली होती, त्याचे काय झाले? औंध मिलिटरी हद्दीत मा.श्रीनिवास पाटील यांनी सुबाभूळीची झाडे लावली होती. सुबाभूळची झाडे काही ठिकाणी कमी स्वरुपात लावली. काही ठिकाणी जास्त प्रमाणात लावली. आत्ता ही झाडे कुठे लावण्यात येतील याचा खुलासा करावा. आपल्या एरियात कायमस्वरुपी लावलीतरी त्याचादेखील फायदा होईल. मिलिटरी हद्दीतील किती झाडे टिकली याचा खुलासा करावा.

**मा.धनंजय आल्हाट**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मोशी कचराडेपो जवळ वृक्षरोपण करण्याचे १८ लाखांचे टेंडर दिले गेले असल्याचे मी स्वतः वाचले होते. वेगवेगळ्या प्रकारचे वृक्ष लावले जाणार होते. प्रत्यक्षात त्याठिकाणी यापूर्वीच मी अनेकवेळा पाहिले. वन खात्याची झाडे होती. पुर्वी सुध्दा या ठिकाणी वृक्षरोपण केले होते. दहा वेळा रोपे लावण्याचा प्रयत्न केला होता. तेथे दहा हजार झाडे लावायची होती. १ वर्ष झाले, वेगळा इंडीकेटर किंवा १०,००० झाडे ओळखता यावीत याबाबत याठिकाणी आज परिस्थिती काय आहे? यासंदर्भात पर्यावरण अधिका-यांनी उत्तर दयावे. आज या ठिकाणी महापालिकेने १८ लाख रुपये खर्च केला आहे. त्यांची आजची परिस्थिती काय आहे? पर्यावरण अधिका-यांनी उत्तर द्यावे. कुठल्या प्रकारची झाडे याठिकाणी लावली आहेत. आंबा, चिंच, वड ही झाडे त्याठिकाणी नाहीत. सुबाभूळ शिवाय दुसरे झाड दिसत नाही. ठेकेदारी पद्धतीने १८ लाखाचे काम दिले. एका अर्थाने या ठिकाणी भ्रष्टाचार झाला आहे काय. यांची आजची परिस्थिती काय आहे याबाबत संबंधित अधिका-यांनी उत्तर दयावे.

**मा.राजेंद्र काटे** -मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एवढी झाडे लावतोय. देखभाली करण्याचे राहून गेल्यामुळे झाडे मेली जातात. पिंपरी चिंचवड शहरातील सोसायट्यांतील नागरिकांना झाडे देता येतील का? ते चांगल्या प्रकारे सांभाळतील, निश्चितपणे चांगला उपयोग होईल. सोसायट्यांनी मागणी केलीतर आपले अधिकारी देता येणार नाही असे सांगतात. महापालिकेच्या कार्यक्षेत्रात ज्या सोसायटी आहेत, त्यांना आपल्या विभागाच्या कार्यक्रमांतर्गत त्यांचे वतीने ही झाडे दयावी. त्यामुळे त्या झाडांची योग्यप्रकारे देखभाल होईल. निश्चितपणे अशी झाडे देण्याचे चांगले धोरण आहे. आता जी झाडे आहेत, अस्तित्वात आहेत, ती दाखवा व याबाबत खुलासा दयावा.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, प्रायव्हेट सोसायट्यांमध्ये झाडे लावायची होती, मागणी केली होती. उत्तर दिले, प्रायव्हेट सोसायट्यांमध्ये देता

येणार नाही. जे लोक टॅक्स पे करतात, त्यांना जाच करायचा व मिलिटरी हद्दीत फ्रिमध्ये झाडे लावायची.

**मा.सुलभाताई उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, औंध मिलीटरी कॅम्प हद्दीत २५,००० झाडे लावतोय. मिलीटरी हद्दीमध्ये रेड झोन आहे. प्रति वृक्ष रु.३३०/- दराने मेंटेनन्ससहीत रोपे पण देणार आहोत. खड्डे खोदायला चार्ज नाही का. पुन्हा वेगळा खर्च होतो का, एकत्रित खर्च होतो हे सांगावे.

**मा.वसंत लोंढे-**मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, यापूर्वी सीएमईत वृक्षारोपण केले होते. पण ही झाडे अजिबात राहिलेली नाहीत. झाडे लावताना औषधी वनस्पती लावा. त्याचा फायदा शहराला होईल. १९८४ मध्ये हरनामसिंग यांनी अनेक चांगली झाडे लावली होती.

**मा.साळुंके (**मुख्य उद्यान अधिक्षक**)-**मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, मा.अश्विनी मराठे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. आपल्या एरियात एवढ्या मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध नाही. म्हणून आपल्या शेजारच्या मिलिटरीच्या जागा आहेत. त्यावर वृक्षारोपण करण्याबाबत आपण मा.वृक्ष समितीत ठराव केला होता. त्यानुसार ते करत आहोत. मा.अश्विनी चिंचवडे यांनी पत्र दिले होते. याबाबतीत त्यांच्याशी संपर्क साधला होता. नर्सरीमध्ये त्यांना पाहिजे ती रोपे उपलब्ध करुन दिली जातील. उद्या म्हटले तरी रोपे उपलब्ध करुन देतो.

**मा.अश्विनी चिंचवडे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी अनेकवेळा पत्र दिले होते. नर्सरीमध्ये रोपे शिल्लक होती ती उपलब्ध करुन दयावी. तसेच आता उद्यानमधील झाडे उपलब्ध करुन दया.

**मा.साळुंके (**मुख्य उद्यान अधिक्षक**)-**मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, मिलिटरी हद्दीमध्ये एकूण २९३६८ वृक्षांचे वृक्षारोपण केले होते २००५ मध्ये राज्यपालाच्या हस्ते वृक्षारोपण केले होते. चार वर्षे संपली. त्याप्रमाणे मिलिटरी हद्दीसंदर्भात त्यावेळी ७५ टक्के सर्व्हायवल होते. हे वृक्ष त्यांच्याकडे हस्तांतरित केल्यानंतर आपण पाहिले नाही. आपले सुचनेनुसार झाडे लावली होती. ट्रिटमेंट प्लाण्ट इथे फळझाडे लावणार आहोत, ती आपल्या सूचनेनुसार लावणार आहोत. औंध मिलिटरी एरियाच्या आतील बाजूस झाडे लावणार आहोत. रोड वायडींगमध्ये जागा गेली होती. मोशी कचरा डेपो इथे झाडे लावून दोन वर्षे त्या झाडांचे संगोपन करण्याबाबत निविदा होती. मोशी कचरा डेपो येथे दहा हजार झाडे आहेत. सर्वे नं. १३१ जुना कचरा डेपो इथे पाच हजार झाडे आहेत.

अजूनही देखभालीचा कालावधी त्यांच्याकडे आहे. काटे साहेबांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याबाबत मा.वृक्ष प्राधिकरण समितीतून धोरण ठरवून झाडे लावता येतील. मोशी कचरा डेपो येथे गेल्या वर्षी दहा हजार वृक्षारोपण केले होते. त्याची दोन वर्षे देखभाल त्यांच्याकडे आहे.

**मा.धनंजय आल्हाट** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण अर्धवट खुलासा करता. जोपर्यंत उत्तर देत नाही, तोपर्यंत खाली बसणार नाही.

**मा.साळुंके (**मुख्य उद्यान अधिक्षक**)-**मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य,मोशी कचरा डेपो इथे १०,००० वृक्षारोपण केले होते. निविदा ११.७५**%** बिलो होती. २ वर्षे देखभाल करायची आहे. वड, पिंपळ, चिंच, कदंब, कांचन हे वृक्ष आहेत. १०,००० झाडे जिवंत आहेत. मा.वृक्ष प्राधिकरण समितीच्या निर्णयानुसार प्रति वृक्ष खर्च रु३३०/- ३ वर्षे देखभाल करायची आहे. पर्यावरण संस्कारमध्ये २०० प्रकारच्या आयुर्वेदीक झाडांची लागवड केलेली आहे.

**मा.सविता साळुंके -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.अश्विनी चिंचवडे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याबददल त्यांचे अभिनंदन करते. पिंपरी चिंचवडमध्ये जागा नाही का. साळुंके साहेबांनी दिलेला खुलासा समाधानकारक नाही. प्रत्येक मुलामागे एक झाड लावणे बंधनकारक करा. बिल्डरला बिल्डींग परमिशन देताना एका गुंठ्यास एक झाड याप्रमाणे प्रत्येक झाडामागे १५००-२००० रुपये घेतो. उद्यान विभाग फक्त पैसे गोळा करायचे काम करतो. प्रत्येक सोसायटी पुढे किती झाडे लावली ते पहात नाही. माझी विनंती आहे. एक गुंठा बांधकामाला एक झाड लावले पाहिजे. याप्रमाणे आपल्याकडे किती पैसे जमा होतात. आपण त्याप्रमाणे किती झाडे लावण्यासाठी प्रयत्न केले. आपण जे उत्तर दिले त्यातून सभागृहाची दिशाभूल होत नाही का. आयुक्त साहेबांनी याचा खुलासा द्यावा.

**मा.अनिता तापकीर**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आजपर्यंत किती झाडे लावली कुठली कुठली झाडे लावली याबददल समाधानकारक उत्तर दयावे.

**मा.शमीम पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य असूनसुद्धा सभागृहासमोर बोलावे लागते, व्यथा मांडावी लागते याचे दुःख होते. आयुक्त साहेबांच्या कार्यबाहुल्यामुळे वृक्ष प्राधिकरण समितीचे अध्यक्ष असून सुद्धा मी याआधी बोलले होते. पुन्हा हेच बोलतेय. वृक्ष प्राधिकरण समिती ही वृक्ष संरक्षण समिती नसून वृक्ष तोड समिती आहे. एक विषयपत्रिका घ्या. कोणकोणते वृक्ष तोडायचे

एवढा एकच विषय असतो. यात पाच-पाचशे वेगवेगळ्या जागा. या कंपनीतील, एमआयडीसीतील झाडे तोडायची आहेत. बांधकाम अडले असून ही झाडे तोडायची आहेत. याशिवाय दुसरा विषय असेल तर आमचा राजीनामा घ्या. आपण कोणाला रोपे देणार, किती गुंठ्यात वृक्षारोपण करणार हे विषय या समितीत येत नाहीत. सन्मा. साळुंके साहेब उत्तर देतात का. रोपे कुठून आणणार, काही उत्तर देत नाहीत. मागील वर्षी काही ठिकाणी झाडे लावली. अधिकारी आणि पदाधिकारी यांच्या उपस्थितीत झाडे लावली जातात. पंचवीस हजार झाडांचे वृक्षारोप्पण करण्याचा चांगला विषय आहे. आपल्या एसटीपी प्लॅन्टमध्ये मोठमोठी झाडे लावावीत. या झाडांना पाणी कसे पुरवायचे. उद्यान विभागाकडे एकच टँकर आहे असे मला कळाले आहे. प्रत्येक प्रभागात एक टँकर ठेवला आहे. एसटीपीचे पाणी त्या टँकरद्वारे दिलेतरी सगळी झाडे नक्कीच जगतील. माझे सहकारी साळुंकेताईंनी खुप चांगले सांगितले. बिल्डींग परमिशन देतात, प्लॅन पास करताना उद्यान विभागाची एनओसी घेतात. त्यावेळी आपले १ गुंठ्यासाठी १ झाड हे मानांकन चुकीचे आहे. ६ गुंठ्यात सोसायटी असेल तर तिथे ६ झाडे असतील हे आपले मानांकन चुकीचे आहे, ते बदलायला हवे. बिल्डर एनओसी घेताना प्रत्येक झाडांचे दोन हजार भरतात. दोन हजार रुपये देवून सुध्दा झाडे लावत नाहीत. मी हा विषय कमिटीपुढे काढला होता. ते म्हणतात, झाडे लावायची राहिली. बांधकाम पुर्ण होते कोणीही बघायला जात नाही. त्यावेळेस झाडाची लागवड झालेली असते. बिल्डींग परमिशन दिल्यावर प्लिंथ चेकसाठी तुमचे अधिकारी साईटवर जातात, त्यावेळेस झाडांची लागवड झाली पाहिजे. बांधकाम पूर्ण होतानाच झाडे वाढतील. कंप्लीशन सर्टिफिकेट दिल्यानंतर बरीचशी झाडे लावली जातात. व ते ती झाडे लावत नाहीत हा सरळ सरळ अर्थ आहे. ही खरेतर लाजिरवाणी गोष्ट आहे. ३० कोटी इतका निधी उद्यान विभागाकडे जमला आहे. लोक भरलेले पैसे परत घ्यायला येत नाहीत. एवढा निधी काय करायचा आहे. झाडे लावलीतर ते निधी घ्यायला नक्की येतील. लोक झाडे लावून घ्यायची तसदी घेत नाहीत. शहरात वृक्षलागवड कशी होईल हा पहिला प्रश्न आहे. प्लिंथ चेकींगबरोबर झाडे लावलीत का नाही हे चेक करा. शहरात कुठे झाडे लावली कुठे नाही याचे सर्क्युलर प्रत्येक नगरसेवकाला पाहिजे. प्रायव्हेट संस्था असो, हाऊसिंग सोसायटी असो, प्लॉट असो, खड्डे-खाणींतून झाडे लावली जातील. तसे नसेलतर ती अधिका-यांची चूक असेल. मा.अनिताताईंनी विचारले, मागील ५ वर्षातील झाडे वाचली याकडे कोणाचे लक्ष नसते. आमचाच उदो-उदो केला जातो. किती वाटले तरी याचे स्पष्टीकरण दिले जात नाही. या बाबीकडे विशेष लक्ष द्यावे.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या ठिकाणी बराच वेळ चर्चा चालली आहे. वृक्ष लागवड या विषयावर चर्चा करत असताना जाणिवपूर्वक आयुक्त

साहेबांना जाणिव करुन देण्यासाठी मी उभा आहे. ३ जून रोजी सूरतला सदस्य गेले होते. तिथे त्या मनपाच्या वतीने प्रसिद्ध गार्डन केलेले आहे. त्या गार्डनमध्ये सर्व प्रकारच्या वनस्पतींची लागवड केलेली आहे. गार्डनमध्ये फिरायला २ ते अडीच तास लागतात. पूर्ण पिंपरी चिंचवड शहरात तशा पद्धतीनचे नियोजन आपल्याला कुठेही पहायला मिळणार नाही. मी विनंती करतो की, उद्यान विभागाचे अधिकारी व सर्व नगरसेवक शासनाच्या वतीने गेलो होतो. आपल्याकडे त्याची प्रतिकृती करायची असेल तर मा.महापौर व मा.आयुक्त यांनी सर्व सदस्यांसहित दौरा करावा व प्रत्यक्षात गार्डनला भेट द्यावी. व तशी प्रतिकृती इथे करावी ही विनंती करतो.

**मा.श्रीरंग बारणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी सदस्य म्हणून अनेक गोष्टी सांगतो. सगळीकडे झाडे लावतो. आपण चांगली कामे करतो पण ती सांगण्यात कमी पडतो. कारण अंदाजपत्रकाच्या सभेच्यावेळेस सांगितले होते. तुमचे काम चांगले आहे. शहरातील प्रमुख लोकांना उद्याने दाखवा. फक्त सदस्यांसमोर असे विषय घेऊन येता. तुम्ही केलेली चांगली कामे दाखवा. झाडे लावत असताना पूर्वीचे शहर कसे होते. कोट्यावधी रुपये खर्च केले. बांधकाम विभागातून परवानगी देत असताना एका झाडासाठी अडीच हजार रुपये घेतो. १५ ते २० कोटी पडून आहेत. परंतू पठाणताईंनी सांगितल्याप्रमाणे बांधकाम चालू असताना झाडे लावलीतर ती राहणार नाहीत. कंप्लिशन झाल्यानंतर झाडे लावावी लागतील. ज्या-ज्या ठिकाणी कंप्लिशन घेतले असेल तिथे झाडे लावली आहेत का. याचा पूर्ण सर्वे करा. आपण आपल्या इज्जतीची लक्तरे या सभागृहात काढतोय. पुर्वीचे आयुक्त हरनामसिंह, गराडे साहेब यांच्या काळात दुर्गादेवी टेकडी उद्याने झाली. त्या टेकडीवर एक सुद्धा झाड नव्हते.बोटक्लब झाला आहे. बर्ड व्हॅली, पिंपळे गुरवचे उद्यान, शहरामध्ये अनेक चांगली उद्याने केलेली आहेत. सन्मा.सदस्य प्रश्न विचारत असताना त्याचे उत्तर देताना आपण कुठेतरी चुकत आहात. हे सुद्धा पहा. आपण उत्तर देताना कुठेतरी कमी पडताय. सदस्यांनी प्रश्न विचारला, आपण झाडे लावली का, त्यातील किती टिकली. अजेंडावर विषय असताना त्याविषयी आपण सांगितले पाहिजे. त्याचे उत्तर दयायला पाहिजे. इथे तुम्ही कुठेतरी कमी पडताय असे मला वाटते आहे. म्हणून शहरामध्ये झाडे लावण्याचा उपक्रम अतिशय चांगला केलेला आहे. त्याचप्रमाणे रस्ता रुंदीकरणात मोठ्या प्रमाणात झाडे तोडली आहेत. मानांकनाप्रमाणे किती झाडे लावणे आवश्यक आहे. किती झाडे टिकली आहेत, याची माहिती आपल्याकडे पाहिजे. हे सभागृहाला सांगता आले असते तर आपल्याविषयी मत चांगले झाले असते. आपण उत्तर देताना कमी पडलात. जिथे चुकते ते मान्य करा. सदस्यांनी मागणी केलीतर त्यांना झाडे द्यायला काय हरकत आहे. सामाजिक संस्था,

सोसायट्या यांना द्या. तिथे कायद्याचा बडगा दाखवू नका. आयुक्त साहेब, संबंधित विभागप्रमुखांना आपण तशा सूचना द्या. आपल्या चांगल्या कामाची सुद्धा प्रसिद्धी करा.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जसे आप्पा बारणे यांनी सांगितले आपण सादरीकरणामध्ये मार खातो. चांगल्या गार्डन होण्यासारखी परिस्थिती आहे. सगळ्या गोष्टी आहेत. ५०/६० लाखांत पॉण्ड डेव्हलप करु शकतो. पिंकनिक स्पॉट डेव्हलप करु शकतो. असे स्पॉट शोधले पाहिजेत. नुसते टूर्स आयोजित करुन, फोटो घेऊन येऊन काही होत नाही. तुम्ही या डिपार्टमेंटवर विश्वास ठेवला पाहिजे. परंतू आपल्याकडे तसे झालेले नाही. उद्यान डिपार्टमेंटला अधिकारी नाही. विभागाकडे स्थापत्य नाही, विद्युत नाही, काहीही यंत्रणा नाही. असलेल्या लोकांकडून मेंटनन्सची कामे करुन घेणे एवढेच काम आहे. १९ क्यूबी काढले आहेत. ठेकेदाराचा माणूस म्हणेल ती दुरुस्ती करतो. गार्डन विभागात लोक खूप चांगले काम करणारे आहेत. त्यांच्यावर विश्वास दाखवा. विद्युत विभाग एकत्र करुन टाकला तर त्याला गार्डन विभाग कारणीभूत का? आयुक्त साहेब, तुम्हाला एखादी गोष्ट सुचवलीतर नेमके त्याच्या उलट होत असते. नगरसेवक निवडून येतो तो प्रत्येक वर्षी मतदारांचा स्वभाव ओळखतात. तुमचा स्वभाव ओळखायला वेळ लागणार नाही. तुम्हाला नेमके उलट सांगितले. तुम्हाला सांगितलेल्या गोष्टी तुम्ही उलट्या करता. म्हणून उलट सांगून बघितले. बाकी गोष्टी करुन बघितल्या. कारण त्यांच्याकडे अधिकार नाहीत. ज्यावेळी गुलाब पुष्प प्रदर्शन झाले होते. कन्सल्टंट कशाला लागतो. स्थापत्य विभागाला सांगावेतर तुमचा कोण अधिकारी हे काम पाहतो. साळुंके साहेबांनी डोके आपटले होते. ते म्हणाले, स्थापत्य विभागाने अजूनही स्ट्रक्चर रेडी केलेले नाही. साळुंके कसे काम करु शकतील. आज आपण बोलतोय. ही एका भागाची परिस्थिती नाहीतर आख्या पिंपरी चिंचवड शहराची परिस्थिती आहे. त्यांना तळवडे गार्डन द्या. त्यांचे स्किल दाखवू द्या. हरनामसिंग यांनी त्यांचे स्किल दाखवले. आपल्या लोकांवर तुम्ही विश्वास ठेवत नाही. आम्ही म्हणतो, आमच्या बागा ठेकेदारांना अजिबात देऊ नका. मी तुम्हाला किता वेळा फोन केला आहे. दीड महिना झाला ते प्लास्टिकचे ग्लास चौक सुशोभिकरणात तसेच पडून आहेत. मी आठवण करतेय. अजूनही ते ग्लास तसेच पडून आहेत. अशी परिस्थिती असेल तर उद्यान विभागातील कर्मचा-यांना त्यांचे स्किल वापरु द्या. झाडे लावली पाहिजेत. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पावसाचे प्रमाण बदलते आहे. भूगर्भातील पाण्याची परिस्थीत वाईट होणार आहे. आज आपल्यासाठी तरी चांगल्या पद्धतीने काम केले गेले पाहिजे. उद्यान विभाग हा किरकोळ विभाग वाटत असला तरी तो किरकोळ

विभाग नाही. त्याच्यावर पिंपरी चिंचवड शहराचे सौंदर्य अवलंबून आहे. येणारे-जाणारे लोक म्हणतात, पिंपरी चिंचवडमध्ये बेंगलोर सिटीपेक्षाही जास्त हिरवळ दिसते. या गोष्टीचा आम्हाला अभिमान आहे. मी सुद्धा दिल्ली इथे जाऊन अवॉर्ड घेऊन आले होते. तुम्ही काम करायला संधी दिली पाहिजे. अधिकारीच असे बोलत असतील तर कर्मचा-यांचा काम करायचा इंटरेस्ट निघून जाईल. विद्युत-स्थापत्य उद्यान विभागात एकत्रित ठेवा. क्रिडा विभागाची हिच परिस्थिती आहे. माझ्याकडे फोटो आहेत. दुधेकर सभागृहात असतील तर त्यांना विचारा. अक्षरशः वाईट परिस्थिती आहे. आम्हाला अधिकार नाही, आम्ही काय करणार? आमचे म्हणणे आहे, कामे ही झालीच पाहिजेत. आमचे अधिकारी कमवायचे तेवढे केव्हाच कमवून बसले आहेत. आम्हाला काही फरक पडणार नाही. दीड वर्षात काही फरक पडत नाही. आम्हाला सगळे फेस करावे लागणार आहे. आम्ही शहराच्या समोर जाणार आहोत. विभाग वेगवेगळे झाले होते, ते कुठेतरी मिटवावे. साळुंके साहेब तुम्ही खूप चुकीची उत्तरे दिली आहेत. करोडो रुपये खर्च करतो. तुमचे उत्तर अजिबात योग्य नाही. आज १ कोटी घालवणार असलात तर त्याची १० वेळा चौकशी करा. कामगार नगरीचा कष्टाचा पैसा आहे. रस्ता ताब्याच घ्यायचा असला तरी मिलिटरीचे लोक रस्ता देत नाहीत. याचे मूल्यमापन केले गेले पाहिजे. अशा अटी टाका. जी झाडे लावली ती टिकली पाहिजेत. याची दक्षता घेतली पाहिजे. दरवर्षी अहवाल दिला पाहिजे. यात अटी टाकल्या पाहिजेत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३२० विषय क्रमांक - ४
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४६२/२०१३,
दिनांक - १२/०४/२०१३
२) मा.विधी समिती सभा दिनांक २८/६/२०१३ ठराव क्र.७ नुसार

श्री.अशोक मुंढे, सहाय्यक आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दि.१/०९/२०१२ पासुन पुढे शासन सेवेतील अधिकारी नव्याने महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर रुजु होईपर्यंतच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३२१ विषय क्रमांक - ५
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४६१/२०१३, दिनांक - १२/०४ /२०१३
२) मा.विधी समिती सभा दिनांक २८/६/२०१३ ठराव क्र.८ नुसार

श्री.शहाजी पवार,सहाय्यक आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दि.२३/०३/२०१२ पासुन पुढे शासन सेवेतील अधिकारी नव्याने महानगरपालिकेमध्ये सहाय्यक आयुक्त या पदावर रुजु होईपर्यंतच्या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे –** मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.श्रीरंग बारणे –** मा.महापौर साहेब,या विषयाच्या अनुषंगाने मध्यंतरी शहरातील ज्या बांधकामांची नोंदणी केली नाही. त्याचा आकडा जाहीर केलेला आहे. आपण सांगितल्याप्रमाणे महापालिकेच्या मिळकतींपैकी ३,६०,००० मिळकतींची नोंद आहे. या शहराच्या जवळपास ६ टक्के वाढती लोकसंख्या विचारात घेतली तर आपल्याकडे भारताचा लोकसंख्येचा आलेल्या अहवालानुसार २००५ साली आपल्याकडे १२,००० च्या आसपास कुटूंबे होती. आता शहरात जवळपास ५,३०,००० मिळकती आहेत. प्रामुख्याने

करसंकलन विभागात श्री.शहाजी पवार रुजू झाल्यानंतर सभागृहात त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. राज्य शासनाचा आदेश होता. सहा.आयुक्त पदाची ऑर्डर होती. त्यावर आक्षेप घेतला होता. शासन प्रतिनियुक्तीवर पाठवू शकते. आयुक्त पदावर पाठवू शकते. परंतू सहा.आयुक्त पदावर पाठवत असताना विशिष्ट या पदासाठी पाठवू शकत नाही म्हणून शासनाने करसंकलन पदावर नियुक्ती केली. परंतू गेली ४ वर्षे मिळकतींमध्ये मोठी वाढ झालेली आहे. ५ वर्षांतील २ लाख मिळकतीची नोंद धरली तर १५० कोटींचे उत्पन्न मिळाले. मागिल ५ वर्षांचा हिशोब केलातर करसंकलन विभागाकडून ५०० कोटींचा लॉस झालेला आहे. ती तूट कोण भरुन काढणार? एखाद्या अधिका-याने चूक केली असेलतर त्या अधिका-याची आर्थिक परिस्थिती एवढी उंचावत असताना, त्याच्या आर्थिक परिस्थितीचा सखोल विचार केलातर त्या पदासाठी काम करणा-या माणसाने त्या पदाला किती न्याय दिला आहे हे लक्षात येईल. शहरात अनधिकृत बांधकामांचा प्रश्न असताना २ लाख मिळकतींच्या नोंदी करुन घेणार होतो. त्यानुसार आजच्या तारखेला पूर्वलक्षी नोंदी करता येणार नाहीत. ज्या जुन्या मिळकती असतील तर जुन्या तारखेच्या नोंदी करता येणार नाहीत. त्या नागरिकांची भीषण ताकदीची चळवळ राहणार आहे. ३१ मार्च १२ नंतरची बांधकामे अनधिकृत म्हणून भीषण ताकदीची चळवळ राहणार आहे, श्री.शहाजी पवार यांच्या ठरावाला मान्यता देतो. अधिका-याकडून चूक झालीतर त्यांना काय पनिशमेंट देणार. जवळपास तीन/साडे तीन लाख नागरिकांना पनिशमेंट मिळणार आहे. या अधिका-याने मनपाचे ५०० कोटी बुडवले आहेत, याचे आत्मपरिक्षण केले पाहिजे. महापालिकेचे आर्थिक नुकसान झाले आहे. याचा भूर्दंड गरीब नागरिकांना बसणार आहे. नागरीकांची ताकदी चळवळ हे त्यांच्या कपाळावर राहणार आहे. म्हणून सभागृहाला विनंती राहील की, राज्य शासनाच्या बाबतीत आयुक्त त्यांची भूमिका का बजावतात. परंतू सभागृहाचा सदस्य या नात्याने शहरात असणा-या ५ १/२ लाख मिळकतींच्या नोंदी केल्यातर ३ ते ३ १/२ लाख मिळकती शहरात अनधिकृत असतील तर राज्यात इतर शहरांच्या तुलनेत आपल्याकडे प्रश्न गंभीर आहे. याचा सारासार विचार करुन जनतेचे प्रश्न म्हणून राज्य शासनाचे डोळे उघडायला पाहिजेत. प्रशासनाकडून, जबाबदार अधिका-याकडून ही चूक झालेली आहे. याचा भूर्दंड महापालिकेच्या तिजोरीला, सर्वसामान्य नागरिकांना बसतो आहे. म्हणून हा विषय सभागृहात काढला आहे. श्री.शहाजी पवार यांच्या विषयाला विरोध नाही. त्यांनी केलेल्या चुकीच्या कामाला निषेध व्यक्त करतो.

**मा.गोरक्ष लोखंडे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाला विरोध असण्याचे कारण नाही. मा.आप्पा बारणे यांनी सविस्तर विचार मांडले आहेत. ही वस्तुस्थिती

नाकारता येणार नाही. आज एखादा अधिकारी, शासनाचा पदाधिकारी येतो. शहराला, सभागृहाला चांगला अधिकारी मिळावेत अशी प्रत्येक नागरिकाची इच्छा असते. पदाधिका-यांची इच्छा असते. नंतर तो काय करतो हे सुद्धा फार महत्वाचे असते, याचा सारासार विचार केला पाहिजे. अनेक अधिका-यांबाबत आहे. आपले उद्यान निरीक्षक व गुजरातमधले उद्यान निरीक्षक पहा. गुजरातमध्ये उद्यान निरीक्षक पी.एच.डी. हॉर्टीकल्चर, सुपरवायजर एम.एस.सी. हॉर्टीकल्चर आहे. आपल्याकडे चांगले अधिकारी आणले पाहिजेत. या अधिका-यांचे रुजू रिपोर्ट आपल्याकडे नाहीत. ते आपल्याकडे कामाला आहेत का आपल्याला माहित नाही. मी दिलेले पत्र आहे. श्रीम.आशाराणी पाटील यांचे पत्र आहे. गावडे साहेब यांचा रुजू रिपोर्ट आपल्याकडे नाही. ते क्लार्क/प्लंबर काय आहेत हे आपल्याला माहित नाही. श्री.डी.के. गावडे पदावर रुजू होताना शैक्षणिक अर्हतेबाबतचे पत्र संबंधित नस्तीमध्ये आढळून येत नाही. दि.१७/२/८४ रोजी सेवा पदावर रुजू झाले. दि.१६/४/८६ बाबत नियमित वेतन श्रेणीत उल्लेख असून आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. मेडिकल सोशल वर्कर कोऑर्डिनेटर या पदी देत नाही म्हणून नियुक्ती मिळावी म्हणून दि.२४/६/८५ रोजी अर्ज केलेल्या अर्हतेत नमूद केल्यानुसार सेवा अर्जाची सत्य प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे. आपण यात लक्ष दिले पाहीजे. महापालिकेला चांगले अधिकारी मिळावेत, चांगले काम करावे अशी सभागृहाची देखील इच्छा असते. डि.पी.एच. मेडिकल म्हणून डॉ.रॉय, डॉ.साळवे यांचे नाव पाहतोय. प्रश्न हा नाही. अनधिकृत बांधकामांसंदर्भात मा.आप्पा बारणे यांनी विषय काढला आहे. ७४ व्या घटनादुरुस्तीने आयुक्त म्हणून, जबाबदार प्रशासकीय अधिकारी म्हणून सेक्शन ८९ वापरु शकतो. कोर्टाने ऑर्डर दिलेली आहे. त्याच्या आदेशाचे पालन करुन मुं.प्रां.म.न.पा. मधील अधिनियम ३३ नुसार आपल्याला बांधकामे नियमानुकूल ठरविता येतात, फक्त ते आपण मनावर घेतले पाहिजे. या ऑर्डरमध्ये दोन अल्टर आहेत. **To take appropriate action.** हिअरींग न्यायालयात असणार आहे. २०११ मध्ये आदेश आला होता. ६ ते ८ महिन्यांचा कालावधी होता. आम्हाला पटले. **That is very problematic answer.** तुम्ही तेच सांगितले. कुठेतरी सारासार विचार करा. हिअरींग द्या. २०११ ला आदेश आला होता. आम्हाला मान्य आहे. एखाद्या माणसाने पहिला मजला बांधला, इन्फ्रास्ट्रक्चर करुन ठेवले. त्याच्याकडे पैसा आहे. त्याचे घर लवकर बांधून होते. गरीबांची घरे वाचावीत म्हणून आयुक्त म्हणून ७४ व्या घटनादुरुस्तीने बीपीएमसी †क्टमध्ये विस्तृत अधिकार दिलेले आहेत. शहर बकाल होण्यापासून वाचवू शकतो. हे आपण मनात आणले तर करु शकतो.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आपल्या परवानगीने एका गंभीर विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छिते. आपल्या महापालिकेचे पब्लिक रिलेशन ऑफिसर **(PRO)** यांच्यासंदर्भात २३ तारखेला पुण्यनगरी,नाशिक पेपरमध्ये बातमी आली होती. ही अतिशय खेदजनक बातमी आहे. याची तपासणी आपण करुन घ्यावी. यात म्हटले आहे. आपल्याला माहित असेल. त्यांच्यावर आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. कुंडलिक कारकुंड नावाच्या गृहस्थाने पत्नीच्या विवाहबाह्य संबंधांमुळे आत्महत्या केली. चिठ्ठित त्यांचे नाव लिहिलेले सापडले आहे. किरण गायकवाड यांच्यावर त्यांच्या भावाने गुन्हा दाखल केला आहे. गेले २० दिवसांपासून ते सुट्टीवर गेले आहेत. पेपरमध्ये पिंपरी चिंचवड मनपाचा उल्लेख सुद्धा झाला हे. ही घटना सत्य असेल तर याची आपण ताबडतोब चौकशी करुन महापालिकेच्या इभ्रतीला धक्का लागेल अशी कोणतीही घटना आपल्याकडून होऊ नये. त्यांच्यावर तात्काळ कारवाई करावी अशी विनंती करते.

**मा.कैलास कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आत्ताच मा.श्रीरंग बारणे यांनी सांगितले, किमान २ लाख मिळकती अनधिकृत आहेत. त्याचा महसूल बुडाल्यामुळे करसंकलन विभागाचे प्रमुख श्री.शहाजी पवार यांच्या काळात महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले आहे. महापालिकेच्या हद्दीत जे कारखाने येतात. साईड मार्जिनमध्ये बांधकाम केले, त्याबद्दल श्री.शहाजी पवार यांना माहिती विचारली तर ते म्हणाले, हे आपल्या अखत्यारित येत नाही. साईड मार्जिनमध्ये बांधकाम केले याची माहिती एमआयडीसीला दिली का असे विचारल्यावर ते म्हणाले दिली नाही. साईड मार्जिनमध्ये जी बांधकामे झाली, त्यात गेली अनेक वर्षे श्री.शहाजी पवार यांच्या कारकिर्दीपासून महसूल बुडाला आहे. यात आपण लक्ष घालावे. मा.महापौरांचे माझ्याकडे लक्ष गेले, त्याबद्दल धन्यवाद देतो.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) –** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, श्री.शहाजी पवार यांची बदली झालेली आहे. परंतू दरवर्षी सभागृहाला मान्यता / मुदतवाढ घ्यावी लागते. २३ मार्च पासून ज्या तारखेला ते कार्यमुक्त झाले, त्यावेळी मान्यता घेऊन श्री.मुंढे त्यांच्या जागी रुजू होणार होते. अधिकारी आले नाहीत, तोपर्यंतचा कालावधीच्या मान्यतेसाठी हा विषय सभागृहासमोर ठेवला आहे. एलबीटी सुरु झाल्यानंतर महापालिकेचे उत्पन्नात काही प्रमाणात घट होणार असल्याचे सांगितले होते. त्याप्रमाणे काही प्रमाणात घट आलेली आहे. काही प्रकल्प आखलेले आहेत. बजेटमध्ये तरतूद आहे. दुसरीकडे उत्पन्नाची साधने वाढविण्याच्या दृष्टिकोणातून मुख्य लेखाधिकारी,विभाग प्रमुखांना सूचना देण्यात आल्या होत्या. पुणे, नाशिक, ठाणे, नवी

मुंबई या महानगरपालिकांचा अभ्यास करण्यासाठी एक टीम पाठवली आहे. उत्पन्न कुठून मिळतेय. मिळकत करातून उत्पन्न बरेच वाढविता येणे शक्य आहे. जुन्या गावठाणातील मिळकतींची आकडेवारी काढली जाते. शहरात जुन्या गावठाणामध्ये घरोघरी जाऊन माहिती गोळा केली जाते. प्रत्यक्ष घरात माणसे किती हे पाहिल्यावर प्रत्यक्षात ४,३०,००० कुटूंबे आहेत. मिळकत भरणा-या एकूण मालमत्ता ३,६५,००० आहेत. शहराच्या मिळकतीमध्ये ७२**%** वाढ झालेली आहे. दरवर्षी ६ ते ७ टक्के वाढ होते आहे. फेब्रुवारी २०११ पासून ऑगस्ट २०१३ पर्यंत दरवर्षी ६ ते ७ टक्के वाढ झालेली आहे. कमर्शियल मिळकतींमध्ये किमान १० टक्के म्हणजे ५ १/२ लाख संख्या आहे. काही लोकांच्या मिळकती सोडल्यातरी २/३ मिळकती येऊ शकतात. ढोबळमानाने ४ १/२ लाख मिळकती येऊ शकतात. आरोग्य विभागाने काही महिन्यांपूर्वी सर्वेक्षण केले होते. त्यात एकूण ५,१२,००० कुटूंबे आढळून आली. त्यावरुन ५ १/२ लाख मिळकतींना फटका बसतो आहे. ३०० अकोमोडेट त्याच्या दीड पट म्हणजे ४५० कोटी प्रॉपर्टी टॅक्स मिळू शकतो. यात १५० कोटींची वाढ होऊ शकते. एलबीटीमधून फटका बसू शकतो. गेले ३ महिन्यांत एलबीटीमधून रु.१९६,८५,००,०००/- उत्पन्न मिळाले आहे.  मधून रु.४,४६,००,०००/-,स्टॅम्प ड्युटीमधून रु.१९,१२,००,०००/- म्हणजे टोटल २२० कोटी इतके उत्पन्न मिळाले आहे. जकातीमधून २९३ कोटी मिळाले होते. ३ महिन्यांत ७३ कोटींचा फटका बसला आहे. उद्योग क्षेत्रात आलेली मंदी काही काळ राहणार आहे. गेल्या वर्षी जकातीतून ८२ कोटींचा भरणा गेला होता. यावर्षी ६६ कोटींचा भरणा केलेला आहे. उत्पन्नात एकंदरीत २०**%** घट झालेली आहे. टेल्को कंपनीने पुढील ५ दिवसांत ब्लॉक क्लोजर घेतलेला आहे. चाकण येथील कंपन्यांनी सुद्धा ब्लॉक क्लोजर घेतला आहे. याअनुषंगाने करसंकलन विभागाकडून सप्टेंबर पासून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. किमान १०० ते १५० कोटींची वाढ उत्पन्नात होऊ शकेल.

आपल्याकडील अधिकारी, त्यांचे पद व त्यांची अर्हता तत्सम मुद्दे मांडण्यात आले. मी मागे सुद्धा सांगितले होते, गेल्या काही वर्षांत नवीन पदांना मान्यता देऊ शकलो नाही. आपण पदांमध्ये वाढ करतोय. आपल्याकडे सहाय्यक आयुक्त दर्जाचे एक पद रिक्त आहे. शासनाकडून ६ व आपली ५ पदे आहेत. शासनाची ६ अधिका-यांची पदे आपल्याकडे भरलेली आहेत. डेप्युटी कलेक्टर दर्जाचे ४ चीफ ऑफिसरची पदे आहेत, त्यातील एक पद रिक्त आहे. त्या पात्रतेचे अधिकारी आपल्याकडे उपलब्ध नाहीत. त्याच बरोबर प्रशासन अधिका-यांच्या २४ पदांपैकी १७ पदे रिक्त आहेत. त्या पात्रतेचे अधिकारी आपल्याकडे उपलब्ध नाहीत. शहरातील लोकसंख्येमध्ये एकदम वेगाने वाढ झाल्यामुळे यंत्रणेवर ताण येतो आहे. तो दूर करण्याचा प्रयत्न करतोय. गार्डन

विभागाला स्थापत्य विभागाचा वेगळा स्टाफ होता. सगळ्यांशी चर्चा झाल्यानंतर तो स्टाफ स्थापत्य विभागात मर्ज केला. इकडून काढून तिकडे दिलातर तिकडे परिणाम होतो आहे. १५४ शाळा, १५६ गार्डन, ८ हॉस्पीटल्स् इथे मेंटेनन्ससाठी स्टाफची गरज आहे. सेवाप्रवेश नियमावलीमध्ये दुरुस्ती करतोय. स्थापत्य विभागाच्या कामावर कुठेतरी परिणाम होणार. मा.लोकायुक्त यांनी सांगितले होते, बांधकामे रेग्युलराईज करायला एफ.एस.आय. मध्ये फ्रंट मार्जिन व झोन चेंजमध्ये आयुक्तांना अधिकार नाही. म्हणून तत्कालिन आयुक्त श्री.शर्मा यांनी ३ ऑगस्ट रोजी शासनाकडे विस्तृत प्रस्ताव पाठवला होता. तो मंजूर झालेला नाही. शासनाने जो अधिकार दिला आहे त्यात आपण निर्णय घेऊ.

**मा.मंगलाताई कदम –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, उद्यान विभागाकडे २ कार्यकारी अभियंता पाहिजेत. १५० गार्डनचे मेंटेनन्स करण्यासाठी स्वतंत्र विभाग व्हायला पाहिजे. वृक्ष प्राधिकरण कमिटी बरखास्त करुन टाका. स्वतंत्र कमिटी आहे. उद्यान विभाग वेगळा आहे. त्यांना वेगळे डिपार्टमेंट द्या. एवढा खर्च व्हायचा तो होतोच आहे. खुलासा केला पण काही उपयोग नाही.

**मा.अनंत को-हाळे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ४ दिवसांपूर्वी मी एक पत्र दिले होते. त्यात मागणी केली होती. जुनी बांधकामे आहेत, त्यांची नोंद झाली नाही. ज्यांची नोंद करता येणार नाही, त्याविषयी खुलासा करावा.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त) –** मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, मिळकतींचे सर्वेक्षण करतोय. शंभर टक्के नोंदी होतील. ३१ मार्च नंतरच्या नोंदी थांबवल्या होत्या, त्यासुद्धा करणार आहोत. कोर्टाची जजमेंट झाली, त्यात म्हटले आहे, मिळकतीची नोंद झाली म्हणजे अनधिकृत बांधकाम अधिकृत होत नाही. मात्र पूर्वीच्या मिळकतींची नोंद करणे व आताच्या मिळकतींची सुद्धा नोंद करायची आहे. नवीन पदे निर्माण करायची खूप इच्छा आहे. शासन म्हणते, तुम्हाला जी रिक्रूटमेंट लागेल त्याची मान्यता घेऊन आमच्याकडे या. सॉलिड वेस्टसाठी वेगळा निधी, इन्फ्रास्ट्रक्चरल इंजिनिअरिंग, धोकादायक इमारती यासाठी काही पदे निर्माण करायची आहेत.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल - ६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पलांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३२२ विषय क्रमांक - ६
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/बमु/७/७/२०१३, दि.१०/०६/२०१३
२) मा.विधी समिती सभा दिनांक ०५/०७/२०१३ ठराव क्र.१६ नुसार

मनपाच्या पर्यटन विकास आराखडयांतर्गत मोरवाडी सर्व्हे क्र. १५०, १५१, १५२ येथे उद्यानासाठीच्या आरक्षीत जागेतील बहुउद्देशीय कलाकेंद्र उभारणेकामी रक्कम रुपये ५९,००,००,०००/- (अक्षरी र.रु.एकोणसाठ कोटी फक्त) चे पुर्वगणनापत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

**मा. अपर्णा डोके** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६९ प्रतिकूल –०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.भारती फरांदे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ७
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-१/२०४/१३, दि.१०/०५/२०१३
२)मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.६ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३०१ दि.२७/६/२०१३

पिंपरी चिंचवड मनपाने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजुर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शीव ते वाकड चौक शाळा) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी भुसंपादन करणेकामीचा प्रस्ताव मा.स्थायी समितीचे मंजुरीने मा.जिल्हाधिकारी यांना सादर केलेला आहे. प्रस्तावातील बाबी विचारात घेता भूसंपादन

प्रक्रियेबाबत कायदेशीर गुंतागुंत टाळणेचे दृष्टीने मौजे वाकड ता.मुळशी येथील मंजूर विकास योजनेतील मिळकती (मौजे पिंपळे निलख शीव ते वाकड शाळा चौक स.नं.२४२पै., २४४पै ते २४९ पै, २५१पै, २५७ पै ते २६३ पै, २६५ पै व २६६ पै, २६९ पै ते २७२ पै, २७६पै ते २७८पै.) ४५ मी. व २४ मी. रस्ता रुंदीकरणासाठी सदर जमिनीचे म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ चे कलम १२६ मधील तरतूदीनुसार भूसंपादन करणेचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.अपर्णा डोके** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.शमिम पठाण** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ तहकूब करणेत यावा.

**मा.सुमन नेटके** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक ७ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३२३ विषय क्रमांक - ७
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/ड-१/२०४/१३, दि.१०/०५/२०१३
२)मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.६ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३०१ दि.२७/६/२०१३

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पलांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ८

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/४-क/५३०/१३,दि.१०/०५/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.७ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३०२ दि.२७/६/२०१३

पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विशेष नगर वसाहतीच्या नियमावली म.प्रा. व न.र अधि. १९६६ च्या कलम ३७ (१ कक) अन्वये तरतुद समाविष्ट करणेकरीता शासनाने नोटीस जाहिर केली आहे. उपसंचालक नगररचना पुणे विभाग यांनी शासन सुचनेवर प्राप्त झालेल्या २५ हरकती पाठविल्या असुन सदर हरकती व शासन सुचना यावर पिंपरी चिंचवड महानगरलिकेच्या सर्वसाधारण सभेचे मत मागविले असल्याने, त्याबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विशेष नगर वसाहतीच्या नियमावली म.प्रा. व न.र. अधि.१९६६ च्या कलम ३७ (१ क क) अन्वये, तरतूद करणेकरीता शासनाने नोटीस जाहीर केली. त्यानुसार यामध्ये महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये आपल्या महापालिकेच्या जुन्या व नव्या हद्दीमध्ये खालील सुचना महापालिका सभेचे मत म्हणून सदर नियमामध्ये सुचना व दुरुस्ती असावी. महानगरपालिका क्षेत्र हे दाट लोकवस्तीचे क्षेत्र असते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्वांगीण दृष्ट्या विकसित होत असल्याने लोकसंख्या व विकासाचा दर ७०**%** असल्याने लोकवस्ती दाट झाली आहे व सदरच्या विशेष नगर वसाहतीच्या १०० एकर जागेकरीता लागू असलेला नियम शिथील करुन महापालिका क्षेत्रामधील निवासी विभागाकरीता किमान क्षेत्र २५ एकर व हरित विभागाकरीता किमान क्षेत्र ७५ एकर असावे. जेणेकरुन विकास लवकर होवून शहरात चांगली

कामे होतील व सदर नियमांची अंमलबजावणी शहरातील विविध विभागातील जागांवर अतिक्रमणे, अनाधिकृत बांधकामे, झोपडपट्टी अशा स्वरुपाचा बकालपणा होणार नाही याची दक्षता व्हावी, म्हणून लवकरात लवकर व्हावी आणि सुरक्षा यंत्रणा म्हणून महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र फायर सर्व्हिसेसचे फायर †क्ट २००६ व २००९ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस द्वारा मान्यता व नोंदणीकृत संस्था व महापालिकेकडे नोंद असणा-या व्यक्ती व संस्थांना सुरक्षात्मक उपाययंत्रणा करण्याची परवानगी देणेस मान्यता देणेत यावी. तसेच शासन सुचना दि.३१/१२/२०१२ मधील परिशिष्ट अ मधील नियम ५.२ मधील **VI** मध्ये नमूद गाळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला विकसकाकडून प्राप्त होणार किंवा कसे याबाबत नियमात नमूद केलेले नाही. आणि सदर गाळे पिंपरी चिंचवड मनपाला प्राप्त होणार असतील तर कोणत्या दरानुसार आणि कोणत्या वर्गाला सदर गाळे वितरीत करावयाचे याबाबत नियमात स्पष्ट नमूद केलेले नाही. **EWS/LIG** करीता प्रिमिअम आकारणी न करता प्राप्त होणारे गाळे यासाठी बांधकामाचा खर्च विकसकाला द्यावयाचा किंवा कसे आणि कोणत्या दरानुसार गरीबांना वाटप करावयाचे याबाबतही नियमात स्पष्टता नाही. याबाबत शासनाने नियमामध्ये स्पष्टता करण्याबाबत शासनाला कळविणेस मान्यता देणेत यावी.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.कैलास कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला पत्र प्राप्त झाले ते किती तारखेला आले याची माहिती दिली तर बरे होईल.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)** – मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, सदरचा प्रस्ताव उपसंचालक,नगररचना यांच्याकडे दि.१६/३/२०१३ पत्र क्र.४२८ अन्वये प्राप्त झाला आहे.

**मा.कैलास कदम** – मा.महापौर साहेब, किमान एक महिन्याच्या आतमध्ये १६/३/२०१३ला प्राप्त झाला असे तुम्ही म्हणालात. पण माझ्या माहितीनुसार दि.२१/३/२०१३ रोजी पत्र प्राप्त झाले आहे. यात शासनाने आपल्याला एक महिन्याच्या आतमध्ये संबंधित सभागृहाला ठराव करुन सभेपुढे मांडायला सांगितले होते. ४ महिने कोणी प्रस्ताव मांडलेला नाही. मला एवढी विनंती करायची आहे की, विषय सभागृहापुढे

मंजूर करायचा, पुढे पाठवायचा आहे. याबद्दल माहिती देण्यात यावी. शासनाकडे २५ हरकती/सूचना आल्या होत्या. त्यादेखील सदस्यांना देण्यात याव्यात. नंतर विषय मंजूरीसाठी सभागृहापुढे ठेवण्यात यावा अशी विनंती आहे.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, सदरचा प्रस्ताव आपल्याकडे प्राप्त झाल्या झाल्या विषयपत्र तयार करुन मा.शहर सुधारणा समिती पुढे ठेवला होता. समिती गठीत झाल्यानंतर पहिल्या मिटींगमध्ये विषय झाल्यानंतर मागील जी.बी.मध्ये विषय आला होता. हा विषय या सभेपुढे आला आहे.

**मा.कैलास कदम** - हा विषय फार मोठा आहे. या विषयाची माहिती सदस्यांना देण्यात यावी.

(यानंतर मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना) यांनी डॉकेट वाचून दाखवले.)

**मा.सुजाता पालांडे –** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.महापौर** - उपसुचनेसह हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -३२४ | विषय क्रमांक - ८ |
| दिनांक - २७/६/२०१३ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/४-क/५३०/१३, दि.१०/०५/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.७ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३०२ दि.२७/६/२०१३

पिंपरी चिंचवड मनपाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये विशेष नगर वसाहतीच्या नियमावली म.प्रा. व न.र अधि. १९६६ च्या कलम ३७ (१ कक) अन्वये तरतुद समाविष्ट करणेकरीता शासनाने नोटीस जाहिर केली आहे. उपसंचालक नगररचना पुणे विभाग यांनी शासन सुचनेवर प्राप्त झालेल्या २५ हरकती पाठविल्या असुन सदर हरकती व शासन सुचना यावर पिंपरी चिंचवड महानगरलिकेच्या सर्वसाधारण सभेचे मत मागविले असल्याने, त्यास मान्यता

देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये विशेष नगर वसाहतीच्या नियमावली म.प्रा. व न.र. अधि.१९६६ च्या कलम ३७ (१ क क) अन्वये, तरतूद करणेकरीता शासनाने नोटीस जाहीर केली. त्यानुसार यामध्ये महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये आपल्या महापालिकेच्या जुन्या व नव्या हद्दीमध्ये खालील सुचना महापालिका सभेचे मत म्हणून सदर नियमामध्ये सुचना व दुरुस्ती असावी. महानगरपालिका क्षेत्र हे दाट लोकवस्तीचे क्षेत्र असते. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्वांगीण दृष्ट्या विकसित होत असल्याने लोकसंख्या व विकासाचा दर ७०**%** असल्याने लोकवस्ती दाट झाली आहे व सदरच्या विशेष नगर वसाहतीच्या १०० एकर जागेकरीता लागू असलेला नियम शिथील करुन महापालिका क्षेत्रामधील निवासी विभागाकरीता किमान क्षेत्र २५ एकर व हरित विभागाकरीता किमान क्षेत्र ७५ एकर असावे. जेणेकरुन विकास लवकर होवून शहरात चांगली कामे होतील व सदर नियमांची अंमलबजावणी शहरातील विविध विभागातील जागांवर अतिक्रमणे, अनाधिकृत बांधकामे, झोपडपट्टी अशा स्वरुपाचा बकालपणा होणार नाही याची दक्षता व्हावी, म्हणून लवकरात लवकर व्हावी आणि सुरक्षा यंत्रणा म्हणून महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र फायर सर्व्हिसेसचे फायर †क्ट २००६ व २००९ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस द्वारा मान्यता व नोंदणीकृत संस्था व महापालिकेकडे नोंद असणा-या व्यक्ती व संस्थांना सुरक्षात्मक उपाययंत्रणा करण्याची परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच शासन सुचना दि.३१/१२/२०१२ मधील परिशिष्ट अ मधील नियम ५.२ मधील **VI** मध्ये नमूद गाळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला विकसकाकडून प्राप्त होणार किंवा कसे याबाबत नियमात नमूद केलेले नाही. आणि सदर गाळे पिंपरी चिंचवड मनपाला प्राप्त होणार असतील तर कोणत्या दरानुसार आणि कोणत्या वर्गाला सदर गाळे वितरीत करावयाचे याबाबत नियमात स्पष्ट नमूद केलेले नाही. **EWS/LIG** करीता प्रिमिअम आकारणी न करता प्राप्त होणारे गाळे यासाठी बांधकामाचा खर्च विकसकाला द्यावयाचा किंवा कसे आणि कोणत्या दरानुसार गरीबांना वाटप करावयाचे याबाबतही नियमात स्पष्टता नाही. याबाबत शासनाने नियमामध्ये स्पष्टता करण्याबाबत शासनाला कळविणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -६९ प्रतिकूल –०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ९

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१७/७८/२०१३, दि.११/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१६ नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३१० दि.२७/६/२०१३

आंध्रा धरणातून घ्यावयाच्या पाण्यासाठी नविन जलशुध्दिकरण केंद्र बांधण्यासाठी चिखली येथील गट क्र. १६५४ पै. मधील आरक्षण क्र. १/८८ – अ ८.०० हेक्टर क्षेत्रासाठी मंजूर विकास योजना प्रस्ताव मनपा उपयोगाचे ऐवजी जलशुध्दीकरण केंद्र (WTP) असे अभिनाम करण्याचा फेरबदल प्रस्ताव मान्य असल्यास मौजे चिखली येथील गट क्र. १६५४ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १/८८-अ मनपा उपयोग या आरक्षणाच्या एकूण १५.६१ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ८.०० हेक्टर जागा आरक्षण क्र. १/८८ – ड जलशुध्दीकरण केंद्र (WTP) असे अभिनाम बदल करणेसाठी म.प्रा. व न.र. अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन तसा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास पाठविणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.दत्ता साने** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो - पिंपरी चिंचवड शहरातील चिखली येथील गट क्र.१६५३,गट क्र.१६५४ पै. मधील आरक्षण क्र.१/८८अ, १/८८ ब, १/८८ क, १/८९, **Municipal purpose,** तसेच १/९० **EWS**, १-९१ विभागीय कार्यालय या एकूण ३२.८६ हेक्टर जागेतील उर्वरीत २४.८६ हेक्टर जागेमध्ये व या सर्व आरक्षित जागा एकत्रित करुन तेथील भौगोलिक परिस्थितीस अनुषंगिक असे पर्यावरण

सापेक्ष पर्यटन स्थळ विकसित करावे यासाठी मागील ठरावाचे अभिनामामध्ये बदल करुन यांस, चिखली येथील गट क्र. १६५३, गट क्र.१६५४ पै. मधील आरक्षण क्र. १/८८अ, १/८८ब, १/८८ क, १/८९, **Municipal purpose,** तसेच १/९० **EWS**, १-९१ विभागीय कार्यालय या एकूण ३२.८६ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ८.०० हेक्टर जागा आरक्षण क्र. १/८८-ड जलशुद्धिकरण केंद्र (WTP) व उर्वरीत २४.८६ हेक्टर जागेमध्ये तेथील भौगोलिक परिस्थितीस अनुषंगिक असे पर्यावरण सापेक्ष पर्यटन स्थळ असा अभिनामामध्ये बदल करणे व म.प्रा. व न.र. अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये ची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन तसा प्रस्ताव मान्यतेकामी शासनास पाठविणेकामी मा.महापालिका सभा यांचेकडे पुनःशिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर जागेमध्ये पर्यटन स्थळ विकसित केल्यास महापालिकेच्या नावलौकिकामध्ये भर पडणार आहे तसेच महापालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे. सदर भाग हा म.न.पा. मध्ये नव्याने विकसित होणारा भाग आहे. या पर्यटन स्थळामुळे या भागाची शहरीकरणाकडे वेगाने वाटचाल होईल.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, गेले दीड वर्षापासून आम्ही सदस्य आहोत. नवीन गावासंदर्भात, पाणी टंचाई संदर्भात आमचे नेहमीच रडगाणे असते. परंतू त्याठिकाणी सकाळी जेमतेम अर्धा/पाऊणतास पाणी पुरवठा होतो. बरीच वर्षे जी काही यंत्रणा काम बघते आहे, ते चॅनल असले तरी त्याठिकाणी तांत्रिक प्रश्न निर्माण होतो. दोन दोन दिवस पाणी मिळत नाही. सरासरी आठवडयातून एकदा पाणी बंद होते हा खेद आहे. मोशी, च-होली येथे जनरेटर उपलब्ध नाही. लाईट व्यवस्था नाही त्यामुळे पाणी पुरवठा डिस्ट्रीब्युट होत नाही. पाणी दिले जात नाही. अत्यंत वाईट अवस्था आहे. शहराच्या प्रत्येक भागात दोन वेळेस पाणीपुरवठा केला जातो. काही भागात २४ तास पाणीपुरवठा केला जातो ही सर्वांसाठी चांगली बाब आहे. आयुक्त साहेबांना विनंती आहे, आमच्या सूचनांकडे लक्ष द्या. गेल्या दीड वर्षापासून सलग ३ दिवस मोशी, च-होली इथे पाणी नाही. याबाबत आपले काय धोरण आहे? या विभागाला पाणी मिळणार आहे का? यात काय सुधारणा होणार आहे. पाणीपुरवठ्याचे काय धोरण आखले आहे ते सांगावे. एका भागात भरपूर पाणी व एका भागात पाणी

नाही अशी विषमता का दिसते आहे याचे उत्तर दयावे. इथले लोक सुद्धा कर भरतात. असा न्याय नवीन भागाला का मिळतोय. दुसरा अतिशय साधा परंतू गंभीर प्रश्न आहे. पाण्याच्या टाक्या आहेत त्याठिकाणी एकही सुरक्षारक्षक नाही, माणसे नाही, वॉचमन नाही त्यामुळे मोठयाप्रमाणात घातपात होऊ शकतो. संबंधित अधिका-यांना विचारले तर त्यांच्याकडून उत्तर मिळत नाही. ही साधी बाब नाही. इतका गलथान कारभार पाणीपुरवठ्याबाबतीत होत असेल तर संबंधित अधिका-यांनी याचे उत्तर द्यावे. यात काय सुधारणा करणार आहात याचे संबंधितांनी उत्तर दयावे.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाच्या अनुषंगाने मा.धनंजय आल्हाट यांनी विषय मांडला. आपल्याला या सर्व गोष्टींची कल्पना आहे. ग्रामिण भागात पाण्याची खूपच मोठी अडचण आहे. विशेषतः मोशी,च-होली,डुडूळगांव येथे, भोसरी परिसरात पाण्याची मोठया प्रमाणात गैरसोय आहे. आपण आल्यापासून त्यांच्यावर कारवाई झाली. खूप भीषण निर्णय घेतला. प्राधिकरणाचे पुलाचे काम चालू असल्यामुळे लाईन सुरु करता आली नाही. सभागृहाने या गोष्टीचा खुलासा करावा. नेमके किती दिवसात काम होऊ शकते. त्याप्रमाणे संपूर्ण भागात पाण्याची परिस्थिती निश्चितपणे सुधारेल. दुसरा मुद्दा म्हणजे -आपले काम रावेत इथे निघाले तरी शटडाऊन घेतो. वारंवार रावेत इथे शटडाऊन केल्यानंतर लाईन एअरलॉक होते. आमदारांना याबाबत सांगितले होते. मी अनेकवेळा याबाबत सर्वांना सांगितले असून आपण आपले अधिका-यांस अनेकवेळा सूचना केलेल्या आहेत. असे असताना सुद्धा त्याठिकाणी आजसुध्दा लाईन एअरलॉक होते. ३/४ दिवस पाण्याचा प्रॉब्लेम सोसावा लागतो. इतके वेळा सांगून सुद्धा खालचे अधिकारीही कार्यवाही करत नाहीत. मागील आठवड्यात सांगितल्याप्रमाणे कार्य. अभियंता यांना म्हणालोतरी लाईन खाली घेत नाहीत. या विषयावरुन शहरअभियंता यांचेशी माझा वाद झाला. एअरलॉक लाईनचा होतो. लोक समजून घेतात. ४/४ दिवसात पाणी येत नसेल तर या लोकांना काय सांगायचे. मला किमान २५ फोन येतात. त्यांना खुलासा करायला लावा. तुम्ही काम का करत नाही. आमची इच्छा आहे, पर्मनन्ट सोल्युशन काढावे. आमचा व्यक्तिगत रोष नाही. लोक खालच्या स्तरावर जाऊन बोलत असतात. एक वर्ष झाले आम्ही तुम्हाला सांगतो आहोत. काहीतरी निर्णय घ्या. यावर ताबडतोब निर्णय घ्या. ज्या जागेवरुन पाणी येते,

त्याचे चार टप्पे आहेत. तर हे ४ टप्पे समान करावे लागतात. ४ टप्प्यांमध्ये किती विषमता आहे. आमच्या दोन्ही प्रभागांत पाण्याची अडचण आहे. इंजिनिअर यांना सुद्धा सगळ्या बाबी माहिती आहेत. या परिस्थितीत तुम्ही परीक्षा कशी काय देताय. तुम्हाला एवढा अनुभव आहे. दुर्दैवाने तुम्ही अशा काळात शहर अभियंता झाला की, तुम्हाला अडचणींना सामोरे जावे लागते आहे. मा.महापौर साहेब, आपण सुद्धा त्या भागातील नगरसेविका आहात. सुरुवातीला खूप प्रॉब्लेम होता. प्रति माणशी किती पाणी देतो. ग्रामीण टप्प्यात १०० एमएलटी सुद्धा पाणी मिळत नाही. पाणी ही सगळ्यात महत्वाची गोष्ट आहे, आवश्यक मुलभूत सुविधा आहे. पाऊस सुद्धा भरपूर झाला आहे. लोकांना मोठे प्रोजेक्ट नको आहेत. नागरिकांची अपेक्षा आहे, तिथे २४ तास पाणी देता आम्हाला का नाही. आम्ही सुद्धा तेवढाच टॅक्स भरतो. यासाठी चांगला निर्णय घ्यावा.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, २५ तारखेपर्यंत डेडेलाईन दिली होती. सभागृहाला व सर्वांना यातून सांगायचे आहे की, एमआयडीसीकडून कासारवाडी भागात पाणी विकत घेतो. जुन्या रेटने देतात त्यामुळे त्यांचे आम्हाला कोऑपरेशन नसते. ते म्हणतात, तुम्हाला पाणी देण्यापेक्षा बाकी लोक जास्त पैसे देतात. अशा परिस्थितीत ड प्रभागातून पाणी यायची सोय झाली आहे. करोडो रुपये खर्च झाले आहेत. एक वेळ पाणी भरले तरी ५५ लोकांना २ वेळांत पाणी देऊ शकतो. परंतू आज परिस्थिती आहे की, एक प्रभाग दुस-या प्रभागाला पाणी देण्यास असमर्थता दाखवत असेल तर आम्ही एमआयडीसीकडून कोणत्या तोंडाने पाणी मागणार? पाण्याचा प्रश्न सुटत नसेल तर आम्ही काय करायचे? अधिकारी उत्तर देतात, तुम्हाला पाणी देऊन दुसरीकडे प्रॉब्लेम करायचा आहे का? हे उत्तर य़ोग्य नाही. तुम्ही अत्यावश्यक सुविधा देत नसाल तर आम्ही या गोष्टीसाठी कोणाकडे न्याय मागायचा?

**मा.राजेंद्र काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,मी मा.मोटे यांच्याशी सहमत आहे. कासारवाडीतील काही भाग उंचावर असल्यामुळे तिथे पाणी मिळत नाही. एमआयडीसी कडून ३ ते ४ दिवस पाणीपुरवठा बंद असतो, हाल होतात. अतिशय छोट्या गल्ल्या असल्यामुळे टॅंकरची सुविधा देता येत नाही. मला विनंती करायची आहे, वरील भागात ४५० ते ५०० कुटूंबे राहतात. एमआयडीसी व आपल्या टाक्यांमधून

पाणी दिले, दोन्ही सुविधा राहू दिल्या तर, एमआयडीसीकडून पाणीपुरवठा झाला नाहीतरी आपल्या टाक्यांमधून पाणी देण्याची सोय करण्यात यावी.

**मा.सुलभाताई उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज याठिकाणी २४ बाय ७ चा उल्लेख सगळ्यांकडून वारंवार होतो आहे. मला मनापासून वाटते सगळेच प्रभाग २४ बाय ७ झाले पाहिजेत. कुत्सितपणे २४ बाय ७ चा उल्लेख करु नये. कारण माझ्या वॉर्डात २४ तास पाणीपुरवठा सुरु आहे. त्यासाठी सांगू इच्छिते, प्राधिकरणाचा वॉर्ड असल्यामुळे ईडब्ल्यूएस स्किममध्ये चौथा मजला बांधला आहे. त्यात वरील मजल्यावर पाणीपुरवठा सुरळीत होत नव्हता. तिथे सोसायटी काढता येत नाही. लोकांचे पाण्यासाठी खूप हाल होत होते. तत्कालिन आयुक्त मा.शर्मा यांनी परिस्थिती बघितली. माझ्या वॉर्डातल्या नागरीकांनी वर्षभर खूप त्रास सहन केला आहे. म्हणून प्रायोगिक तत्वावर यमुनानगरचा वॉर्ड २४ बाय ७ करण्यासाठी निवडला. पुर्ण एक वर्ष काम चालले होते. पाईपलाईनमधून जमिनीखाली ४० टक्के पाणी जाऊन ते वेस्ट होत होते. पाण्याची गळती रोखली गेली. त्यामुळे आम्हाला पूर्वीपेक्षा कमी पाणी लागते. हे वाचलेले पाणी शहरात दुसरीकडे कुठेतरी उपयोगी पडलेले आहे. यासाठी आपल्या अधिका-यांनी परिश्रम घेतले होते. नवीन आयुक्तांनी सुद्धा माहिती घेतली, चौकशी केली. प्रत्येक वॉर्डात २४ बाय ७ झालेतर पाण्याचे महत्व सगळ्यांनाच कळेल. आपण जे परिश्रम घेतले, त्याबद्दल यमुनानगरच्या नागरीकांच्या वतीने विशेषतः लडकत साहेब यांचे अभिनंदन करते. चांगल्या प्रकारे २४ तास पाणी येते आहे. फ्रान्सचे लोक आपल्याकडे आले होते. सगळे मिटरनेच पाण्याचे बील भरत आहेत. त्यावर सुद्धा कंट्रोल आले आहे. उपमहापौर मा.राजू मिसाळ यांच्या वॉर्डात सुद्धा २४ बाय ७ प्रमाणे पाणीपुरवठा करण्यात आला आहे. आमची भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यानुसार या वॉर्डात प्रयोग करण्यात आला होता. जेवढया लोकांना वाईट वाटते त्यांनी उठून बोलावे.

**मा.अजित गव्हाणे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सगळ्या शहरात २४ तास पाणी करा अशी मागणी करा. उलट पिंपरी चिंचवड महापालिका ही राज्यातली एकमेव महापालिका असेल, जिथे विरोधी पक्ष, सत्ताधारी पक्ष असा भेदभाव केला जात नाही. आम्ही सुद्धा त्यांना पाठिंबा दिला. कधी कोणताही विरोध केला नाही. सुलभा ताईंच्या

वॉर्डात तशा प्रकारची सुविधा करायची सूचना केली. यावर अनेक वर्षे चर्चा झाली आहे. कोणत्याही नेत्याने, कोणत्याही नगरसेवकाने यासंदर्भात विरोध केला नाही. सुलभाताई तुमच्या वॉर्डाचा अनेक बाजूंनी विकास व्हावा, अशी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून शुभेच्छा आहे.

**मा.आर.एस.कुमार** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.अजितदादा पवार यांच्याबरोबर झालेल्या मिटींगमध्ये वारंवार सांगितले होते, पिंपरी चिंचवड मध्ये सर्वांना २४ तास पाणी मिळाले पाहिजे. त्यावेळी ५ वर्षे लागतील असे सांगितले होते. पैसे खर्च करा पण ३ वर्षांत पूर्ण करा पण या शहराला २४ तास पाणी मिळाले पाहिजे. गेल्या वर्षी माझ्या भागात रोज ७ ते ८ तास पाणी येत होते. त्यावेळी टँकरची गरज पडली नाही. आयुक्त साहेब, लडकत साहेब व त्यांच्या टिमचे याबद्दल अभिनंदन करतो. सुलभाताईंचा वॉर्ड झाला तो माझा वॉर्ड होणार होता. तो हायजॅक करुन सुलभाताईंचा वॉर्ड केला. त्या सुद्धा आपल्याच आहेत. जसे प्राधिकरणात, आकुर्डी भागात आमचे वॉर्डात काम केले आहे, तसे ग्रामिण भागात केलेतर त्यांची बोंबाबोंब बंद होईल. इथले ८/१० वॉर्ड करण्यापेक्षा इथले ४ वॉर्ड व तिथले ४ वॉर्ड असे २४ बाय ७ करावेत.

**मा.सविता साळुंके** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आपण ज्या सभागृहात बसलो आहोत ते मोरवाडी प्रभागात येते. आयुक्त साहेब मोरवाडीत राहतात. तिथे ४/४ दिवस पाणी येत नाही. सकाळी आठ वाजल्यापासून मला ६व्या मजल्यापासून फोन येत होते. या गोष्टीला १५ दिवस झाले आहेत. त्यानंतर मिटींग झाली. एमआयडीसीच्या प्राब्लेममध्ये कुठेही फरक झालेला नाही. माझ्या प्रभागात एमआयडीसीचा व नगरपालिकेचा काही भाग आहे. एमआयडीसीचा पाणीपुरवठा सुरळीत करावा अन्यथा महापालिकेने पाणी दयावे.

**मा.राजेंद्र जगताप** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपळे गुरवमध्ये ८० ते ९० हजार लोकसंख्या आहे. १५ मी. च्या टाक्या सुरु केल्या होत्या. रोज सकाळी दुसरे काहीच काम नसते. महिला माझ्याकडे येतात, म्हणतात पाणी नाही. जाधव साहेबांना परिस्थिती माहिती आहे. एक वेळ पहाणी केलीतरीसुद्धा परिस्थिती तशीच आहे. माणशी किती लिटर पाणी देता याची माहिती द्यावी.

**मा.सुरेश म्हेत्रे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, २४ तास पाण्याची रिडींग व्यवस्था येते आहे का? अक्षरशः आमच्या एरियातील मीटर लावले आहेत हे हवेने फिरतात. पाण्याचे बील ४ पट प्रमाणात जास्त येते. २४ बाय सात हा प्रकल्प संपूर्ण शहरात राबवावा. आमच्या भागातील पाण्याच्या बीलांमध्ये निश्चितपणे सूट द्यावी व आम्हाला २४ तास पाणी मिळावे.

**मा.लडकत** (कार्य.अभियंता) - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पाणीपुरवठ्यासंदर्भात खरोखर गेल्या उन्हाळयात चार महिन्यांत कधीही कंप्लेंट आली नाही. परंतू पावसाळयात अशाप्रकारे चर्चा होते आहे. गव्हाणे साहेब, आमदार साहेब यांना सांगितले, भोसरी एरियात लोकांमुळे तिथे प्रॉब्लेम येतो. भोसरीत पूर्वी पंपिंग लाईन होती. २००३ पर्यंत त्यावरुन पाणीपुरवठा होत होता. तिथे ग्रॅव्हिटी लाईन टाकली. भोसरी व नवीन गावे मोशी, च-होली, डुडुळगाव येथे एका लाईनवर सहाशे लाख लिटर पाणी व पंधराशे लाख लिटर पाणी मोशी मध्ये पडले जाते. जेएनएनयूआरएमच्या फेज २ मध्ये दुसरी लाईन टाकायचे काम चालू आहे. त्रिवेणीनगरचे काम पूर्ण झाले आहे. नवीन गावांचे काम पूर्ण झाले नाही. प्राधिकरणाच्या पुलाच्या कामामुळे परत लाईन शिफ्ट करावी लागली. पावसामुळे उशीर होतो आहे, परंतू लाईनमधील आपले काम पुर्ण झालेनंतर साधारण एक महिन्याचा कालावधी लागणार आहे. ही लाईन झाल्यानंतर शटडाऊन झाला नाहीतर प्रॉब्लेम होतो. ३ टाक्यांना डायरेक्ट पाणीपुरवठा होणार आहे. ग्रॅव्हीटीवर होणार आहे. पंपिंगचा प्रॉब्लेम निघून जाईल. उरलेल्या सेक्टर २३ वरुन भोसरीला पाणीपुरवठा होईल. निश्चितपणे पाणीपुरवठ्यात सुधारणा होईल. त्रिवेणीनगरच्या झोपडपट्टीत एअरलॉकचे काम कालच झाले आहे. पंपिंगची अरेंजमेंट केलेली आहे. भोसरीला डायरेक्ट पाणी देता येणार नाही. एअरलॉक होतो. परंतू ड्रेनेजमुळे व्हॅक्यूम तयार होतो. त्यामुळे अडचण तयार होते. त्याबाबत नियोजन करावे लागेल. इथून पुढे एअर लॉक होणार नाही. पंपींग करताना प्रॉब्लेम आलातर प्रेशरचा प्रोब्लेम येतो. त्याचप्रमाणे मा.मोटे साहेबांनी मुद्दा मांडला की, कासारवाडीत जो पाणीपुरवठा होतो आहे, तो नेहरुनगर लाईनमधून होतो आहे. तिथे टाकी बसवण्यात आली आहे. १७ टाक्या आहेत. दापोडी,सांगवीचा सगळा परिसर बाधित होतो आहे. आम्ही चालू करायचा प्रयत्न केला तरी काही भागात पाणी कमी पडले होते. कालच्या शटडाऊनमध्ये

ही सुद्धा कामे सुरु झाली होती. बिजलीनगर तिथली सुद्धा टाकी सुरु होते आहे. गव्हर्नमेंट नॉर्मस् प्रमाणे १३५ लि. प्रती माणशी पाणी मिळाले पाहिजे. आजही काही भागांत प्रती माणशी १०० लि. पाणीपुरवठा होतो. साळुंके यांनी इथल्या पाण्याच्या प्रश्नाबाबत सेपरेट निविदा काढली आहे.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कमिश्नर यांचा इथे संबंध येत नाही. साळुंके ताईंना त्यांनी उत्तर दिले नाही. बाकी एमआयडीसीच्या लोकांबद्दल आम्हाला काय म्हणायचे हे तुम्हाला चांगले माहित आहे. पिंजारे व कांबळे यांच्याबद्दल अक्षरशः लोक म्हणाले, त्यांची पातळी काय आहे. जिथे-जिथे एमआयडीसीच्या लाईनचा शटडाऊन होतो, तिथे चार दिवसांनंतरही पाणी मिळत नाही. वर्षभरात टाक्या करा व त्यातून या लोकांना पाणी द्या. शाहूनगर बद्दल सांगते की, ही तक्रार किती दिवस चालू आहे. टँकर देता येत नाही. अ प्रभागातील टँकर पालखीला गेलेत असे मला सांगितले. नागरीकांना काय करायचे. सगळ्यांनी पालखीला जायचे का? तुमचे कौतुक आहे. काम करत असताना संभाजी नगर व शाहूनगर हे एक करा असे सांगितले होते. संभाजीनगरला पाणी येते. शाहू नगरला येत नाही. हे सांगून दीड वर्ष झाले. कुठे कौतुक करायचे? २४x७ पाणी शिकण्यासाठी हैद्राबाद इथे जाऊन सेमिनार अटेण्ड केले, शिकून आले. त्यानंतर अल्जेरिया इथे गेले. मा.राजू मिसाळ सांगतात की, तिथे खूप झाडी होती. ज्या-ज्या वेळी आपण शिकून आलात, त्यावेळी ऑफिशियल सुट्टी होती. पिंपरी चिंचवडमध्ये त्याचा फायदा काय झाला, हे सुद्धा बघितले गेले पाहिजे. जर शेजारी रस्त्यावर ४ दिवस पाणी नाहीतर ४ दिवस पाणी विकत घेत होतो. एका प्रभागात दोन ठिकाणी वेगवेगळी परिस्थिती आहे. एचडीएफसी यांना कळवा, आम्हाला तुमचे पाणीच नको. कारण आम्हाला एमआयडीचे पाणी २४ तास येते. साळुंके ताईंना उत्तर दिले नाही. त्याप्रमाणे हे सुद्धा बघायला लागेल. या गोष्टी सुधारायला किती वर्षे लागतील. कमिश्नर यांच्याकडे तीनच माणसे घरात आहेत. चार दिवस पाणी आले नाहीतरी यांना काय कळणार. आयुक्तांची कंप्लेट आली नाही. एमआयडीसी कडून चांगल्या रेटने पाणी विकत घेतो. नागरीकांचे किती हाल होतात. टँकर नाही आणि पाणीपुरवठा पण नाही हे बरोबर नाही.

**मा.धनंजय आल्हाट** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, नवीन गावांचा विचार करत नाही. किती वर्षे अन्याय सहन करायचा? ग्रामिण भागाविषयी कोणी बोलत नाही. १५ मिनिटे ते अर्धा तास पाणी येते इतकी वाईट अवस्था आहे. गेले ४ दिवस पाणी नाही. दोन वेळेला पाणी द्या, आमची मागणी आहे. पाणी मिळाले पाहिजे. पाणीपुरवठ्याचे गाढे अभ्यासक आहेत. तुमच्याकडे कृती नाही, जो परखडपणा पाहिजे तो नाही. या गोष्टीचा भीषण वेगळा विचार करावा लागेल. असहकार आंदोलन करु. याठिकाणी कोणीच कर भरणार नाही. नागरिकांना आंदोलने करावी लागतील, सांगावे लागेल. पाणीपुरवठा ताबडतोब, सुरळीत केला नाही. तरीसुद्धा या भागातील नगरसेवक सुद्धा काही बोलत नाही. सहन करत आहेत. बाकी शहरांत दोन वेळ पाणी मिळते. सर्व ग्रामीण भागात गेल्या दिड वर्षापासून आम्हाला एक तास सुध्दा पाणी येत नाही. ३/३ दिवस पाणी नसते. अतिशय दूर्दैवी गोष्ट आहे. एकप्रकारे नागरिकांवर अन्याय आहे. कर घेताना वेगळा न्याय. आपण त्यांच्यावर फार मोठा अन्याय करीत आहोत. महापालिका सर्वसामान्यांवर अन्याय करतेय. ही परिस्थिती भविष्यात अत्यंत गंभीर होईल.

**मा.विनया तापकीर**-मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.धनंजय आल्हाट यांनी बेजबाबदारपणाचे वक्तव्य केले आहे की, दुसरे सदस्य बोलत नाहीत. मी दीड वर्षांपासून त्यांच्या पाठीमागे आहे. च-होलीसाठी मी प्रत्येक वेळी म्हणते. च-होली, मोशी, डुडुळगाव इथे पाणी,रस्ते,वीज काहीही सुविधा नाहीत. स्थायी समितीत दरवेळी हा प्रस्ताव मांडला आहे. मा.धनंजय आल्हाट यांना विनंती आहे की, सगळे सदस्य सतत पाठपुरावा करीत आहेत. आम्हाला फक्त एक तास/अर्धा तास पाणी पुरवठा असतो. दिड वर्षापासून तेच तेच सांगून कंटाळा आला आहे.

**मा.श्रीकर परदेशी (महापालिका आयुक्त)** - मा.महापौर साहेब,सर्व सन्मा.सदस्य, पाणी पुरवठया विषयी महत्वाचा मुद्दा सभागृहापुढे मांडणे आवश्यक वाटते. जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत काम झाले. शेवटचा टप्पा त्रिवेणीनगरची मेन पाईपलाईन आहे. या महिन्यात हे काम सुरु करणार आहोत. एक महिन्यात सुरु होईल. क प्रभागात अडचणी आहेत. मेन पाईप लाईन सुरु झाल्यानंतर वितरण व्यवस्थेतील ज्या त्रुटी आहेत त्या निकालात निघू शकतील. २४X७ यमुनानगरचे

पायलट केले. दुसरे पायलट करतोय. यातून पाणीपुरवठा सुरु केल्यानंतर निश्चितपणे लोकांच्या समाधान पातळीत वाढ होऊ शकते. जेएनएनयूआरएमचा ४० टक्के डीपीआर सादर केला आहे. तो अजून मंजूर झाला नाही. २/३ वर्षांत ४० टक्के क्षेत्र पूर्ण करता येईल. वाढीव बजेट दिले असल्यामुळे तेवढ्या कालावधीत १०० टक्के करणे शक्य नाही. तरी महापालिका बजेटमधून घेता येऊ शकेल. परंतु यासंदर्भातील बाबी सांगणे आवश्यक वाटते. ३ दिवसांपूर्वी मा.महापौर यांच्या अध्यक्षतेखाली चर्चा झाली होती. पिंपरी चिंचवड शहराची सन २०३१, २०४१ पर्यंतची पाण्याची मागणी, त्याचबरोबर पुणे महापालिकेने केलेली पाण्याची मागणी याबाबत राज्य शासनाकडे प्रस्ताव केलेला आहे. प्रती माणशी प्रती दिवस २६३ लि. इतके पाणी देत आहोत. केंद्र शासनाच्या मानांकनाप्रमाणे १५० लि. प्रती माणशी पाणी दिले पाहीजे. पुण्याचे पाणी याच्यापेक्षा जास्त आहे. दोनही शहरांची पाण्याची मागणी लक्षात घेता राज्य शासनाने सांगितले आहे की, तुम्ही  भरपूर पाणी वापरता. आधीपासूनच पाणी कमी वापरा. २०४१ मध्ये ३७० दशलक्ष लिटर अतिरिक्त पाणी लागणार आहे. ४६९ दशलक्ष लिटर आपले रिझर्व्हड पाणी, आंध्रा धरणातून १०० दशलक्ष लिटर पाणी मिळणार आहे. त्यातून परत पुणे महापालिकेची मागणी आहे. राज्य शासन म्हणते, यामध्ये शेतक-यांची सुद्धा मागणी आहे. ऊजनी धरणाबाबत हायकोर्टाने निर्णय दिला आहे. अधिक पाणी घेऊ नका. जे पाणी मिळणार आहे तेवढेच वापरणे अपरिहार्य आहे. शहराची लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढते आहे. ४५ लाख लोकसंख्या याच्या अडीच पट आहे. यात निश्चितपणे काही त्रुटी आहेत हे मान्य करतो. आमच्या कार्यान्वयनातून ब-याच अडचणी दूर होतील. २४X७ चा उपक्रम राबविला तर पहिल्यांदा मॉडेल करतोय. सामान्य पातळीत असे वापरत नाहीत. त्याचा वापर होईल तो केला नाहीतर भविष्यात यात तक्रारीं आणखी वाढत जातील. राज्य शासनाने सांगितले आहे, आत्तापासून जनजागृती सुरु करा. नाहीतर भविष्यात प्रति व्यक्ती ५० लि. पेक्षा अधिक पाणी मिळणार नाही. यासाठी ३ प्रकारचे मार्ग अवलंबावे लागतील. कोणी पदाधिका-यांनी विनंती केली होती की, व्हॅल्युमॅट्रीक ट्रॅक नुसार जेवढे पाणी वापरतो, तेवढाच दर आकारला पाहिजे. १०० लि. पाणी वापरतो व ३०० लि. वापरतो या दोघांसाठी आपण एकच दर आकारतो. वीजेचे बील आकारताना जसा वापर वाढतो, जसे युनिट वापरतो तसा रेट लागतो. त्या पद्धतीने याच काळात महापालिकेला निर्णय घ्यावा लागेल. आपली कमीत कमी मागणी

७० लि. प्रती माणशी इतकी आहे. १३५ लि. ही मागणी मोठ्या शहरांसाठी आहे. यात २०० लि. आणखी वाढीव दिले तर लोक पिण्याचे स्वच्छ पाणी लॉन धुण्यासाठी, वाहने धुण्यासाठी वापरतात. याच्यावर आळा बसला पाहिजे. दर वाढवले तर वापर कमी होईल. दरवर्षी पाऊस कमी जास्त प्रमाणात पडतो. चेन्नईत वर्षातून फक्त २ महिनेच पाऊस पडतो. शासनाने याबाबतीत आक्रमक भूमिका घेतली आहे. पाणी जपून वापरले पाहिजे. तशी कडक भूमिका घेतली पाहिजे. शाळांत फ्लजसाठी पॅनेलचा वापर करुन वापरतात. गार्डनसाठी, लॉनसाठी वापरतात. याबाबत धोरण करावे लागेल. सदरच्या गोष्टींच्या नोंदी घेतल्या आहेत. त्यात दुरुस्ती करायचा प्रयत्न करु. भविष्यात मिळणारे पाणी कमी होणार आहे. यासाठी आपले सहकार्य लागणार आहे.

**मा.लडकत** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एमआयडीसीकडून सातत्याने पाणी घेतो. आपले त्यांच्यावर कंट्रोल नाही. त्यांचा प्रॉब्लेम झाला. टाक्यांच्या लेवल वाढवत नाहीत. त्यामुळे एमआयडीसीच्या भागात टॅक्स घेतोय. जेएनएयूआरएम अंतर्गत टाक्यांचे काम पूर्ण केलेले आहे मेन लाईनचे काम पूर्ण होत आले आहे शाहूनगर सोडले तर बाकी भाग टप्याटप्याने येतो आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, किती दिवस नक्की लागणार आहेत ते आधीच सांगा.

**मा.किरण मोटे** – मा.महापौर साहेब, नवीन गावासाठी नवीन टाक्या बांधल्या. एमआयडीसीसाठी काय केले आहे. किती दिवस लागतील.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक -३२५ | विषय क्रमांक - ९ |
| दिनांक - २७/६/२०१३ | विभाग- मा.आयुक्त |

संदर्भ:१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१७/७८/२०१३, दि.११/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१६

नुसार

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३१० दि.२७/६/२०१३

आंध्रा धरणातून घ्यावयाच्या पाण्यासाठी नविन जलशुध्दिकरण केंद्र बांधण्यासाठी चिखली येथील गट क्र. १६५४ पै. मधील आरक्षण क्र. १/८८–अ ८.०० हेक्टर क्षेत्रासाठी मंजूर विकास योजना प्रस्ताव मनपा उपयोगाचे ऐवजी जलशुध्दीकरण केंद्र (WTP) असे अभिनाम करण्याचा फेरबदल प्रस्ताव मान्य असल्यास मौजे चिखली येथील गट क्र. १६५४ मधील मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. १/८८ – अ मनपा उपयोग या आरक्षणाच्या एकूण १५.६१ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ८.०० हेक्टर जागा आरक्षण क्र. १/८८ – ड जलशुध्दीकरण केंद्र (WTP) असे अभिनाम बदल करणेसाठी म.प्रा. व न.र. अधि. १९६६ चे कलम ३७ अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन तसा प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास पाठविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरातील चिखली येथील गट क्र. १६५३, गट क्र.१६५४ पै. मधील आरक्षण क्र. १/८८ अ, १/८८ ब, १/८८ क, १/८९, **Municipal purpose,** तसेच १/९० **EWS**, १-९१ विभागीय कार्यालय या एकूण ३२.८६ हेक्टर जागेतील उर्वरीत २४.८६ हेक्टर जागेमध्ये व या सर्व आरक्षित जागा एकत्रित करुन तेथील भौगोलिक परिस्थितीस अनुषंगिक असे पर्यावरण सापेक्ष पर्यटन स्थळ विकसित करावे यासाठी मागील ठरावाचे अभिनामामध्ये बदल करुन यांस, चिखली येथील गट क्र. १६५३, गट क्र.१६५४ पै. मधील आरक्षण क्र. १/८८अ, १/८८ब, १/८८ क, १/८९, **Municipal purpose,** तसेच १/९० **EWS**, १-९१ विभागीय कार्यालय या एकूण ३२.८६ हेक्टर क्षेत्रापैकी सुमारे ८.०० हेक्टर जागा आरक्षण क्र. १/८८-ड जलशुद्धिकरण केंद्र (WTP) व उर्वरीत २४.८६ हेक्टर जागेमध्ये तेथील भौगोलिक परिस्थितीस अनुषंगिक असे पर्यावरण सापेक्ष पर्यटन स्थळ असा अभिनामामध्ये बदल करणे व म.प्रा. व न.र. अधि.१९६६ चे कलम ३७ अन्वये ची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन तसा प्रस्ताव मान्यतेकामी शासनास पाठविणेकामी मा.महापालिका सभा यांचेकडे पुनःशिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे. सदर जागेमध्ये पर्यटन स्थळ विकसित केल्यास महापालिकेच्या नावलौकिकामध्ये भर पडणार आहे तसेच महापालिकेच्या

उत्पन्नामध्ये वाढ होणार आहे. सदर भाग हा म.न.पा. मध्ये नव्याने विकसित होणारा भाग आहे. या पर्यटन स्थळामुळे या भागाची शहरीकरणाकडे वेगाने वाटचाल होईल.

अनुकूल - ६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक -३२६ विषय क्रमांक - १०
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.जितेंद्र ननवरे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१७ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३११ दि.२७/६/२०१३

मौजे च-होली येथील जुना स.नं. ३४७ व ३५२ नविन स.न. ३१७ व ३१८ ही जमीन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास आराखडयामध्ये शेती विभागामध्ये समाविष्ट आहे. सदरची जमीन ही विकास आराखडयामधील रहिवास विभागालगत आहे. च-होली येथील जुना स.नं. ३४७ व ३५२ नविन स.न. ३१७ व ३१८ ही जमीन शेती विभागामधून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यासाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव तयार करणेस मान्यता देणेत यावी व यासंबंधीत हरकती/सुचना मागविणे व त्यावर निर्णय घेऊन प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करणेचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.प्रशांत शितोळे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देतो.

**मा.नितीन काळजे** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – मौजे च-होली येथील स.नं.२९२, स.नं.१४८ व स.नं.१४९ ही जमीन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजुर विकास आराखड्यामध्ये शेती विभागामध्ये समाविष्ट आहे

सदरची जमीन ही विकास आराखड्यामधील रहिवासी विभागालगत आहे. च-होली येथील स.नं.२९२, स.नं.१४८ व स.नं.१४९ ही जमीन शेती विभागामधून रहिवासी विभागामध्ये समाविष्ट करण्यासाठी म.प्रा.व.न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव तयार करण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

**मा.राहुल जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, १९९७ साली अठरा गावे पिंपरी चिंचवड महापालिकेत समाविष्ट केली. त्यातील च-होली गावात जुना स.नं.३४७,३५२ नवीन सर्वे नंबर ३१७, ३१८ रहिवास विभाग करण्यासाठी विषय आला आहे. हे दोनच सर्वे नंबर करावेसे वाटतात. बाकी १७ गावांचा काय विषय आहे. तिथे आजही शेती विभाग आहे. हा विषय घेत असताना समाविष्ट गावांचा विकास कसा करायचा याचा विचार करा. या गावांचा विकास आराखडा प्रसिद्ध होऊन ५/६ वर्षे सुद्धा झालेली नाहीत. आरक्षण बदलाचे लोकांचे खेळ सुरु झाले. आज आरक्षण बदलासाठी विषय दाखल आहे. सार्वजनिक प्रयोजनासाठी आरक्षण दाखल होत नसून यातून काहीही उद्देश्य साध्य होत नाही. जिल्हापरिषदेचे क्षेत्र महापालिकेत समाविष्ट झाल्यानंतर आजपर्यंत या क्षेत्राचा विकास कसा करायचा याबाबत स्पष्ट धोरण नसल्याचे या विषयावरुन सिद्ध होते आहे. अशा प्रकारे आरक्षण बदलून रहिवास भागाचा लाभ मिळवून देण्यासाठी हे सभागृह काम करते आहे का. इतर भागातील शेती विभागाचे रहिवास भागामध्ये रुपांतर करणार आहात का. असे करणार असालतर समाविष्ट गावांतील शेतक-यांच्या जमिनींवर शेतीचे आरक्षण टाकण्याऐवजी रहिवास आरक्षण करावे. विकास आराखड्याच्या नावाखाली शेतक-यांची फसवणूक झाली आहे. अशी फसवणूक करायची असेल तर हा विषय फेटाळण्यात यावा.

**मा.कैलास कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्वे नं. ३४७, ३५२ हा किती एकर आहे याचा उल्लेख प्रस्तावित केलेला नाही. या जमिनीचे मालक कोण आहेत? पिंपरी चिंचवडचा मंजूर विकास आराखडा १९९८ ला मंजूर करण्यात आला होता. त्यानुसार त्याबाबतीत सुनावणी झाली होती. अनेक विकास कामे दुर्लक्षित आहेत. शेत जमिनीचा निवासी झोन करण्याकडे कोणत्या अधिका-याची खुशी भरलेली आहे. हे धोरण ठेवून बांधकाम विकसकांना पाठीशी घालणार आहात का? १९९८मध्ये समाविष्ट केलेल्या गावांमधील आरक्षणे लवकरात लवकर विकसित करावीत. शहराच्या विकासाच्या प्रवाहात समाविष्ट करावीत. कामगारांना, शेतक-यांना पूरक धोरण राबवून शहराचा विकास करावा अशी विनंती करतो. उपरोक्त शेत जमिनी नेमक्या कोणाच्या

आहेत? सर्वे नंबरमधील जमिनी, शेत जमिनी आहेत. माझा व काँग्रेस पक्षाचा या विषयाला विरोध असणार आहे. हा विषय दफ्तरी दाखल करावा अशी विनंती करतो.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय धंदापाण्याचा विषय झाला म्हणून या ठिकाणी अजेंडावर आला आहे. च-होली नाहीतर संपूर्ण ग्रामीण भाग नवीन गाव म्हणून समाविष्ट झालेला आहे. याठिकाणी सर्व शेतकरी किंवा कोणी शेतक-यांच्या नावाखाली कळवळा दाखवत असेल, स्वतःचा स्वार्थ साधत असेल, तर अशा आरक्षित जमिनींची प्रायोरीटी लिस्ट दाखवून टीडीआर देण्यात यावा. खरेतर मा.कैलास कदम यांनी सात/बारा उता-याची माहिती मागवली आहे. पठारे, लोंढे यांच्या नावावर सात/बारा आहे. त्याचा पीएडीए झाला आहे. मूळ मालक गल्ली, वस्तीत आहे. तेवढे २ सर्वे नंबर कसे काय आले? मा.जितेंद्र ननावरे, मा.तानाजी खाडे यांना काहीच माहित नसेल. हा विषय अत्यंत गंभीर आहे. त्याला काही खातेदारांनी उपसूचना सुद्धा जोडल्या आहेत. मला नाहीतर तुलाही नाही मग घाल कुत्र्याला. तुला मिळालेतर मला पण मिळाले पाहिजे. त्यांनी शेतक-यांची बाजू मांडायची. वॉर्डात जाऊन त्यांच्यापुढे उत्तर द्यायचे. यांच्या जमिनी का तशाच पडल्या आहेत. दुस-याच्या जमिनीला काही किंमत नाही का? तुम्हारा खून खून, हमारा खून खून नही क्या? काही फोटोग्राफस् दाखवायचे आहेत. ज्या जमिनीचा विषय आहे. त्याच्या आजूबाजूची परिस्थिती पहा. तिथे पाटबंधारे विभागाने बंधारा बांधलेला आहे. तिथे पाझर तलाव आहे. नैसर्गिक आपत्ती, नैसर्गिक परिस्थिती कोण्याच्या हातात नाही. २६३ वरुन १५० वर येणार आहोत. असे असताना इथे नैसर्गिक पाझर तलाव आहे. यापुर्वी पाटबंधारे विभागाने काही रक्कम खर्च केली आहे. मूळ शेतक-यांचा यात इंटरेस्ट नाही. आजूबाजूला मोठमोठे रस्ते गेलेले आहेत. रेड झोन आहे. त्या शेतक-यांना वाटू नये, जमिन विकासाचे पूर्ण आरक्षण पडले. जमिनीची काही नोंदी नाही म्हणून मोठमोठ्या बिल्डरांनी आमच्या भावनेचा,अज्ञानाचा फायदा घेऊन जमिनी घेतल्या आहेत. बिल्डींग परमिशनसाठी फाईल आल्यानंतर नावे कळतीलच. एका ठिकाणी पीएडीए केलाच नाही. आमचे धंदे नसल्यामुळे आम्हाला कळत नाही. या जागेचे फोटोग्राफ तुम्हाला या ठिकाणी देते आहे. ते तपासून घ्यावेत. या विषयाला माझा कडाडून विरोध राहील. जरी हा विषय मंजूर करायचा असला तरी माझी विनंती आहे की, या परिसरातील जेवढे शेतकरी आहेत, त्यांच्या जमिनी यलो झोन, आर झोन झाल्या पाहीजेत. सगळ्या खातेदारांनी त्यांची खाती उघडली आहेत. सर्वे नंबर ११४ या ठिकाणी शेतकरी अत्यंत गरीब आहेत. त्यांना शेतीशिवाय दुसरे उत्पन्न नाही. त्यांच्या जमिनी सुद्धा आर झोन करण्यात याव्यात अशी सूचना करते. मा.आयुक्त साहेब, अशा प्रकारचे कोणतेही काम

करावे अशी तुमच्याकडून अपेक्षा नाही. एकतर हा विषय दफ्तरी दाखल करावा नाहीतर सगळ्यांच्या उपसूचनांसहीत हा विषय मंजूर करण्यात यावा.

**मा.अश्विनी मराठे**-मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.प्रशांत शिताळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ग्रीन झोनमधील जमिनीचे रुपांतर रेसिडेन्शियल झोनमध्ये करण्याच्या या विषयाच्या अनुषंगाने काही विषय सभागृहासमोर मांडू इच्छितो. खरेतर या अनुषंगाने एक प्रश्न विचारावयाचा आहे. च-होली, ताथवडे, तळवडे ही गावे काही वर्षांपूर्वी महापालिकेत समाविष्ट झाली होती. आपण एक सक्षम अधिकारी म्हणून उत्तर दिले पाहिजे. हे विषय सदस्यांनी मांडण्याची गरज का पडते? महापालिकेच्या क्षेत्रात ग्रीन बेल्ट किती असावा याचे प्रमाण ठरलेले आहे. च-होली गावाचा डी.पी. तयार झाला त्यावेळी ५० ते ६० टक्के डी.पी. वर दुरुस्ती करावी लागते. याचे कारण काय, हे कारण शोधले पाहिजे. एकिकडे शहरात अनधिकृत वस्ती झाली नाही पाहीजे. झोपडपट्टया झाल्या नाही पाहीजेत. शहरातील बकालपणात वाढ होत जाणार आहे. दुसरीकडे मोठ्या प्रमाणात ग्रीन बेल्ट ठेवायचा. लोकवस्ती सुद्धा नसते. शेती करण्यासारखी सुद्धा परिस्थिती ठेवली आहे का. ग्रीन किंवा आर झोन सोडून द्या. शेतकरी शेती करु शकतो का? प्रॅक्टीकली करु शकतो का? पठारीचा परिसर आहे. जमिनीचा विस्कळीतपणा आहे. जागा वर/खाली दिसते. ग्रीन बेल्ट ठेवायचे काय कारण आहे. ही मुळात प्रशासनाची चूक आहे. ही चूक झाली नसती तर अमुक ग्रीन करा, तमुक ग्रीन करा. सगळ्यांचेच करा. तर मग असा विषय आलाच नसता. कायदेशीररित्या विषय ठेवला, डी.पी. मध्ये प्रमाणांकित करुन रहिवास विभाग असा ठेवला असता तर वेगळी परिस्थीती असली असती. च-होलीमध्ये केवळ च-होली बुद्रुकचे क्षेत्र ८,००० एकर आहे. मनपाच्या नकाशानुसार खूप चांगल्या पद्धतीने रस्त्याचे प्रयोजन केले. ठराविक भागच रहिवासी भागात का? च-होलीमधून ९० मी. चा ३०० फुटी रस्ता झाला आहे. त्या रस्त्याला डब्ल्यू.बी.एम. अंतर्गत टीडीआर घेतला असेल तर पुण्यातूनच २००च्या आसपास आकारणी घेतो. असे कसे घेतो? माझी जागा असेल, भूसंपादन केले असेल तर माझ्याकडून तेवढा पैसा वजा करणार आहात का? भूसंपादन करुन जागा दिली तरी रेडी रेकनर व ३० टक्के दिलासा रक्कम द्यावी लागेल. याचे भान आपल्याला राहत नाही का. आधीचे आयुक्त शर्मा साहेबांनी ती जागा पाहीली आहे. त्या जागेवरची परिस्थिती चांगली नाही. तिथला परिसर खडकाळ परिसर आहे. जमिन जेवढी खडकाळ तेवढा जास्त खर्च स्क्वे. फूटाला येतो. रस्ता, पाणी,वीज देणे हे महापालिकेचे काम आहे. क्रिडांगण दिले पाहिजे. त्यांना सगळ्या सोयी दिल्या पाहिजेत. टीडीआर असू द्या किंवा मोबदला असू द्या. आज त्यामुळे नगरसेवक म्हणून काम करत

असताना व्यावसायिकसुद्धा आहेत, शेतकरी सुद्धा आहेत. आज परिसराचा विकास करण्यासाठी मागणी करतोय. शेतक-यांसमोर अडचणी येतात, त्या अडचणी सुटल्या पाहीजेत. कशासाठी चार्ज करतोय. तुम्ही म्हणता, तत्कालिन आयुक्तांनी चुका केल्या. त्या चुकांमध्ये सुधारणा करणे आपले काम नाही का. कशासाठी ९० मी. ला रु.१४०/- चार्ज देतोय. इतर ठिकाणी रु.७०/- इतका चार्ज करतो. भूसंपादन करुन जागा ताब्यात घेताना एक रुपया सुद्धा घेता येत नाही. सगळे फुकट द्यावे लागते. नोटीस द्या. सगळे शासनाला करावे लागते. अशा प्रकारे त्या परिसरातील शेतक-यांची महापालिकेने एक दिशाभूल केल्यासारखे आहे. २/३ दिवसांपूर्वी पुढारी पेपर वाचत होतो. एका माणसाने ८० ते ९० एकर १९३१ साली डेव्हलप केले होते. त्याने ग्रीन झोन डेव्हलप केला. त्या जागा गोरगरीबांना विकल्या. याला तो मनुष्य सुद्धा जबाबदार आहे. लोकांनी त्यावर अनधिकृत बांधकाम केले. साडेतीन कोटी दंड झाला आहे.ग्रीन झोनच्या प्लॉटवर कोणी डेव्हलपमेंट करत असेल तर ते थांबवणे आपले सुद्धा काम आहे. गोरगरीबांनी घरे बांधली त्याला कोण जबाबदार. याच परिसरातील करदात्यांच्या पैशांतून सुविधा दिल्या आहेत. तिथे सुविधा देणे इतके सोप्पे नाही. च-होलीत डोंगर परिसर आहे. एअरपोर्ट जवळ आहे. पुणे शहर जवळ आहे. त्या परिसराची व्हॅल्यू चांगली, वेगळ्या प्रकारची आहे. आज जेव्हा पिंपरी चिंचवड शहराचा विकास करताना १०० एकरचे एक क्लस्टर करा. त्यात ज्या ज्या सुविधा द्यावयाच्या त्याचा परफेक्ट आराखडा तयार करुन दाखवला. यात जास्तीत जास्त विकसक येतील व शहर आणखी सुंदर करतील. असा छोट्या-छोट्या गोष्टींवर चर्चा झाली पाहिजे. यात तेथील स्थानिकांचा विचार झाला पाहिजे. डीएपीए वर चर्चा झाली नाही पाहिजे. नगरसेवकांच्या कार्यकर्त्यांचे विनाकारण नुकसान झाले नाही पाहिजे. तुमच्याकडून उलटा प्रस्ताव आला आहे. आख्खा आर झोन करा. मला वाटते, दोन सदस्यांनी प्रस्ताव दिलातर तिथली परिस्थिती कदाचित तशी असू शकेल. तुमच्याकडे एकच उत्तर असणार, सदस्य प्रस्ताव आहे. आम्ही अंमलबजावणी करतो. नगररचना विभाग मॉडीफीकेशन करणार. त्याला प्रोसेस आहे आम्हाला कळते. प्रोसेस पूर्ण करायचे मनपाचे काम आहे. शहरात आधीच उद्याने आहेत. ग्रीन झोनची आवश्यकता नाही. रेड लाईन, ब्ल्यू लाईन, संरक्षण विभागाच्या परीसिमेमुळे ऑलरेडी शहर कंजस्टेड झाले आहे. त्याला कुठेतरी मोकळा श्वास मिळाला आहे. ही एकप्रकारची संधी आहे. या गावांच्या बाबतीत अशा प्रकारच्या अडचणी येऊ शकतात. म्हणून अशा प्रकारच्या अडचणी का येतात. आम्हाला सूचना/हरकती लिहिण्याशिवाय काही हक्क देत नाही. अशाच भावना ठेवल्या होत्या. भविष्यात अडचण येऊ नये अशा प्रकारची शहराच्या नकाशाची रचना पाहिजे. हे भाग लवकरात लवकर विकसित व्हावेत यासाठी विचार केला पाहिजे. मागिल वेळी म्हटले होते,

च-होली इथे वेगळा न्याय, इतरांबाबतीत वेगळा न्याय असे करु नका. ९० मी. बाबतीत हे काम करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. तुम्हाला वाटते, हे सगळे चांगले. आम्हाला वाटते हे योग्य नाही. तुमचेही काही विषय चुकीचे असू शकतात. रस्ता लवकर ताब्यात येण्यासाठी प्रायोरीटी ठरणार आहे. त्यानुसार काम करायचा प्रयत्न करत असतो. रस्ते प्रायोरीटीने ताब्यात घेत असतात. ते लवकर ताब्यात यायला नको का? या अनुषंगाने सांगतो, भूमि आणि जिंदगी विभागाचा विषय आहे. निवासी गाळे आहेत. जर रस्ता बाधितांना हे गाळे देऊ शकत नाहीतर प्रशासनाचा काय उपयोग आहे? हा विषय या अजेंड्यावर आला आहे. त्याच्या अनुषंगाने सांगते, अशा विषयात खरेतर प्रशासनाची जबाबदारी आहे. या दिलेल्या विषयात चांगल्या प्रकारचे, कोणाला वाईट प्रकारचे वाटत असेल. सुलभा ताईंनी दिलेल्या सूचनेला मी सुद्धा शंभर टक्के सहमत आहे. केवळ दोनच सर्वे नंबर का. मनात शंका आल्याशिवाय राहत नाही. आज दिलेला प्रस्ताव यामागे कारण असू शकेल. प्रशासन इथून पुढे असे प्रस्ताव आणते, त्याप्रमाणे त्यावर कार्यवाही व्हावी या विषयाला मान्यता द्यावी.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी विनंती करते की, उपसूचना घेणार असाल तर सर्वांच्या उपसूचना घ्याव्यात. कोणालाही दुखवायचे कारण नाही. ग्रीन झोन ५० टक्के आहे. आम्ही त्या भानगडीत पडत नाही. परंतू गरीब शेतक-यांची बाजू कोण घेणार? गरीब शेतक-याची बाजू घेण्यासाठी यलो झोन आहे. सगळे आर झोन करावेत अशी उपसूचना देते. मा.जाधव ग्रामिण भागातील आहेत. जिथे जिथे आर झोन करण्यासारखी परिस्थिती आहे त्या सर्व सर्वे नंबरवर आर झोन व्हावे असे मला वाटते.

**मा.सुलभा उबाळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मा.मंगलाताई कदम यांच्या सूचनेला अनुमोदन देते.

**मा.सीमा सावळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा विषय सदस्यांनी आणला असला तरी त्या पाठीमागे कर्ते करविते वेगळे कोण आहेत हे सांगायला कोणी ज्योतीषाची गरज नाही. आत्ता मिलिटरी हद्दीमध्ये वृक्षारोपण करायचा विषय झाला होता. एकीकडे ग्रीन झोन वाढवायचा, वृक्षारोपण करायचे, दुसरीकडे ग्रीन झोन आर झोन करायचा असे दुटप्पी धोरण आहे. जरी सदस्य प्रस्ताव असलातरी यामागे निश्चितपणे सुपिक डोके अधिका-यांचे आहे. शहर सुधारणा समितीमध्ये सुद्धा असे विषय येत होते. एकिकडे ग्रीन झोन वाढवायचा असेल तर आपल्या हद्दीत वाढला पाहिजे. नाहीतर असे विषय करता कामा नये. आत्ता सदस्यांनी सांगितले, डी.पी. होऊन

१० वर्षे झाली. डी.पी. करताना नगररचनाकार यांनी विचार करायची गरज होती. इतकी उद्याने आहेत का. इतके टक्के ग्रीन झोन ठेवला आहे. पूर्ण अभ्यास करुन ठेवले होते का. ग्रीन झोन, यलो झोन करायला विरोध नाही. सरसकट सगळ्या शेतक-यांचे करणार असाल तर आमचा सुद्धा या विषयाला पाठिंबा राहील.

**मा.महापौर** – उपसूचना फेटाळून हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

**मा.सुलभा उबाळे**-मा.महापौर साहेब, माझा या विषयाला विरोध नोंदवून घ्यावा. मतदान घेण्यात यावे.

(गोंधळ)

**मा.नगरसचिव** – विषय क्रमांक १० मतदानास टाकणेत आला असता या विषयाच्या बाजूने ३९ सदस्यांनी हात वर करुन पाठींबा दर्शविला आणि विषयाच्या विरोधात २१ सदस्यांनी हात वर करुन मतदान केले आहे.

(मा.राहूल जाधव यांनी सभात्याग केला.)

<u>**मा.महापौर**</u> - विषय क्रमांक १० विषयाच्या बाजूने ३९ व विषयाच्या विरोधात २१ असे मतदान होऊन सदर विषय बहुमताने मंजूर करणेत येत असल्यानेच जाहीर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३२६ विषय क्रमांक - १०
दिनांक-२७/६/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.जितेंद्र ननवरे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.११/०६/२०१३ ठ.क्र.१७ नुसार
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.३११ दि.२७/६/२०१३

मौजे च-होली येथील जुना स.नं. ३४७ व ३५२ नविन स.न. ३१७ व ३१८ ही जमीन पिंपरी चिंचवड महानगरपालिका मंजूर विकास आराखडयामध्ये शेती विभागामध्ये समाविष्ट आहे. सदरची जमीन ही विकास आराखडयामधील रहिवास विभागालगत आहे. च-होली येथील जुना स.नं. ३४७ व ३५२ नविन स.न. ३१७ व

३१८ ही जमीन शेती विभागामधून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करण्यासाठी म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव तयार करणेस मान्यता देणेत यावी व यासंबंधीत हरकती/सुचना मागविणे व त्यावर निर्णय घेऊन प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करणेचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना प्रदान करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल -३९ प्रतिकूल –२१

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**(गोंधळ)**

**मा.सुजाता पालांडे**- महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.EWS/२०२/२०१३, दि.०३/०६/२०१३

२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.०९/०७/२०१३ ठ.क्र.१९ नुसार

पिंपरी चिंचवड मनपाच्या JnNURM-BSUP अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांसाठी राबविण्यात येणा-या EWS घरकुल योजनेअंतर्गत च-होली व डुडुळगाव येथे ११३४ घरे बांधणे प्रस्तावित असुन त्यादृष्टीने कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे DPR मधील १३२५० घरापैकी चिखली येथील से.क्र.१७ व १९ मधील ६७२० घरे व च-होली व डुडुळगाव येथील ११३४ घरे असे एकुण ७८५४ घरांचे काम पुर्ण होईल. उर्वरीत ५३९६ घरे जागेअभावी व JnNURM Mission चा कालावधी मार्च २०१४ अखेर असल्यामुळे बांधणे शक्य नाही. या अनुषंगाने प्रकल्प ७८५४ सदनिकांपर्यंतच सिमित करणेबाबतचा सुधारीत विस्तृत प्रकल्प अहवाल (D.P.R.) शासनाकडे पाठविणे आवश्यक असल्याने सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी लोंढे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.किरण मोटे–** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.कैलास थोपटे -** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक ११ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३२७ विषय क्रमांक - ११
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त
संदर्भ :१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था.EWS/२०२/२०१३, दि.०३/०६/२०१३
२) मा.शहर सुधारणा समिती सभा दि.०९/०७/२०१३ ठ.क्र.१९ नुसार

विषय क्रमांक ११चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.
अनुकूल - ६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२
दिनांक - २६/७/२०१३ विभाग-मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३.
२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७.
३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४
४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३
५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३ दि.१९/३/२०१३
६) मा.महापालिका सभा ठराव क्र.३१२ दि.२७/६/२०१३

प्रस्तावात सविस्तर क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-अ, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ब, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-क, क्रिडा धोरण मसुदा परिशिष्ट-ड, मध्ये नमुद केलेप्रमाणे मनपा क्रिडा धोरण मसुद्यास तसेच ३ डिसेंबर अपंग दिनानिमित्त

अंध, अपंग, व मतिमंद विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा आयोजित करणेकामी परिशिष्ट अ/ब मध्ये नमूद तपशिलाचा मूळ धोरण मसुद्यात समावेश करुन परिपूर्ण क्रीडा धोरण मसुद्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**मा.शुभांगी लोंढे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.किरण मोटे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.कैलास थोपटे –** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर** - विषय क्रमांक १२ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३२८ विषय क्रमांक - १२

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/३०१/२०१३ दि.६/२/२०१३.

२) मा.क्रीडा समिती सभा दिनांक २१/२/२०१३ ठराव क्र.४७.

३) मा.विधी समिती सभा दिनांक १/३/२०१३ रोजी ठराव क्र.१२४

४) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३०६९ दिनांक १२/३/२०१३

५) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रीडा/१/कावि/६१५/१३ दि.१९/३/२०१३

६) मा.महापालिका सभा ठराव क्र.३१२ दि.२७/६/२०१३

विषय क्रमांक १२ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे**-मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १३

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/क.मु./१७/२०१३, दि.०५/०६/२०१३

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.३१४ दि.२७/६/२०१३

भोसरी स.नं.१ येथील आरक्षण क्र.४३१ मध्ये अद्ययावत रुग्णालय व वाचनालय बांधणेकामी येणा-या र.रु.१९,४५,००,०००/-(अक्षरी र.रु.एकोणीस कोटी पंचेचाळीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणे व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी लोंढे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – प्राधिकरण सेक्टर २६ जवळ असलेले डिस्ट्रीक्ट सेक्टर मनपातर्फे तळमजल्यावर हेडगेवार भवन आहे याठिकाणी आता करसंकलन विभागाचे कार्यालय आहे. या इमारतीवर एफ.एस.आय. उपलब्ध असून सहा हजार स्क्वेअर फुट पहिला मजला बांधून ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र (करमणूक केंद्र) बांधणेसाठी लागणारे अंदाजे र.रु.अडीच कोटींचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी. तसेच चिंचवडेनगर प्रभाग क्र.२० मध्ये रघुमाऊली उद्यानामध्ये सांस्कृतिक भवन उभारणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

**मा.राजू मिसाळ** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा राहूल जाधव.–** मा - सूचना मांडतोमी पुढीलप्रमाणे उप ,महापौर साहेब.प्रभाग क्र.५ कुदळवाडी-जाधववाडी येथील नागरीकांच्या, महिलांच्या आरोग्याच्या हितासाठी या प्रभागात स.नं.३२४ मध्ये हॉस्पिटलसाठी जे आरक्षण आहे, त्याठिकाणी हॉस्पिटल विकसित करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.राहुल जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आज सभागृहात जो विषय आलेला आहे, या विषयावर र.रु.१९,४५,००,०००/- खर्च करणार आहोत. १९९७ साली

महापालिका क्षेत्रात १८ गावे समाविष्ट केली. संबंधित अधिका-यांनी खुलासा करावा की, आजपर्यंत या गावांमध्ये रुग्णालये, वाचनालये उभी केली आहेत का?

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाला अनुसरुन वारंवार पत्र पाठवले आहे. अधिका-यांनी या विषयाचा खुलासा करावा.

**डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी)** -मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, च-होली मध्ये दवाखाना चालू केलेला आहे. पुनावळे इथे बांधकाम चालू आहे. आणि किवळे इथे बांधकाम चालू केलेले आहे. चिखली येथे म्हेत्रे वस्तीची जागा ताब्यात घेतली आहे. जागा उपलब्ध आहे. कालच मिटिंग झाली. चिखली, मोशी येथे दवाखाना आहे. दिघीला जागा बघितली आहे. दुसरे हॉस्पिटल बांधण्यासाठी नगररचना विभागाकडे जागेची मागणी केली आहे. पाठपुरावा केला आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे** -मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,दवाखाना चालू करावा जागा आहे.

**मा.राहुल जाधव** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,आम्ही जागा द्यायला तयार आहोत. १६ महिन्यांत १५ पत्रे दिली आहेत. हॉस्पिटल उभे करु शकत नाही मग पाठपुरावा तरी केलाच पाहिजे.

**डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी)** -मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य,पाठपुरावा केला आहे.

**मा.राहुल जाधव** -मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,तुमची करायची मानसिकता आहे का? माझ्या भागातली एक महिला भगिनी रस्त्यावर बाळंत झाली. कमिश्नरांना कमीत कमी ५० पत्रे दिली आहेत. हॉस्पीटल लवकरात लवकर उभे करावी अशी विनंती करतो. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो-प्रभाग क्र.५ कुदळवाडी-जाधववाडी येथील नागरीकांच्या, महिलांच्या आरोग्याच्या हितासाठी या प्रभागात स.नं.३२४ मध्ये हॉस्पिटलसाठी जे आरक्षण आहे, त्याठिकाणी हॉस्पिटल विकसित करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.अनंत को-हाळे** – मा.महापौर साहेब, सदर उपसूचनेला अनुमोदन आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या विषयाला विरोध असायचे कारण नाही. खुलासा करण्यात आलेला आहे की, मोशीमध्ये एक हॉस्पिटल आहे. ४०/४५ वर्षांपूर्वी जिल्हापरिषदेने बांधलेल्या जुन्या इमारतीमध्ये हा दवाखाना चालू

आहे. दोनच दिवसांपूर्वी त्याच्या अवस्थेचा फोटो प्रसिद्ध झाला होता. महापालिकेचे प्रशासन तिथे जाऊन पाहते आहे. डॉक्टर वेळेवर येत नाहीत. परिचारिका सुध्दा उपलब्ध नसतात. औषधांचा पुरवठा वेळेवर नसतो. हॉस्पिटल म्हणजे एक इमारत आहे. त्याला हॉस्पिटल म्हणायचे का. एकंदरीत महापालिकेची मानसिकता आहे. च-होली असेल, मोशी असेल, चिखली असेल, संपूर्ण भागाकडे दूर्लक्ष होते. कोणत्याही प्रकारची सुविधा दिली पाहिजे त्या प्रमाणात दिली जात नाही. मोशी इथे रुग्णालयाची इमारत अद्ययावत करण्यासाठी व्यवस्था करण्यात यावी. संबंधित विभागाने याकडे लक्ष दयावे.

**मा.किरण मोटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कासारवाडीतली ओपीडी का बंद करण्यात आली?

**डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी)** -मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, तिथे ओपीडीचे प्रमाण अतिशय कमी होते. १०/१५ ओपीडी होत होत्या.

**मा.किरण मोटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,तिथे रोज २५ ओपीडी होतात. मी सुद्धा तिथे उभा राहून मॉनिटरींग केले हे. बिल्डींग कशी आहे?

**डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी)** -मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, तिथे भाजी मंडई आहे.

**मा.किरण मोटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, कशा पद्धतीने जागा डिव्हाईड केली आहे. संबंधित अधिकारी कोण होते त्यांनी जागा विभागून दिली होती. त्यांना इथे बोलवा.

**मा.रामदास बोकड** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पिंपळे गुरवच्या प्र.क्र. ५६ मध्ये एका मजल्यावर ओपीडी चालू केली आहे. चार महिन्यांत काही कार्यवाही झालेली नाही. व्यायामशाळेच्या एका मजल्यावर नवीन दवाखाना चालू करायचा आहे. प्रभागात ठराव मंजूर झाला आहे. वैदू वस्ती, प्रभात नगर, पिंपळे सौदागरकडे जाणारा भाग आहे. संबंधित प्रभागाचे कोण असतील, त्यांनी त्याचा खुलासा करावा. सन्मा. झुरे साहेबांच्या हजेरीत हा विषय मंजूर झाला आहे.

**डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी)** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, ही गोष्ट माझ्यापर्यंत पोचलेली नाही.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, चिखली गावात आरक्षण क्र. १/९७ हॉस्पिटलसाठी आरक्षित असून त्या जागेवर हॉस्पीटलची इमारत बांधावी यासाठी पत्र दिले होते. आपण त्यावर उत्तर दिले होते. नक्की समजत नाही. ग्रामिण भागात सुविधा करायच्या आहेत का नाही. आपण डॉक्टर आहात. मौजे चिखली राज्य शासन, नगरविकास विभाग क्र.१८०/८/१९४ सीआर १७२७/०९ दि. नुसार भाग नकाशाला मंजूरी मिळाली आहे. आरक्षण क्र.१/९७ याचे दवाखान्यासाठी आरक्षण झाले आहे. टीपी कलम २० नुसार शासन मान्यता मिळालेली नाही. म्हणून जोपर्यंत शासनाची मंजूरी मिळत नाही, तोपर्यंत भूसंपादन करता येत नाही. हे पत्र देत असताना मी आपल्याला विनंती करतोय की, १९९७ मध्ये महापालिकेत गावे सहभागी झाली होती. मागिल वेळी सुद्धा हेच बोललो होतो. त्यासाठी पत्र सुद्धा दिले आहे. आपण सुद्धा डॉक्टर आहात. या भागात अपघात झालातर त्या व्यक्तीला वायसीएम मध्ये आणावे लागते. या भागात शाळेची सहा मजली इमारत मोकळी झालेली आहे, तिथे दोन ओपीडी व पोलिस चौकी चालू करा. या भागातली लोकसंख्या कमीत कमी ४० ते ४५ हजार आहे. मी २००५ पासून या गोष्टीचा पाठपुरावा करीत आहे. अनेक पत्रे सुद्धा दिली आहेत. डॉ.नागकुमार यांनी सांगितले होते, तशी ओपीडी चालू करता येत नाही. आज यांच्याकडे आरक्षण आहे. शेतकरी हॉस्पिटलसाठी जागा द्यायला तयार आहेत. आमचा भाग नवीन आहे. नवीन १८ समाविष्ट गावांमध्ये कोणतेही मोठे हॉस्पिटल नाही. ओपीडी सुद्धा नाही. कोणत्याही मनुष्याला प्रॉब्लेम झाला तर, अडचण आली तर कुठेतरी जावे लागणार. वायसीएम हॉस्पीटल, यमुनानगरचे हॉस्पीटल नाहीतर तालेरा हॉस्पिटल आमच्यासाठी आहे. वायसीएममध्ये कधीही आलोतरी आयसीयूचा वॉर्ड फूल असतो. तातडीचा औषधोपचार करायचा असेल, वाईट प्रसंग आला तर वायसीएमला यायला कमीत कमी २० ते २५ मिनिटे लागतात. शाळा तुमच्या ताब्यात दिलेली आहे. जागा उपलब्ध आहे. असे असताना ओपीडी का करु शकत नाही. नर्सेस उपलब्ध नाही असे उत्तर देत असाल, साधी ओपीडी देत नसालतर यापेक्षा निंदनीय बाब काय असेल? आमच्या अपेक्षा तुम्ही पूर्ण करत नसाल तर आम्हाला घरी बसण्याशिवाय काय पर्याय आहे? मजेशीर उत्तरे दिलेली आहेत. अशी चुकीच्या धोरणाने कामे करु नका. विचारपूर्वक उत्तर द्या. जागा ताब्यात घ्या. त्या लोकांना उत्तर द्या. ते जागा द्यायला तयार आहेत. तुम्ही म्हणताय, अनधिकृत बांधकामातील, रोड वायडींगमधल्या जागा घेतल्यातर त्याला नागरीक दोषी राहतात. सुरुवातीलाच आरक्षणे टाकली तर पुढील मुद्दे कशाला उभे राहतील. मा.आयुक्त साहेब, दोन्ही विषय अतिशय गहन आहेत. टीडीआर द्या, एफ.एस.आय द्या. शेतकरी जागा द्यायला तयार आहेत. तोपर्यंच हॉस्पिटल चालू व्हावे ही अपेक्षा आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, भूमि आणि जिंदगी विभागाला जागा ताब्यात घेण्याबद्दल, स्टाफ उपलब्ध करुन देण्यात काय अडचण आहे ते कळत नाही. हा विषय अनेक ठिकाणी झालेला आहे. जागा उपलब्ध आहे. ओपीडी चालू करण्याविषयी काय भूमिका घेता येईल तेवढी घेतली तर बरे होईल अशी अपेक्षा आहे.

**मा.संजय काटे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सदस्यांनी दवाखान्याबाबत ब-या वाईट भावना व्यक्त केल्या. कालच माझ्या प्रभागात आयुक्त यांच्या उपस्थितीत ओपीडीचे ओपनिंग झाले. बोपखेल याठिकाणी नागरिकांना दवाखान्याची सोय नव्हती. दापोडी किंवा दिघी भागात जावे लागत होते. लोकांची चांगली सोय झाली. याचा मनापासून आनंद वाटतो. याबददल मनापासून आभार मानतो.

**डॉ.रॉय (प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी)** -मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, चिखलीची जागा मिळाली नाही.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)**- मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, हॉस्पिटलचे रिझर्वेशन सर्वे नं.       टी.पी. कडे आहे. उरलेल्या जागा मालकांना ३ जागांसाठी प्रपत्र दिले आहे. प्रपत्र ब द्यावे लागते. जागामालक जागा द्यायला तयार असतील, टीडीआर घ्यायला तयार असतील तर पुढील आठवड्यात मिटींग घेऊन पुढील प्रोसेस करु.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मग मला यापुर्वी असे पत्र का दिले. मी पत्र वाचून दाखवतो (पत्राचे वाचन केले.) आपण बोलताना एक बोलता, सांगताना एक सांगता, उत्तर वेगळे देता. पत्र चुकीचे दिले हे मान्य करा.

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, हे वाक्य असेल तर चुकले आहे.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, आम्ही वेडे म्हणून पत्र देतो का? अधिका-यांनी काहीही उत्तर दिले आणि आम्ही ते मान्य करायचे का? आयुक्त साहेबांशी

चर्चा झाली आहे. आमचे शेतकरी तडजोडीला तयार आहेत. बोलणी झाली आहे. सगळी पत्रे वाचता, हे पत्र तुमच्याकडे आलेले आहे. असे जर उत्तर देत असाल तर नवीन सदस्यांना सुद्धा कळणार नाही, नक्की काय लिहिले आहे. शेतक-यांना पत्र दिले नाहीतर ते जागा ताब्यात कशी देणार?

**मा.भदाणे (उपसंचालक,नगररचना)** - मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, जे उत्तर दिले आहे, त्यात टि.पी. त्याचे भूसंपादन करता येणार नाही. दरम्यान उर्वरित मिळकती, उर्वरित क्षेत्र, आत्ता ते बोलले तो सर्वे नंबर एकच आहे. त्याचे करता येणार नाही. बाकी क्षेत्राचे करता येईल. प्रपत्र सुद्धा दिलेले आहे. म्हणजे हेच या पत्रात लिहिले आहे.

**मा.दत्ता साने** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,कोणत्याही शेतक-याला प्रपत्र कळालेले नाही. मागणी लेटर गेलेले नाही. ते जागा द्यायला तयार आहेत. त्यांना आपल्या पद्धतीने बोलवून घ्यावे व मागणी करावी. २ बेडचे अद्ययावत हॉस्पीटल २०X३० चे वर्ग इथे आहेत. इथे ओपीडी चालू करावी.

**मा.झुरे (सहा.आयुक्त)** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बोकड साहेबांशी भेट घेतली आहे. व्यायामशाळेचा विषय मांडला आहे. डिस्पेन्सरी चालू करण्याचा विषय प्रभाग समितीत मांडला आहे. त्याची आवश्यकता असेल तर त्याची परिस्थिती पाहून त्याबाबतीत प्रपोजल सादर करण्यात येईल.

**मा.सुजाता पालांडे** – मा.महापौर साहेब, सगळ्या उपसूचना स्विकारल्या आहेत.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३२९ विषय क्रमांक - १३
दिनांक - २७/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.स्था/क.मु./१७/२०१३, दि.०५/०६/२०१३
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.३१४ दि.२७/६/२०१३

भोसरी स.नं.१ येथील आरक्षण क्र.४३१ मध्ये अद्ययावत रुग्णालय व वाचनालय बांधणेकामी येणा-या र.रु.१९,४५,००,०००/-(अक्षरी र.रु.एकोणीस कोटी पंचेचाळीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणे व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्राधिकरण सेक्टर २६ जवळ असलेले डिस्ट्रीक्ट सेक्टर मनपातर्फे तळमजल्यावर हेडगेवार भवन आहे याठिकाणी आता करसंकलन विभागाचे कार्यालय आहे. या इमारतीवर एफ.एस.आय. उपलब्ध असून सहा हजार स्क्वेअर फुट पहिला मजला बांधून ज्येष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र (करमणूक केंद्र) बांधणेसाठी लागणारे अंदाजे र.रु.अडीच कोटींचे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच चिंचवडेनगर प्रभाग क्र.२० मध्ये रघुमाऊली उद्यानामध्ये सांस्कृतिक भवन उभारणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रभाग क्र.५ कुदळवाडी-जाधववाडी येथील नागरीकांच्या, महिलांच्या आरोग्याच्या हितासाठी या प्रभागात स.नं.३२४ मध्ये हॉस्पिटलसाठी जे आरक्षण आहे, त्याठिकाणी हॉस्पिटल विकसित करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.शुभांगी लोंढे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३३० विषय क्रमांक - १४

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/६/कावि/६२२/२०१३ दि.८/७/१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा सन २०१२-१३ पर्यावरण स्थितीदर्शक अहवाल महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या डी.पी.एस.आय.आर. या मार्गदर्शक तत्वानुसार तयार करण्यात आला आहे. सदर प्रारुप अहवालास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, याठिकाणी आपले सगळयांचे मनापासून हार्दिक अभिनंदन करते. आपण पहिल्यांदाच पर्यावरण अहवाल सादर

करण्याचा प्रयत्न केला. त्याबददल अभिनंदन करते. यापूर्वी कधीच पर्यावरण अहवाल प्रसिध्द झाला नाही. त्यामुळे चूक होणे स्वाभाविक आहे. थोडीशी घाई झाली का काय असे वाटते. हा अहवाल वाचत असताना झोपडपटटीबाबतीत काय म्हणणे आहे. तसेच हजार माणसांसाठी, पाठिमागे एकच टॉयलेट ब्लॉक नमूद केलेला आहे. हे चुकीचे आहे. खरी परिस्थिती वेगळी आहे. दुसरे म्हणजे मुद्दा क्र. ५.१ मध्ये पीएमपीएमएलमध्ये प्रती बस प्रवाशांची संख्या ५०११ दिलेली आहे. हे होऊ शकत नाही. या चूका आपल्या निदर्शनास आणून देत आहे. वायू प्रदूषणाबाबत महापालिकेच्या वतीने विविध चाचण्या घ्यायला पाहिजेत. आपण एमआयडीसी परिसरात ज्या प्रदूषण चाचण्या घेतल्या, त्यात रेस्परेबल दुप्पट असल्याचे दिसून आले आहे. हे अहवालात नमूद केले आहे. वायू प्रदूषणामुळे ह्रदय विकार, अस्थमा, ब्राँकायटीस, श्वसनाचे विकार होतात. यात काय होऊ शकेल, त्यावर उपाययोजना काय हे सांगितलेले नाही. तसेच पाणी प्रदूषणाचे प्रमाण सुद्धा सर्व ठिकाणी जास्त दिसते आहे. दवाखाने, रुग्णालये इथे शांतता राखावी. अशा ठिकाणी बंधनकारक आहे. परंतू तिथे दिवसा काय रात्री सुद्धा ध्वनी प्रदूषणाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले आहे. ध्वनीच्या जास्त प्रमाणामुळे चक्कर, उलट्या,चिडचिड होते. इतर मनुष्यांवर त्याचा परिणाम होतो. शारिरीक व मानसिक परिस्थितीवर परिणाम होतो. यावर पर्यावरणाचे निकष सांगितले आहेत. यात आपण काय केले? तिथे फक्त बोर्ड लावले होते. २९ लाख खर्च केला आहे. केवळ बोर्ड लावून हा प्रश्न सुटणार नाही. नागरीकांमध्ये जनजागृती आवश्यक आहे. हे नमूद करायला पाहिजे होते. यासाठी महापालिका प्रशासनाने प्रयत्न करावेत. पर्यावरण विभाग घनकचरा व्यवस्थापनात पूर्णपणे अपयशी ठरले आहे. महाराष्ट्र नॉन गारबेज † क्ट २००६ रुल ११ मधील कायदा/नियमांची अंमलबजावणी करणे महापालिकेला बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्लास्टीक वेस्ट रुल्स् बंधनकारक आहेत, ते नमूद केलेले नाहीत. अहवाल तयार करताना घाई झाली म्हणून नमूद केलेले नाही का? आपण घनकचराकरिता कोटयावधी रुपये खर्च करीत आहोत. मोशी इथे ५०० मेट्रीक टन प्रती दिन क्षमतेचा रेमके कंपनीकडून प्रकल्प उभा केला आहे. यात बारा कोटी रुपये खर्च केले. योजना योग्य रितीने कार्यान्वित होत नसल्यामुळे प्रशासनाला अक्षरशः हिसकावून लावले आहे. बीव्हीजी कंपनीला काम दिले आहे. याच कंपनीने आपल्या विरुद्ध ३० कोटींचा दावा ठेवला आहे. उच्च न्यायालयात लवाद नेमला आहे. सभागृहाला हे सांगायला पाहिजे होते, ते सांगितलेले नाही. असे विषय आपण आणणार असू. त्यांच्याकडून प्लँट व्यवस्थित चालणार नाही म्हणून बीव्हीजीला आणले. रेमके कंपनीने हाय कोर्टात लवाद नेमला. नगरसदस्यांनी सांगितले नसेल तर आमची खरेतर गरज आहे का नाही? हा प्रश्न निश्चित निर्माण होतो. आपण ३० कोटी द्यायचे. प्रकल्प

उभा करताना १२ कोटी दिले होते. प्रशासनच दोषी म्हणून ठोकायचे, का सर्वसामान्य नागरीकांनी आम्हाला आनंदाने विचारायचे, का अधिकारी अडकला म्हणून विषयाला मंजूरी द्यायची. खरेतर मा.महापौर साहेब, या अहवालात मनपा क्षेत्रात प्रति दिन जमा होणारा ६०० मेट्रिक टन कच-यापैकी २५० मेट्रीक टन कच-यावर प्रक्रिया केली जाते. हे तुम्ही स्वतः नमूद केले आहे. असे असताना रॅमको कंपनी आमची फसवणूक केली असे ते सांगतात. आपण ५०० मेट्रीक टनावर प्रकल्प उभा केला. आपण म्हणतो, २५० टनापेक्षा जास्त कच-यावर प्रक्रिया करु शकत नाही. एकतर आपला अहवाल खोटे बोलतोय. तिथे प्लँट उभा केला असेल तर आपण त्यांच्याकडून रिकव्हरी केली पाहिजे. आपण मर्यादेपुढे जाऊन आपली बाजू अशा रितीने मांडत नाही. स्पष्ट करतो आहे. पहिला फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. त्याने ५०० कोटी खर्च केला नाही. मोशीकरांना नको तो त्रास सहन करावा लागतोय. याचा भूर्दंड आपण स्वतः सोसतोय. रेमके कंपनीवर फौजदारी दाखल केली पाहीजे. गांडूळ खतासाठी ५ कोटींचे काम दिले होते. ३० टन क्षमतेचा प्रकल्प असताना दररोज १५ टन कच-यावरच प्रक्रिया केली जाते. जेव्हा प्रकल्प उभा केला, त्यावेळी ४० ते ५० टक्के इतक्या क्षमतेने चालू आहे. अतिशय दयनीय अवस्था आहे. ठेकेदाराचे पूर्णपणे दूर्लक्ष झालेले आहे. चार पाच वर्षापासून प्रकल्प उभा आहे. मी स्वतः या प्रकल्पाच्या ठिकाणी गेले होते. तिथे अशिक्षित, अडाणी महिला ठेवल्या आहेत. त्यांना काही कळत नाही. नेमके काय करायचे, प्रमाण काय हे कळत नाही. प्रकल्प अतिशय चांगला आहे. तो पूर्ण क्षमतेने चालतो का नाही या गोष्टींकडे पूर्णपणे दूर्लक्ष होते आहे कचरा उपलब्ध करुन देण्यात प्रशासन, महापालिका कुचकामी ठरले आहे. कोटयावधी  खर्च करुन सुद्धा प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालत नाही. यासाठी जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. प्लास्टिकपासून इंधन तयार करताना मोशी कचरा डेपोतील कच-यापासून दि. २९/१/२००७ रोजी ठेकेदाराबरोबर केलेल्या करारानुसार बीव्हीजी यांना काम दिले होते. यासाठी ५ एकर जागा सुध्दा दिली आहे. ३० वर्षे कालावधीसाठी वार्षिक भाडे फक्त रु.१,०००/- आहे. या अहवालात म्हटले आहे,  प्लास्टिक कच-यापासून इंधन निर्मिती करतो. १.५ मेट्रीक टन प्लास्टिकपासून इंधन निर्मिती केली जाते. मुळात ज्या प्लास्टिकवर प्रक्रिया करतो, ती मनपाकडून जो कचरा जमा करतो, त्यातून कोणत्याही प्रकारची प्रक्रिया करत नाही. याची तोंडी कबुली बीव्हीजीने दिली आहे. असे असताना सुद्धा पर्यावरण अहवालात नोंद केलेली आहे, आपला कचरा वापरला जातो. गुजरात इथून कंपनी वेस्ट मागवून त्यावर प्रक्रिया करतात. यातील यांत्रिक कपॅसिटी २०० मेट्रीक टन पैकी केवळ काही टन प्लास्टिक कचरा वेगळा करतो. बीव्हीजीकडून ३०० टन कचरा वेचला जात नाही. केवळ ओपन चेंबरींग केलेले आहे. स्थायी समितीमध्ये

विषय मंजूर केला. लॅण्ड फिलिंगसाठी मंजूरी घेतली. खरेतर पर्यावरण विभागाने बीव्हीजीला अनेक पत्रे दिली होती. एकिकडे पत्र द्यावयाचे, दुसरीकडे जे करत नाही ते करतो असे अहवालात सांगावयाचे म्हणजे सरळ सरळ खोटेपणा आहे. पर्यावरण विभागाकडून १९८६ च्या वायू प्रदूषण कायदा, १९७४ मधील व्यवस्थापन कायदा व २०११ चा कायदा यातील तरतूदींचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होते आहे. बीव्हीजीवर आपण पाच वर्षे खर्च करीत आहोत. बीव्हीजीला वारंवार पत्र पाठवतो. प्लास्टीक पासून इंधन तयार करतो. आपण डॉक्टर आहात,तज्ञ आहात, हुशार आहात. अशा पाचशे कंपन्या सापडतील. प्लास्टीकपासून इंधन तयार करण्यासाठी २०००पासून प्रयत्न करतोय. त्यांचा प्लॅन यशस्वी होत नाही. त्यांच्याकडून होत नसेलतर दुस-या कोणालातरी संधी द्या. त्यांच्यावर वारंवार कोट्यावधी रुपये खर्च करतोय. पर्यावरण अहवालात उपाययोजना काय करायची याचा थांगपत्ता नाही. अहवालात व्यवस्थापन, हाताळणी, ई वेस्टबाबत जरी तपशील देण्यात आलेला आहे. महापालिका हद्दीतील ई वेस्ट वेगळे करुन, अधिकृत क्लिनिंग सेंटर रिक्लिनिंग सेंटरमध्ये पुढील प्रक्रिया करायची जबाबदारी महापालिकेची आहे. ई-कचरा संदर्भात पर्यावरण विभागाचे प्रमुख कुलकर्णी साहेबांनी शासनाकडे फंड मागितला आहे. हिंजवडीत एक दिवसीय कार्यक्रम केला. त्यानंतर आम्ही काही करत नाही. व्यवस्थापन करणे याबाबतीत कोणतेही काम केले जात नाही. नियमांची अंमलबजावणी करत नाहीत. हे अत्यंत खुबीने राबवले पाहिजे. मोशी इथे इलेक्ट्रॉनीक वस्तू, सीएफएल ट्यूब्ज्, मोबाईल, लॅपटॉप, रिकामे बल्ब, घरगुती आधुनिक ई-वेस्ट मिसळून एकत्रितपणे आणला जातो. त्यामुळे मनुष्याच्या स्वास्थ्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. ई-वेस्ट गोळा करायची यंत्रणा नसताना सुद्धा हे कबूल करायचे नाकारले आहे. खरेतर ई-वेस्ट जमा करत नाहीत. ते गोळा करायची यंत्रणा नाही. जे करत नाही तेच सांगायचा प्रयत्न केला आहे. नद्यांची दुरावस्था झाली आहे. पवना,मुळा, इंद्रायणी या नद्या, नद्या राहिल्या नाहीत. त्यात भराव टाकून नदीची रुंदी कमी करण्यात आली आहे. य़ा अहवालात पर्यावरण विभागाने स्वतः याची कबुली दिली आहे. पवना नदीचे पाणी पिण्यासाठी तर सोडाच पण शेतीला वापरण्यासाठी, कपडे धुण्यासाठी सुध्दा लायकीचे नाही. आपण सोडलेल्या मैल्यामुळे ग्रामिण भागात ऊजनी धरणापर्यंत पाणी जाते. सोलापूर भागात आपल्यामुळे गॅस्ट्रोचे प्रमाण वाढते आहे. त्यावर उपाययोजना काय केली पाहिजे याची सुद्धा दखल घेण्याची खरी गरज आहे. नुसता अहवाल छापून उपयोग नाही. आपण मला बोलायला संधी दिली. आपण जो अहवाल दिला, खूप चांगला छापला आहे. त्रुटी सांगितल्या आहेत. उपाययोजना सांगितली नाही. जलशुद्धीकरण जागृतीचा कार्यक्रम व्यापक प्रमाणात हाती घेतला पाहिजे. कॉलेज, शाळा, महिला बचत गट, ज्या ज्या ठिकाणी

लोक एकत्र येतात तेथे जनजागृती करुन लोकांना समजावून सांगितले पाहिजे. चांगले पाऊल उचलले, त्याबद्दल मनापासून अभिनंदन करते. ज्या काही त्रुटी राहिल्या आहेत त्यांची आपण एकदा दखल घ्यावी.

**मा.प्रशांत शिताळे** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, एका बाजूला बेस्ट सिटी अवॉर्ड हा बहुमान घ्यायचा व दुसरीकडे १०,००० सुद्धा दंड घेतला आहे. एकीकडे अभिमान करायचा, दुसरीकडे तोंड शरमेने खाली करायचे. मग हे बरोबर आहे का? यात सुद्धा बारीक नजरेने लक्ष देणे गरजेचे आहे. ब-याचशा गोष्टींची माहिती आहे. या निमित्ताने तुमच्यासमोर शॉर्ट टर्ममध्ये महापालिकेचा व्ह्यू मांडला हे. हे होत असताना तुम्ही रुजू झाल्यापासून येत्या वर्षभरात कितीतरी वेळा सांगितले आहे. आमची क्षमता २५० एमएलटी इतकी आहे. परंतू इनटेक तेवढा नाही. आपले प्लँट रिकामे राहतात. मग प्रदूषण व्हायचे कारण काय? नदीत मैला जायचे कारण काय? सांगवी मधील प्लँट महापालिकेचा सगळ्यात जुना पहिला प्लँट आहे. आपण शंभर टक्के काम करु शकत नाही. थरमॅक्सच्या जागेत २००० मध्ये ॅक्टीव्हेट झालेला आहे. त्याची कॅपॅसिटी वाढवायची गरज आहे. त्यासाठी दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागते आहे. याची मला शंभर टक्के खंत वाटते. सामाजिक कार्यकर्त्यांनी पत्र दिले. तो रिन्यू करायचा होता. या गोष्टी आपण करत नाही. त्यामुळे दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागते. मा.आर.एस.कुमार साहेब असू द्यात. तुमची फिटींग नसेल तर कशी अपेक्षा ठेवणार? याची एकच बाजू नाही. कचरा डेपो इथे त्याविषयी चूका काढतो. पण तसे फिटींग द्यायला पाहिजे. तशा सुविधा देत नाही. हे चुकीचे आहे. एमबीसीबीकडून १०,००० दंड लावला जातो. आपण ज्या समाजात राहतो, त्या समाजातील नागरीकांना त्रास होणार नाही अशा प्रकारचे वातावरण ठेवायचे काम करायची कार्यवाही महापालिकेची आहे. औंध मधील कचरा डेपो मध्ये ५ टनाचा प्लँट आहे पण तिथे वास सुद्धा येत नाही. आजूबाजूला रहिवास भाग आहे. अशा प्रकारचे १३ प्लँट पुणे महानगरपालिकेने उभे करायचे नियोजन केलेले आहे. हे करत असताना उद्याच्या काळात या गोष्टी केल्या पाहिजेत. पुनावळे इथे कचरा डेपो होईल का माहित नाही. आरक्षणात जागा जाण्यापेक्षा जागेवर कच-यावर प्रक्रिया करायचे नियोजन केले तर, बेकार वासाचे नियोजन केलेतर नागरिकांना त्रास होणार नाही. बेस्ट सिटीमध्ये रहात असल्यासारखे वाटेल. आम्ही विषयाला मंजूरी दिली. प्रश्न एकदाचा सुटेल अशी मानसिकता ठेवून संबंधित सर्व विभागप्रमुखांनी अहवाल सादर केला असेलतर मग ते आरोग्य खाते असू द्या, पर्यावरण खाते असू द्या ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. पर्यावरण चांगले ठेवायचे भान आपण ठेवले पाहिजे. कधीकधी उगाच बदनामी होते. आख्खी यंत्रणा खराब करुन टाकतो.

शास्ती लावत असताना आपला पर्यावरण अहवाल एका बाजूला राहतो. मा.सिमा सावळे यांनी सांगितले आहे, आपल्या नद्यांचे पाणी कपडे धुण्यासाठी सुद्धा योग्य नाही. आम्ही पाण्यावर ट्रिटमेंट करतो. एसटीपी प्लँट घेतो आहोत. कोणी उगाच कारवाई करत नाही. कचरा डेपो असू द्या, ई-वेस्ट असू द्या, हॉस्पीटल असू द्या, प्रत्येक बाबतीत एमबीसीबीची नोटीस येता कामा नये.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शुभांगी लोंढे-** महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १५

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/९०२/२०१३
दि.०८/०७/२०१३

महापालिकेचे वाढलेले कार्यक्षेत्र व लोकसंख्येमध्ये झालेली वाढ विचारात घेता, महापालिका कार्यक्षेत्रामधील नागरिकांना पायाभूत नागरी सुविधा पुरविणे व कार्यालयीन कामकाजाची विभागणी समप्रमाणामध्ये करणे आवश्यक आहे. त्याकरीता सध्या लोकसंख्या विचारात घेऊन पूर्वीच्या अ,ब,क व ड या ०४ प्रभाग समित्यांव्यतिरिक्त नव्याने आणखी ०२ प्रभाग समित्या स्थापन करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २९-अ नुसार नवीन द्विसदस्यीय प्रभाग रचनेमुळे प्रभाग कार्यालय या नावामुळे संभ्रम निर्माण होतो. प्रभाग समितीमध्ये प्रादेशिक क्षेत्र समाविष्ट होत असल्याने समिती कार्यालयाचे नाव क्षेत्रीय कार्यालय असे प्रस्तावित करण्यात येत आहे.

पुनर्रचनेबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे –

| अ. क्र. | क्षेत्रीय कार्यालय | प्रभाग क्रमांक | प्रस्तावित कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | अ क्षेत्रीय कार्यालय | ८,१०,१४,१५,१६,१७, १८,१९,२५,२६,२७ = ११ | भेळ चौकातील सध्याचे अ प्रभाग कार्यालय |
| २. | ब क्षेत्रीय कार्यालय | २०,२१,२२,२३,२४,४२,४ | अस्तित्वातील ब प्रभाग कार्यालय, |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ९,५०,५१,५२,५३ = ११ | एल्प्रो कंपनी आवार |
| ३. | क क्षेत्रीय कार्यालय | ३७,३९,४०,४१,४३,४४,४५,६१,६२,६३,६४ = ११ | अस्तित्वातील क प्रभाग कार्यालय, हॉकी स्टेडीयम शेजारी |
| ४. | ड क्षेत्रीय कार्यालय | ४६,४७,४८,५४,५५,५६,५७,५८,५९,६० = १० | अस्तित्वातील ड प्रभाग कार्यालय, रहाटणी |
| ५. | इ क्षेत्रीय कार्यालय | ६,७,२९,३०,३१,३२,३३,३४,३५,३६,३८ = ११ | ग्रोथ लॅब, भोसरी |
| ६. | फ क्षेत्रीय कार्यालय | १,२,३,४,५,९,११,१२,१३,२८= १० | जागा निश्चित करणे आवश्यक आहे. |

उपरोक्तप्रमाणे प्रभाग समित्या स्थापन करुन क्षेत्रीय कार्यालयास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २९-अ अन्वये मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रध्दा लांडे** - महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.अरुण बो-हाडे –** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ तहकूब करणेत यावा अशी सूचना मांडतो.

**मा.किरण मोटे -** मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रमांक १५ तहकूब करणेत येत आहे.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक -३३१ विषय क्रमांक - १५
दिनांक -२६/७/२०१३ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/९०२/२०१३
दि.०८/०७/२०१३

विषय क्रमांक १५ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल -६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.शुभांगी लोंढे-**मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३३२ विषय क्रमांक - १६
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जनि/कावि/४२/२०१३, दि.१०/०७/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका तसेच १४ नगरपालिका यांचे मैलापाण्यामुळे मुळा मुठा व भिमा नदीचे पाणी अत्यंत प्रदुषित झाल्यामुळे पुणे जिल्ह्यातील २१० गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत मा.विधानसभा अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या उपस्थितीत दि.३/४/२०१२ रोजी विधान भवन मुंबई येथे बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीचा आढावा घेणेसाठी दि.१६/०१/२०१३ रोजी बैठक घेणेत आली होती. सदर बैठकीमध्ये वरील विषयाबाबत चर्चा होऊन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेशी संबंधित खालील निर्णय घेणेत आले आहेत.

१. भिमा व तिच्या उपनद्या काठी असलेल्या १९६ गावांना शुद्ध पाणीपुरवठा होण्याकरिता तातडीची उपाययोजना करण्यासाठी जलशुद्धीकरण यंत्रणा (आर.ओ.) बसविणे आवश्यक आहे. त्याचा खर्च पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी समसमान सोसावा.
२. वरील बाबींची पुर्तता होण्यासाठीचा प्रस्ताव आयुक्त, पुणे महानगरपालिका व आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवावा.
३. पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी सांडपाणी प्रक्रिया करण्याचा प्रस्ताव तातडीने तयार करुन शासनास सादर करावा.

वरील निर्णयापैकी मुद्दा क्र.३ साठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस JnNURM अंतर्गत अनुदान मिळाले असून त्यानुसार कामे पुर्ण झाली आहेत सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात मनपाकडून ४४० द.ल.लि. प्रतिदिनी व MIDC कडून १५ द.ल.लि. प्रतिदिनी नागरिकांना पाणीपुरवठा केला जातो, त्यापासून सुमारे २९१ द.ल.लि. प्रतिदिनी मैलापाणी तयार होते. सध्या महानगरपालिकेची मैलाशुध्दीकरणाची स्थापीत क्षमता ३३८ द.ल.लि प्रतिदिनी आहे, सध्या

मैलाशुध्दीकरण केंद्रामध्ये २१० द.ल.लि. प्रतिदिनी सांडपाण्यावर प्रक्रिया करणेत येते व उर्वरित सांडपाणी प्रक्रिया न करता नदीत सोडण्यात येते.

उपरोक्त विषयाबाबत झालेल्या निर्णयानुसार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग यांनी दि. १/२/२०१३ रोजीचे पत्रानुसार दुषित पाणीपुरवठा होणा-या गावांसाठी (आर.ओ) यंत्रणा बसविण्याचा खर्च १७४९.५० लक्ष इतका येत असून सदर खर्चातील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हिश्याची रक्कम रू.८७४.७५ लक्ष मिळण्याची विनंती केली आहे. सदर बाबत म.न.पा.ने छाननी करून खालील प्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे.

एकूण गावांची संख्या - १२६
आर.ओ. यंत्रणा बसविणेसाठी येणारा खर्च - १६१७.५० लक्ष
UPSTREAM ला मावळ तालुक्यातील असणारी गावे - ५०
म.न.पा.च्या सांडपाण्याने बाधीत होणारी गावे - ७६
मावळ तालुक्यातील गावांसाठी आर.ओ. यंत्रणा बसविणेसाठी येणारा खर्च - ६०४.५० लक्ष म.न.पा. सांडपाण्याने बाधित होणा-या गावांसाठी येणारा खर्च - १०१३ लक्ष
दि. ०९/०७/२०१३ रोजी मा.अध्यक्ष, विधानसभा, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत दोन्ही महानगरपालिकांनी दि.१६/०१/२०१३ चे बैठकीत दिलेल्या निर्देशान्वये समसमान रक्कम द्यावी असे निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने एकूण रक्कम १०१३ लक्ष पैकी र.रू ५०६.५० लक्ष अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.श्रद्धा लांडे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६९ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.किरण मोटे**– मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३३३ विषय क्रमांक - १७
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

**अ)** दिनांक ०५/०४/२०१३ व ०८/०४/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दिनांक ०७/०६/२०१३ (विशेष सभा) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**क)** दिनांक २१/०६/२०१३ व २८/०६/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अरुण बो-हाडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महिला व बालकल्याण समिती**

**मा.किरण मोटे**–मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३३४ विषय क्रमांक - १८
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

**अ)** दिनांक १०/४/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
**ब)** दिनांक ७/६/२०१३ (विशेष सभा) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अरुण बो-हाडे**-मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शहर सुधारणा समिती**

**मा.किरण मोटे**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३३५ विषय क्रमांक - १९
दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

अ) दिनांक २०/३/२०१३, ३/४/२०१३ व ८/४/२०१३ चा सभावृत्तांत कायम

करणेत येत आहे

**ब)** दिनांक ०७/०६/२०१३ (विशेष सभा) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**क)** दिनांक ११/०६/२०१३ (विशेष सभा) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अरुण बो-हाडे**-मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.क्रिडा समिती**

**मा.किरण मोटे**–मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३३६ विषय क्रमांक - २०

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

अ) दिनांक २०/३/२०१३, ३/४/२०१३ व ८/४/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**ब)** दिनांक ७/६/२०१३ (विशेष सभा) चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**क)** दिनांक १९/०६/२०१३ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अरुण बो-हाडे**-मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.शमीमताई पठाण**-मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक -३३७ विषय क्रमांक - २१

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.लेखा/३/कावि/४५८/१३

दि.११/७/२०१३

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.३७१४ दिनांक १६/७/२०१३

३) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. लेखा/३/कावि/४८६/१३ दि.१७/७/२०१३

पिंपरी चिंचवड मनपा सेवक, अंधव्यक्ती, दैनिक व साप्ताहिक वर्तमानपत्रातील वार्ताहार, विद्यार्थी पासेस, स्वातंत्र्य सैनिक, जेष्ठ नागरिक, मतिमंद व्यक्ती यांना सवलतीचे पासेस दिलेले आहेत. पासेसची संख्या व रकमेबाबत पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे तपासणी करुन खात्री केली जाईल व त्यानुसार सदर रकमेची अदायगी करणेत येईल. सन १३-१४ च्या मंजुर अंदाजपत्रकात वाहन व्यवहार निधी रक्कम रु.३८ कोटी तरतूद केलेली आहे. त्यापैकी पुणे महानगर परिवहन विभागास र.रु.१,८५,२४,४६२/- अदा केली असून र.रु.३६,१४,७५,५३८/- शिल्लक आहेत. सदर पासेसचा खर्च र.रु.२४,८५,३३,९२८/- मान्यता देणेत येत आहे.

**मा.शुभांगी लोंढे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, या ठरावामध्ये २४ कोटी लिहिलेले आहेत. परंतू चर्चेनुसार लक्षात आले की, २२ कोटी अशी यात दुरुस्ती करण्यात यावी.

**मा.श्रीकर परदेशी** (महापालिका आयुक्त) – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा.सदस्य, मा.स्थायी समितीकडून विषय तशाच्या तशा आलेला आहे. दरम्यान आपण ताळमेळ मागितला आहे.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, यात तुम्ही तपासणी केली व महापालिकेचे २ कोटी वाचवले. त्याबद्दल सभागृहाच्या वतीने तुमचे अभिनंदन करते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पलांडे**–मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक-३३८ विषय क्रमांक - २२

दिनांक - २६/७/२०१३ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/EWSप्र/२७४/२०१३ दि.२०/७/२०१३

२) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.BSUP/प्रकल्प/२७५/२०१३ दि.२०/७/२०१३

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे JnNURM-BSUP अंतर्गत से.क्र. १७ व १९ चिखली येथील २५.३० हेक्टर जमीनीत आर्थिक दुर्बल घटकांसाठी गृह योजना (EWS Housing Project) चालू आहे. सदरची जागा २००७ मध्ये प्राधिकरणाने म.न.पा.स क्रिडांगणासाठी हस्तांतरीत केली होती. त्यावेळेस सदर जागेचे प्रयोजन हरीत विभाग (Green Zone) असे होते. त्यावेळेस प्राधिकरण व महानगरपालिकेमध्ये रितसर करारनामा होऊन सदर भूखंडापोटी र.रु.१/- प्रति चौ.मी. प्रमाणे रु.२,५३,०२०/- इतकी रक्कम मनपाने प्राधिकरणास अदा केली होती. जागेचे Agreement दि.२७/०२/२००९ रोजी केले. JnNURM-BSUP अंतर्गत EWS Housing प्रकल्पाकरिता घरे बांधण्यासाठी निविदा काढणेकामी सदर भूखंडाचा अंतर्भाव केला. सदर भूखंडाचे प्रयोजन EWS Housing करण्यासाठी प्राधिकरणाने M.R. & T.P. Act-1966 च्या 37 अन्वये कार्यवाही केली. भूखंडाचे प्रयोजन बदलून ते रहिवास क्षेत्र झाल्याने प्राधिकरणाने पत्र क्र. विप्रा/माविवि/विभाग-३/६२७७ दि.१५ ऑक्टोबर २००८ अन्वये र.रु.११३.८९ कोटींची मागणी केली त्यावर महानगरपालिकेने प्राधिकरणास महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या २५ जुन २००७ च्या निर्णयास अनुसरुन सदर भुखंडाचे अधिमुल्य माफ करणेबाबत/सवलतीच्या दरात अधिमुल्य आकारणेबाबत विनंती केली. याबाबत प्राधिकरणाने शासनाकडे मार्गदर्शन मागितले. महाराष्ट्र शासन जो निर्णय देईल तो म.न.पा.स मान्य असेल असे मनपामार्फत कळविण्यात आले. नगरविकास विभागाचे कक्ष अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.PCC-3012/प्रक्र४५६/नवि-२२ दि.४/७/२०१३ अन्वये "अधिमुल्य निश्चितीबाबत प्राधिकरणाचा भूवाटप नियमावलीच्या विनियम १२ अन्वये प्राधिकरणास असलेल्या अधिकारात अधिमुल्य निश्चित करावे," असे निर्देश दिले. यानुसार प्राधिकरण सभा दि. १७/७/२०१३ च्या प्राधिकरण सभा क्र. ३०५ मध्ये विषयांकित जागेचे अधिमुल्य निश्चित करणेबाबत चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

१) सदर जागेचे अधिमुल्य र.रु.२४,५८,९६,९१७ + सर्व्हिस टॅक्स (भूसंपादन खर्च + त्यावरील व्याज + विकास कामाचा खर्च मिळून) आकारण्यात यावे.

२) ही रक्कम महानगरपालिकेने २ महिन्यांत प्राधिकरणास अदा करावी.

३) याबाबत पुढे शासनाने, न्यायालयात चालू असलेल्या दाव्यामध्ये अगर वेगवेगळया लेखापरिक्षणात या जमीनीच्या अधिमुल्य आकारणीबाबत भविष्यात काहीही वेगळे निर्देश दिले गेले व त्यामुळे अधिमुल्याच्या रकमेत काही बदल झाला तर अधिमुल्यातील होणा-या फरकाची रक्कम महानगरपालिका विनाअट व तात्काळ प्राधिकरणास देईल. याबाबत महानगरपालिकेने लेखी हमीपत्र प्राधिकरणास सादर करावे.

या ठरावाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण यांनी त्यांचे पत्र क्र. विप्रा/भुविभाग-१/११०३ दि.१९/०७/२०१३ अन्वये, "सुधारीत अधिमुल्य रक्कम रु.२४,५८,९६,९१७/- + सर्व्हिस टॅक्स् या पत्राचे दिनांकापासून २ महिन्यांत प्राधिकरणास अदा करणेत यावी व ठरावात नमूद केल्याप्रमाणे लेखी हमीपत्र प्राधिकरणास सादर करण्यात यावे" अशी विनंती केली आहे. सदर भूखंड प्राधिकरण क्षेत्रात असल्याने विषयांकित प्रकल्पास त्यांचेकडून बांधकाम परवानगी प्राप्त आहे. सदर प्रकल्पाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे. –

| | | |
|---|---|---|
| प्राप्त बांधकाम परवानगी | - | ६७२० |
| आर.सी.सी. बांधकाम पुर्ण | - | ५३८८ |
| वाटपासाठी तयार गाळे | - | २०१६ |

दि.०९/०७/२०१२ च्या पत्रान्वये प्राधिकरणास भाग पुर्णत्वाच्या दाखल्याची मागणी केलेली आहे. तथापि, भूखंडाचे अधिमुल्य प्राप्त झाल्यानंतरच मनपास भाग पुर्णत्वाचा दाखला मिळू शकणार आहे. सदनिका तयार आहेत. ब-याच लाभार्थ्यांनी त्यांचा हिस्सा भरलेला आहे. या पार्श्वभुमीवर लाभार्थ्यांकडून, सदनिका वाटप तातडीने होणेबाबत वारंवार मागणी होत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता प्राधिकरणाने मागणी केलेप्रमाणे विषयांकित जमिनीचे सुधारीत अधिमुल्य र.रु.२४,५८,९६,९१७/- + सर्व्हिस टॅक्स् तातडीने अदा करणेत यावे असे वाटते. तसेच प्राधिकरणाने कळविल्याप्रमाणे जमिनीच्या अधिमुल्य आकारणीबाबत भविष्यात काहीही वेगळे निर्देश दिले गेले व त्यामुळे अधिमुल्याच्या रकमेत काही बदल झाला तर अधिमुल्यातील होणा-या फरकाची रक्कम महानगरपालिका विनाअट व तात्काळ प्राधिकरणास देईल. अशा आशयाचे लेखी हमीपत्र प्राधिकरणास सादर करणेत यावे असे वाटते. यापुर्वी मनपाने कळविल्याप्रमाणे सदर भूखंडाच्या अधिमुल्याचा बोझा आणखी लाभार्थ्यांवर पडू नये यासाठी ही रक्कम मनपाने प्राधिकरणास द्यावी असा प्रस्ताव आहे. यामुळे लाभधारकांनी द्यावयाच्या र.रु.३,७६,०००/- च्या

वाटयामध्ये वाढ होणार नाही. सदरच्या प्रस्तावास मा.महापालिका सभेची मान्यता आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.सविता साळुंके** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन देते.

**मा.सिमा सावळे** - मा.महापौर साहेब मा.आयुक्त साहेब, तुमच्या प्रयत्नांना यश येते आहे, त्याबद्दल तुमचे अभिनंदन करते. २००८ पासून थांबलेल्या विषयाला आज अंशत: मान्यता मिळालेली आहे. शासनाचा जी.आर.आहे. डीएसयूपी संदर्भात शासनाने सर्व्हीस टॅक्स घ्यायची नाही असे दि.२५ जुलै २००७ रोजी प्रसिद्ध झालेल्या जी.आर.मध्ये आहे. आपल्याला २५ कोटी देण्याचा विषय त्यांनी सांगितला. रु.२४ कोटी ५८ लाख कोणत्या गोष्टीसाठी सर्वीस टॅक्स लावलेला आहे. भूसंपादनाचा खर्च, विकास खर्च मिळून हा टॅक्स आकारण्यात आलेला आहे. त्यांनी आपल्याला हा जी.आर. दाखवावा. यात पुढे म्हटले आहे की, प्राधिकरणाकडे अट क्र.३ मध्ये याबाबतीत पुढे शासन धोरणाने चालू असलेले वेगवेगळे लेखापरिक्षण करण्याबाबत भविष्यात निर्देश देऊन अधिमूल्य रकमेत बदल झाला तर त्या फरकाची रक्कम महापालिका नियम/अटीच्या अधिन राहून देईल. याबाबत लेखी हमी पत्र महापालिकेने सादर करावे. प्रती हमी पत्र घेतो आहोत. या एका शब्दावर ते टिकून राहत नाहीत. ६५० कोटी ही रक्कम कोणत्या बाजारभावाने आहे. इथे जर-तर येते आहे. त्यामुळे आम्हाला मोठी शंका आहे. नक्की किती पैसे द्यायचे. आज २५ कोटी म्हणून घेणार. निश्चित गाळे वाटप केले पाहिजे. आपले लाभार्थी आहेत. वर्कऑर्डर दि.२६ फेब्रुवारी २००९ रोजी दिली. किती काळ अडवणार, २०१६ गाळे वाटपासाठी तयार आहेत. ही शरमेची बाब आहे. सगळेच गाळे बांधून तयार झाले पाहिजेत. ६५०० गाळे बांधतोय. सगळेच तयार झाले पाहिजेत. आज कबूल केले असले तरी आज नाहीतर उद्या तरी याला सामोरे जावे लागणार आहे. जागा नाही, पैसा नाही, सगळ्या गोष्टी मान्य आहेत. इतकी वर्षे होऊन सुद्धा १४ महिने एक्स्ट्रा झाल्यानंतर ठेकेदाराला दंड मारला पाहिजे. त्याचे कसले लाड करायचे? आपण लोकांचा सुद्धा रोष घ्यायचा. प्राधिकरणाने काढता पाय घ्यायचा. आपण त्या ठेकेदाराच्या मानगुटीवर बसून ५० टक्के अडव्हान्स जप्त करावा. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील गाळ्यांचे काम अतिशय नित्कृष्ट दर्जाचे केले आहे. तिथे पहिल्या, तिस-या व पाचव्या मजल्यावर लिफ्ट थांबवणार असे केले आहे. लिफ्टचा खर्च वाचवला आहे. आपण २००० गाळे देणार होतो. माझी आपल्याला विनंती आहे की, आयुक्त साहेबांनी आदेश द्यावेत. ठेकेदाराकडून जेवढी कामे करुन घेता येतील तेवढी करुन घेतली पाहिजेत. पर्यायाने कोणी कोर्टात जाऊ नये. परत असे होऊ नये. यांपैकी कोणी कोर्टात गेलेतर काय पॉवर लावणार आहात? ते १४ आहेत. ते मागत असतील तर योगेश म्हसे हे

एकच नाव नाही. शासनाने जबाबदारी टाकली असेल, तुम्हाला सत्ता दिली म्हणून योगेश म्हसे हा प्राधिकरणाचा मालक नाही. ती एक कंपनी आहे. एकासाठी यंत्रणा नसते. आठवड्यात त्याचा फोन येतो. आज २५ कोटींचा अंदाज केला. खरेतर याठिकाणी आयुक्त साहेबांचे मनापासून अभिनंदन करते. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. खरेतर वाटप प्रक्रिया होणार आहे. अभिनंदन करते, धन्यवाद.

**मा.शमीमताई पठाण** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जेएनएनयुआरएमची ईडब्ल्यूएस योजना राबविली आहे. तुमचे सुद्धा अभिनंदन आहे. सर्वांच्या पाठीमागे त्यांचा हात आहे. जाहीरनाम्यात आपण आश्वासन दिले होते. त्याची पूर्ती झालेली नाही. लोकांना घरे देणार आहोत, त्याबाबतीत आपले नेते मा.ना.अजित पवार यांनी यांनी जो पुढाकार घेतला, जी मदत केली, त्याबद्दल त्यांचे सुद्धा पुरेपुर अभिनंदन करते.

**मा.कैलास कदम** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, या प्रकल्पाचे बाबतीत जो काही निधी वाढवण्यात आला त्यासंबंधी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयुक्त साहेब व महापौर साहेब यांचे आभार व्यक्त करतो. निश्चितपणे हा निधी जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून, केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्या माध्यमातून आलेला आहे. घरकुल योजना पूर्णपणे राबवली गेली असती तर निश्चित अधिक आनंद व्यक्त करता आला असता. तरीदेखील निश्चित आनंद व्यक्त करतो की, काँग्रेस पक्षाने निधी वाढविला त्याबद्दल आपले आभार व्यक्त करतो.

**मा.मंगलाताई कदम** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, नेहमी म्हणतात, माणसाने आयुष्यात स्वप्ने बघायची असतात व त्या दृष्टीकोणातून वाटचाल करायची असते. कितीही अडचणी आल्या तरीसुद्धा सहकारी नगरसेवक, पदाधिकारी, मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री अजितदादा पवार असतील, सर्वांनी मिळून विषयातील अडचणी सोडवण्याचा प्रयत्न केला, सर्वांनी साथ दिली म्हणून इथपर्यंत पोचलो आहोत. मिटींग झाली त्यावेळी एक विषय तहकूब ठेवला होता. त्यात ठरले होते, उर्वरीत जागा सुद्धा धरायच्या आहेत. त्या दृष्टीकोणातून प्रयत्न करायचे आहेत. जी.बी. सभागृहात जागा मिळाली तरी केंद्र सरकारकडे ताकद लावावी लागणार, ती लावणार आहोत. केंद्र सरकारमध्ये काँग्रेस पक्षाची सत्ता आहे. तरीदेखील मंजूरी करुन आणता येईल. परंतू सगळ्याच विषयांत यश आल्यामुळे इतक्या मिटींग्ज् झाल्या नाहीत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना.पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या प्रयत्नांना यश आले. २५ कोटी कुठे आणि ११४ कोटी कुठे खरेतर ही अभिमानास्पद गोष्ट होती.

कन्फर्मेशनची वाट न पहाता विषय करुन घ्या. विषय लवकरच प्रोसिजरसाठी पुढे जाईल. जे लोक घरांची वाट बघत आहेत. त्यांनी कोर्ट गाठले आहे. लोक त्रस्त झाले आहेत. हे लोक भाड्याच्या घरांत राहतात. स्वप्न अर्धवट राहीले आहे, त्याच्या पूर्तीकडे कसे जाता येईल. यासाठी सगळ्यांच्या वतीने मा.महापौर यांना हार्दीक शुभेच्छा देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल -६९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.महापौर** - सर्वांनी चांगले सहकार्य केले म्हणून सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(मोहिनीताई विलास लांडे)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/४/कावि/८५२/१३
दिनांक – ११/०९/२०१३

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.